श्रीसमर्थ-सदन-प्रकाशन

।। श्रीराम: प्रसन्नोऽस्तु ।।

सार्थ श्रीदासबोध

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ।। ३० ।।
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होत ।। ३१ ।।

— दशक २०, समास १०

संपादक व अनुवादक

कै. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य नऊ रुपये

[redacted]

[redacted]

मुद्रक		प्रकाशक
बा. ग. ढवळे	सर्वाधिकार प्रकाशकाधीन	के. भि. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय	प्रथमावृत्ति, शक १८४५	श्री समर्थ-सदन
१०३, शींव, मुंबई २२	द्वितीयावृत्ति, शक १८५०	गिरगांव, मुंबई ४
	तृतीयावृत्ति, शक १८७१	

॥ श्रीरामः शरणं मम ॥

प्रस्तावना

आम्हां तुम्हांसि भववारिधिमाजि तारूं
जे वाचितां परिसितां मग होय तारू ।
ते दासबोधरचना घडली जयाला
वंदूं निरंतर तया गुरुराजयाला ।

—रघुनाथपंडित

१ **श्रीसमर्थ रामदासस्वामींचा** सार्थ श्रीदासबोधग्रंथ आजच्या सुप्रसंगानें श्रीसमर्थचरणस्मरणपूर्वक मी जनीजनार्दनास अर्पण करीत आहें. श्रीदासबोधाचा यथार्थ व भावार्थ श्रीसमर्थच जाणतात, म्हणून 'तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें' अशी त्यांची नित्य प्रार्थना करीत या अवजड कामास मीं आत्मशुद्धयर्थ हात घातला आहे. 'आधीं केलें मग सांगितलें', 'मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित', 'माझें बोलणें साधें आणि सप्रचीत' असा हा समर्थांच्या प्रचीतीचा ग्रंथ प्रचीतीनेंच जाणावयाचा आहे, जाणून अनुभव पाहावयाचा आहे. 'नित्यनेमें विवरितां स्वयें ब्रह्मचि होये' अशी याची योग्यता कल्याणस्वामींनीं वर्णिली आहे. दासबोधाच्या वाचकांस यांतील अर्थभाव समजण्याचे कामीं अल्पस्वल्प साह्य झालें तरी हें भाषांतर प्रसिद्ध करण्याचे श्रम सफल झाले असें मी मानीन. श्रीदासबोधांतील विषयांचें समग्र विवरण करण्यास येथें अवकाश नाहीं, तसा प्रयत्न **'श्रीसमर्थचरित्रांत'** करण्याचा माझा मानस आहे.

२ **श्रीसमर्थांचें अवतारकार्य** सर्व जनांस विदित आहे—

(**श्री**) श्रीसमर्थांचे जनक सूर्याजीपंत यांचा जन्म मौजे जांब पा॥ अंबड (गोदातीरीं) शके १४९० मध्यें झाला. ते श्रीरघुपतीची उपासना चालवून श्रीसूर्यआराधना करीत असतांना (शके १५२५) 'एक पुत्र मदंशेंकरून व एक पुत्र मारुतिअंशेंकरून असे दोन पुत्र होतील' असा त्यांस वरप्रसाद झाला व श्रीरामदर्शन होऊन अनुग्रह (श. १५२६) झाला.

(**रा**) श्रेष्ठांचा जन्म श. १५२७ नांव गंगाधर, व समर्थांचा जन्म श. १५३० (रामनवमीस मध्यान्हीं) नांव नारायण. नारायण ७ वर्षांचे असतां सूर्याजीपंत निवर्तले.

(**म**) द्विजांनीं सावधान म्हणतांच समर्थ (नारायण) लग्नांतून पळाले व पंचवटीस गेले (श. १५४२).

(**ज**) पंचवटीस श्रीदर्शन घेऊन तेथून २ मैलांवर टाकळीस राहून समर्थांनीं बारा वर्षें तीव्र अनुष्ठान पुरश्चरण केलें व बारा वर्षें सर्व भरतखंडभर तीर्थयात्रा करून श्रीरामाज्ञेनें ते श्रीकृष्णातीरीं श. १५६६ त आले.

(**य**) पुढलेच वर्षीं त्यांनीं श्रीरामोपासनेचा संप्रदाय सुरू केला. कित्येक मुमुक्षु शरण आले. श्रीरामनवमीच्या उत्सवास प्रारंभ केला. श. १५७० पासून चाफळीं उत्सवास सुरुवात झाली.

(**रा**) शके १५६७ ते ७२ पर्यंत पांच वर्षांत ११ मारुतींची त्यांनीं स्वहस्तें स्थापना केली. हनुमान्-स्वामींच्या बखरींत (भाग ७) हे अकरा मारुति कोठले तें सांगितलें आहे. शहापूर, मसूर ऊर्फ ब्रह्मपुरी, चाफळास दोन—एक सन्मुख व एक श्रीरघुपतीचे मागें, उंब्रज, शिरोळ, पाडळी, पारगांव, मानगांव, सिंघणवाडीचे गुहेंत व अकरावा वाळवे प्रांतांत बाहे येथें. यानंतर समर्थांचा संचार बहुत ठिकाणीं, कधीं चाफळास, कधीं गडावर, कधीं शिवथरचे घळींत होत गेला.

(**म**) सिंघणवाडीचे बागेंत शके १५७१ वैशाखांत श्रीशिवरायास अनुग्रह झाला. ज्येष्ठमासीं तुकोबांची भेट झाली. याच सालीं समर्थ पंढरीचा सोहळा पाहून आले. फाल्गुनांत तुकोबा सदेह वैकुंठास गेले.

(ज) समर्थांच्या भेटीस केशवस्वामी, रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, वामनपंडित, आनंदमूर्ती इ० अनेक संतमहंत येत. समर्थांची कीर्ति सर्वत्र फांकली. शिष्यप्रशिष्य हजारों झाले. मठस्थापना व शिष्यशाखा यांची वटवृक्षासारखी छाया अवघ्या भरतखंडभर पसरून जगदुद्धारकार्य अपरिमित झालें. कण्हेरीचे वासुदेवबोवा, टाकळीचे उद्धव गोसावी, कल्याणस्वामी व त्यांचे बंधु दत्तोबा, गिरिधर, दिवाकर गोसावी, दिनकर गोसावी, देवदास, भोळाराम, वऱ्हाडचे महारुद्र, राजापुरचे त्र्यंबक, बाळकराम, रामटेकचे श्रीधर गोसावी, गोकर्ण प्रांतींचे भैरव, सुरतेचे जनार्दन, तेलंगण प्रांतींचे शिवराम, रायचूरचे सदाशिव इ० अनेक समर्थशिष्य भरतखंडभर श्रीरामोपासनेचा मार्ग लोकांस सुलभ करून देत होते. श्रीशिवराजाप्रमाणें प्रल्हाद निराजी, रामचंद्र निळकंठ अमात्य, सचिव वगैरे कार्यकर्ते समर्थांचे शिष्य झाले. आक्का, वेणाबाई, अंबिकाबाई वगैरे १८ शिष्यिणी थोर अधिकाराच्या होत्या. शिष्यशिष्यिणींचीं नांवेंगांवें श्रीसमर्थप्रतापांत दिलीं आहेत. समर्थांची शिस्त व कदर कडक होती. नेमानें, मर्यादेनें, शिस्तीनें, गुर्वाज्ञेनें कसें वागावें हें समर्थसंप्रदायांत पाहाण्यास मिळे. त्यांचा संप्रदाय नियमबद्ध असे.

समर्थदेवें जें जें केलें। तें कोण्हीं नसेल ऐकिलें देखिलें।
भक्तिज्ञानवैराग्य गाजलें। न भूतो न भविष्यति ॥

(य) शिवरायांनीं स्वकष्टार्जित राज्याच्या सनदा झोळींत टाकल्या.

(ज) चाफळ येथें श्रीरामनवमीमहोत्सव मोठ्या समारंभानें सुरू झाला. त्यानंतर —

श्रीगुरु समर्थ एकांतीं बैसती। प्रांतींचे लोक दर्शनासि येती।
सकळ प्रांतींचा स्वामी परामर्श घेती। चिंता करिती विश्वाची ॥ ५८ ॥

देशकाळवर्तमानें। आपण चिंताग्रस्त होती मनें।
म्हणती कैसीं वांचतील जनें। कैसीं ब्राह्मण्यें राहतील ॥ ५९ ॥

कैसी क्षेम राहेल जगती। कैसीं देवदेवालयें तगती।
कैसे कुटुंबवत्सल लोक जगती। कोणीकडे जातील हे ॥ ६० ॥

याप्रमाणें सर्वत्रांची चिंता या महापुरुषाला होती. समर्थांनीं महाराष्ट्राचा प्रपंच केला, राजकारण अचूक कसें करावें हें शिकविलें, धर्मसंस्थापना केली व करविली, अध्यात्म पिकविलें, व श्रीरामनामगर्जनेनें अवघा ब्रह्मगोळ भरला.

(य) समर्थांनीं लोकहितार्थ ग्रंथरचनाही अफाट करून ठेविली आहे. ग्रंथराज श्रीदासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम हे त्यांचे मुख्य ग्रंथ होत. याशिवाय करुणाष्टकें, अभंग, पदें, आरत्या, सवाया, सगुणनिर्गुणध्यानें, मानसपूजा, मानपंचकें, अंतर्भाव, लळितें, असे किती तरी प्रकार केले. समर्थ मुखानें बोलत व शिष्य टिपून घेत.

(रा) श्रीसमर्थांनीं तीर्थयात्राप्रसंगीं लोकोद्धाराचे जे मनोरथ केले होते, ते श्रीरामकृपाबळानें, समर्थांच्या तपःप्रभावानें व तत्कालीन महाराष्ट्रीय जनतेच्या पुण्यशीलतेनें सफल झालेले त्यांनीं पाहिले! राष्ट्रोत्कर्षाचे दिव्य मनोरथ पुष्कळजण करितात, पण तपोबळ, उपासनाबळ व स्वधर्मनिष्ठा प्रचंड असेल तरच ते 'याचि जन्मीं येणेंचि काळें' सफळ होतात, हें समर्थांच्या चरित्रावरून सर्वांस पटलें पाहिजे; 'धर्मवृद्धीनें राज्यवृद्धि आहे,' '**धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळली पाहिजे**' असा समर्थांचा दंडक आहे.

(म) श्रीसमर्थांनीं आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण श्रीरामसेवेंत, परोपकारांत व महाराष्ट्रीय जनतेच्या उद्धारकार्यांत झिजवून वयाचे ७३ वे वर्षीं माघ वद्य ९ शके १६०३ सालीं शनिवारीं सज्जनगडावर देह ठेविला. 'आत्माराम दासबोध। माझें स्वरूप स्वतःसिद्ध' असे त्यांनीं शेवटीं उद्गार काढले त्याप्रमाणें श्रीदासबोध ही श्रीसमर्थांची वाङ्मयी मूर्ति आहे. दासबोधांत समर्थ आहेत. समर्थांची भेट पाहिजे असेल, त्यांचें मनोगत कळण्याची उत्कंठा असेल त्यानें दासबोध आपलासा करावा. **प्रयत्न, प्रचीति** व **प्रबोध** या तीन शब्दांत समर्थांच्या चरित्राचें व ग्रंथांचें सार आहे.

३ **श्रीसमर्थ रामदासस्वामी** पंचवटींत १२ वर्षें तपश्चर्या करून व भरतखंडभर १२ वर्षें तीर्थयात्रोद्देशानें फिरून वयाच्या ३६ व्या वर्षी म्ह० शके १५६६ मध्यें जगदुद्धारार्थ कृष्णातीरीं आले व ३६ वर्षें कृष्णातीरींच मुख्यत्वें राहून आणि हरिभजन व राजकारण करून व करवून त्यांनीं महाराष्ट्राचा उद्धार केला. जांब ही त्यांची **जन्मभूमि**, पंचवटीक्षेत्र ही **तपोभूमि** व सर्व भरतखंड ही त्यांची **कर्मभूमि** होय. गोदातीरीं अवतार घेऊन कृष्णातीर हें त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र केलें. समर्थ कृष्णातीरीं आल्यावर त्यांना दक्षिण महाराष्ट्रांत पहिल्याच वर्षी जे शिष्यभावानें अनुसरले, त्यांत कोल्हापूरचे पाराजीपंत बरवे कुळकर्णी हे एक होते. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. करवीरक्षेत्रीं समर्थ गेले असतांना पाराजीपंत समर्थांस शरण आले व त्यांनीं समर्थांचा अनुग्रहप्रसाद घेतला. तीर्थप्रसादाचे वेळीं एक दहा वर्षांचा चुणचुणीत मुलगा पूजासाहित्य व पाटरांगोळ्या उत्साहानें करीत असलेला त्यांनीं पाहिला व पूर्व ऋणानुबंधानें तो तात्काळ समर्थांच्या मनीं भरला. समर्थांनीं पाराजीपंतांस विचारिलें कीं, 'हा मुलगा कोणाचा कोण ?' यावर पंतांनीं उत्तर केलें कीं, 'हा माझा भाचा. याचें नांव अंबाजी. हा व याचा धाकटा भाऊ दत्तात्रय हीं दोन मुलें व त्यांची आई म्हणजे माझी बहीण हे त्रिवर्ग मजजवळच असतात. या मुलांचा बाप कृष्णाजीपंत कुळकर्णी बाभुळगांवकर हा माझा पूर्वीचा मातुळपुत्र. माझी बहीण कृष्णाजीपंतास दिली व तीस म्ह० रखमाबाईस कृष्णाजीपंतापासून हे दोन पुत्र झाले. कृष्णाजीपंत मूळचेच विरक्त होते. ते तीर्थयात्रेस गेले व काशीक्षेत्रीं राहून तेथेंच संन्यास घेऊन राहिले' ही हकीकत ऐकून समर्थ म्हणाले, 'हा अंबाजी आम्हांस द्यावा' पंत म्हणाले, 'त्रिवर्गाचें पोषण मात्र मी करितों पण मुलांवर माझी सत्ता नाहीं. मुलांची आई स्वतंत्र आहे.' यावर रखमाबाईस समर्थांनीं बोलावून घेतलें व मुलाची मागणी केली. समर्थ महापुरुष लोकोद्धारार्थ प्रगटले आहेत हें जाणून त्या माउलीनें भक्तिनम्र होऊन उत्तर केलें, 'महाराज ! अंबाजीसच नेतां आणि आम्हां दोघांस टाकितां ! तरी समर्थांनीं कृपा करून तिघांसही न्यावें. आम्ही तिघेंही शरण आहों व आपण शरणागतवत्सल आहांत.' यावर समर्थांनीं तिघांसही अनुग्रहप्रसाद दिला. वरील दोन मुलांपैकीं वडील अंबाजी तेच कल्याणस्वामी होत ! समर्थांजवळ राहून यांनीं समर्थांची अपूर्व सेवा केली ; हे आजन्म ब्रह्मचारी राहिले. हे समर्थांच्या कवितेचे लेखक.' डोमगांव येथील मठावर समर्थांनीं यांचीच स्थापना केली. निस्सीम गुरुसेवा केली कल्याणांनींच. समर्थांच्या महंतांतले अग्रेसर हेच. अंबाजींचे धाकटे बंधु दत्तात्रय यांना समर्थांनीं चाफळनजीक डोंगरापलीकडे शिरगांव आहे तेथील मठावर ठेविलें. समर्थांनीं यांना गृहस्थाश्रम दिला. डोमगांवमठपति **कल्याणस्वामी** (शके १५५७–१६२७) व शिरगांवमठपति **दत्तात्रयस्वामी** (शके १५६०–१६३८) हे उभयबंधु समर्थांचे एकनिष्ठ शिष्य होत. दत्तात्रयस्वामींचा कंठ मधुर होता व ते कोमळ मनाचे होते. ललिताचें काम समर्थांनीं त्यांजकडे दिलें होतें. अद्याप सज्जनगडीं शिरगांवमठांतून ललित होत असतें. उभयबंधु समर्थांच्या अतिनिकट व अतिप्रिय शिष्यांत प्रमुख होते. उभयतांच्या हातच्या श्रीदासबोधाच्या प्रती आज उपलब्ध आहेत.

४ श्रीसमर्थांनीं जगदुद्धारार्थ जी ग्रंथरचना केली, तींत '**दासबोध**' मुख्य होय. श्रीदासबोधग्रंथाची रचना केव्हां कशी झाली याविषयीं निर्बाध प्रमाणें अजून सांपडलीं नाहींत. द. ६ स. ४ मध्यें 'चारी सहस्र सातसें साठी । इतुकी कलयुगाची राहाटी' असा ७ व्या ओंवीचा प्रथमार्ध आहे. त्यावरून गतकलि ४७६० म्ह० शके १५८१ ह्या वर्षी ६ व्या दशकाच्या ४ थ्या समासापर्यंत दासबोधरचना झाली होती असें मात्र सिद्ध आहे, ७ व्या दशकाच्या शेवटीं 'सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा सेवट' (स. १०, ओंवी ४२) असें म्हटलें असून यापुढील ८ ओंव्या उपसंहारात्मकच आहेत. उदाहरणार्थ, 'जो ये ग्रंथींचा विवेक । विवंचून पाहे साधक । तयास सांपडे येक । निश्चयो ज्ञानाचा' (४५) व ज्ञान म्ह० अद्वैत, तेव्हां हा ग्रंथ अद्वैत-ज्ञानमय आहे असें या ग्रंथाचें स्वरूप समर्थांनीं येथें सांगितलें आहे. ह्यावरून त्यावेळीं दासबोध सात दशकांचाच होता असें वाटतें. ग्रंथारंभापासून सातव्या दशकाच्या अखेरीपर्यंत समर्थांना सांगावयाचें होतें तें सारें अध्यात्मक एका शिस्तीनें सांगितलें आहे, समासांतील व दशकांतील विषयांचा त्यांत अन्वय आहे, विचारांची साखळी आहे. मात्र कांहीं काळानंतर या सप्तदशकात्मक दासबोधांतील विषयपूर्तीसाठीं आठवा 'ज्ञानदशक' सांगून आठ

दशकांचा दासबोध त्यांनीं पुरा केला. पुढील ग्रंथांत वेगवेगळ्या प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर सांगितलेले कांहीं स्वतंत्र समास एकत्रित केले गेले आहेत. प्रत्येक समास म्हणजे एक स्वतंत्र व्याख्यान आहे. खरोखर पाहिलें तर २०० समासांचा दासबोध म्हणजे २०० व्याख्यानांचा एक संग्रह आहे. जे समास ओळीनें सांगितले गेले त्यांच्यांत अन्वय आहे. दासबोधाच्या उत्तरार्धांत बरेच समास इतके स्वतंत्र आहेत कीं मागच्या समासाचा पुढच्या समासाशीं कांहीं संबंध दिसत नाहीं, तथापि एवढें निश्चित आहे कीं, सारे २०० ही समास एकाच मुखांतून आले असून त्यांतील एकाही ओंवीला दुसऱ्या मुखाचा स्पर्श झालेला नाहीं; म्हणजे कांहीं समास भिन्नभिन्न प्रसंगीं व भिन्नभिन्न विषयांवर सांगितले गेले असले तरी आद्यंत सारा दासबोध एकाच म्हणजे समर्थांच्याच मुखांतून निघालेला आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. मायाजन्य नाना जिनसांतून एकजिनसी परब्रह्म जसें ओतप्रोत भरलेलें आहे, तसें नानाविध विषयांचें प्रतिपादन दासबोधांत केलेलें असलें तरी त्या सर्व प्रतिपादनांतून 'आधीं केलें मग सांगितलें' अशा लोकोत्तर अधिकाराच्या श्रीसमर्थांच्याच आत्मप्रचीतीचा रंग उधळलेला स्पष्ट दिसत आहे. माया आणि ब्रह्म, प्रपंच आणि परमार्थ, चौदा ब्रह्में आणि निश्चळ ब्रह्म, सर्व ब्रह्म आणि विमळ ब्रह्म, मूळ मायोद्भव आणि पंचप्रळय, सृष्टीची उभारणी आणि संहारणी, कुविद्या आणि सद्विद्या, करंटे आणि सदेव, बंध आणि मोक्ष, टोणपसिद्ध आणि खरे सिद्ध, संसाराचें रूप आणि सायुज्यमुक्तीचें स्वरूप, बाष्कळ आणि नेमक, जडचंचळ आणि निश्चळ, नवविधा भक्ति आणि चतुर्विधा मुक्ति, त्रिगुणवर्णन, त्रिविधतापवर्णन, बद्धादिचतुर्विधजन, असद्गुरु आणि सद्गुरु, असच्छिष्य आणि सच्छिष्य, बहुधाज्ञान आणि शुद्ध ब्रह्मज्ञान, विवेकवैराग्य, महंतलक्षण, निस्पृहलक्षण, कविकाव्यलक्षण, कीर्तनविषयक विविध विचार, शास्त्रधाटी आणि प्रचीति, सर्वविषयीं सावधपण, अंतरात्मलक्षण, महावाक्यविवरण, पंचीकरण, नानादेव—नानापंथ—नानामतें आणि एक मुख्य परमेश्वर आणि त्याची शुद्ध उपासना, लेखनविवरण आणि निरूपण, लोक राजी राखणें आणि आत्मनिवेदनरूप पराभक्तीचें स्वरूप या विविध विषयांचें दासबोधांत जें एकसूत्रीपणाचें विवरण आलें आहे, त्यावरून दासबोधांतील प्रत्येक अक्षरांत समर्थच भरून राहिले आहेत किंवा दासबोध ही समर्थांची वाङ्मयमूर्ति आहे याविषयीं स्वप्नांत सुद्धां शंका घेण्याचें कारण नाहीं. असा हा ग्रंथ एकमुखी, एकसूत्री, एकरस आहे, तरी कांहीं समास वेगवेगळ्या प्रसंगीं सांगितले गेले असून त्या समासांचा अंतर्भाव शेवटीं एका दासबोधग्रंथांत केला गेला आहे. मूळ दासबोध सात आठ दशकांचा असून पुढें विविध प्रसंगीं विविध समास सांगितले गेल्याचें स्पष्ट दिसत आहे. अशाच एका प्रसंगीं नवव्या दशकाचा ६ वा समास सांगितला गेल्यामुळें त्यांत 'हें दासबोधीं असे बोलिलें। ज्ञानदशकीं प्रांजळ केलें। मूळमायेंत दाखविलें। पंचभूतिक ॥ २ ॥' अशी ओवी येऊं शकली. समर्थांनीं शिवरायावर अनुग्रह केला त्यावेळीं त्यांस 'लघुबोध' सांगितला तो १३ व्या दशकांतला ६ वा समास होय. अफजुलखानाचा वध करून शिवबा समर्थांचे दर्शनास आले तेव्हां 'उत्तमपुरुषवर्णन' म्हणून शिवगौरवपर समास सांगितला तो १८ व्या दशकांतला ६ वा समास होय. विसावा दशक समर्थ निजधामास गेले त्या वर्षी म्ह० श. १६०३ मध्यें पुरा केल्याचें प्रसिद्ध आहे व तेव्हांच बहुधा पहिला प्रास्ताविक समास जोडला असावा. माझी एक कल्पना आहे ती येथें नमूद करून ठेवतों. अगदीं प्रथम म्ह० कृष्णातीरीं आल्यावर श. १५६८–७० मध्यें समर्थांनीं २१ समासी दासबोध सांगितला असावा. नंतर संप्रदाय वाढल्यावर तो फार त्रोटक आहे असें वाटून श. १५८०–८२ मध्यें सातदशकी दासबोध तयार झाला असावा. पुढें ८ वा दशक त्यास जोडला गेला असावा. नंतर शेवटीं शेवटीं अवांतर स्फुट समास, पण सामान्यतः आठ दशकांतील विषयांचाच अधिक परिस्फोट करणारे, असे त्यांत समाविष्ट करून वीस दशकांचा दासबोध समर्थांच्या प्रयाणापूर्वी म्ह० श. १६०२–३ मध्यें तयार झाला असावा. ही एक अटकळ आहे—सत्य मिथ्या कांहींही ठरल्यास मला सारखेंच आहे.

५ असो. दासबोध समर्थांच्या प्रयाणाच्या सुमारासच पूर्ण झाला हें खरें असल्यास शके १६०१–२ च्या पूर्वीची साग्र प्रत मिळणें दुर्घट दिसतें. डोमगांव मठांतील प्रतीप्रमाणें धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें म्ह० रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं शके १८२७ सालीं 'शुद्ध दासबोध' छापून महाराष्ट्रास सादर केला. त्याच्या आज १७ वर्षांत पांच आवृत्त्याही निघाल्या आहेत. दासबोधाची इतकी शुद्ध व सुंदर आवृत्ति यापूर्वी लोकांस मिळत

नव्हती, यामुळें रा. देवांचे सर्व लोकांवर थोर उपकार झाले आहेत. कल्याणस्वामींच्या हातची म्हणून परंपरेनें पूज्य मानलेली डोमगांव मठांतली अर्थात् धुळेकरांनीं छापलेली ही प्रत मूळाबरहुकूम तपासण्याच्या यशाचा वांटा देवांनीं मलाही दिला होता, व त्याच वेळीं डोमगावीं कल्याणस्वामींच्या सदर प्रतीशिवाय त्यानंतरच्या आणखी ३–४ प्रतीही आमच्या पाहाण्यांत आल्या होत्या. दासबोधाची माझी थोडी फार संगती आज ३० वर्षांची आहे. माझ्या मतें **ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध व तुकोबांचे अभंग** हे आपल्या मराठी भाषेंतील चार वेद आहेत. श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ, श्रीरामदास व श्रीतुकाराम हे चारही महामहंत भागवतधर्मप्रसारक आहेत. या चौघांनीं महाराष्ट्राला शुद्ध उपासनेचा म्ह० ज्ञानभक्तीचा ऊर्फ अद्वैतभक्तीचा मार्ग दाखविला आहे, यांतील अध्यात्मनिरूपण अगदीं एक आहे. प्रत्येकाचें कांहीं वैशिष्ट्य आहे, तथापि त्यांच्या भक्तिज्ञानवैराग्यांत व अध्यात्मबोधांत बिलकूल भेद नाहीं. देशकालवर्तमानानुसार, प्रकृतिस्वभावानुसार अथवा खरें म्हटलें तर भगवत्संकल्पानुसार त्यांच्या चरित्रांत अगर व्यवहारोपदेशपद्धतींत थोडाफार भेद दिसत असला तथापि भेद फुगवून सांगण्यापेक्षां अभेद कोठे आहे हेंच पाहाणें अधिक युक्त आहे असें मला वाटतें. असो. डोमगांवच्या मूळप्रतीप्रमाणें दासबोध धुळेकरांनीं प्रसिद्ध केला तो मला मान्य आहे, प्रिय आहे व पूज्यही आहे. त्यालाच थोडीशी पुस्ती जोडण्याचा योग आला तर तो कां दवडावा ? कल्याणस्वामीचे बंधु दत्तात्रेयस्वामीही समर्थांच्या कृपाछत्राखालीं वाढलेले असून यांच्या हातचा व यांच्या सहीशिक्क्याचा दासबोध ग्रंथ लष्कर-ग्वाल्हेर येथें आहे असें चारपांच वर्षांपूर्वी मुमुक्षूंत प्रसिद्ध झाल्यावरून मी शके १८४४ च्या आश्विनांत तेथें गेलो व मूळ ग्रंथावरून सारा दासबोध दोन महिने तेथें राहून तपासून घेतला. दत्तात्रेयस्वामींचे पुत्र राघव. राघवस्वामींचे पुत्र यशवंत, यशवंतस्वामींस पुत्र दोन–लक्ष्मण ऊर्फ अण्णाप्पामहाराज व भीमाजी (भक्तलीलामृतकार), अण्णाप्पामहाराजांचे पुत्र मनोहर ऊर्फ आबामहाराज. हे आबामहाराज शके १७७५ चे सुमारास लष्करास गेले. तेथें त्यांचा मोठा सत्कार झाला व त्यांनीं आपला मठ तेथें स्थापला. तो आबामहाराजांचा मठ म्हणून लष्करास प्रसिद्ध आहे. आबामहाराजांचे पुत्र यशवंत ऊर्फ बाळामहाराज व बाळामहाराजांचे पुत्र बापूसाहेब. बापूसाहेब विद्यमान असून संस्थान चालवीत आहेत. या संस्थानला तेथें शिंदे सरकारकडून पांच हजारांचें उत्पन्न आहे. दत्तात्रय–राघव–यशवंत–लक्ष्मण–मनोहर–यशवंत–बापूसाहेब अशी ही परंपरा असून बापूसाहेब हेच शिरगांवमठाधिपति आहेत व त्यांचे जवळच दत्तात्रयस्वामींच्या हातचा दासबोध आहे. हा ग्रंथ श्री. ह. प. बापूसाहेब महाराज यांनीं कृपा करून सौजन्यपूर्वक मला तपासण्यास दिला व ग्रंथ तपासण्याचें काम पूर्णपणें सिद्धीस गेलें. सहीशिक्क्यानिशीं निर्बाध असलेली हीच एक दासबोधाची प्रत आज उपलब्ध आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सदर प्रतीचे शेवटीं पुढील लेख आहे—

"।। श्रीरामदासस्वामींचा सेवक । दत्तात्रेय नामें लेखक ।
तेणें लीहीला ग्रंथनायक । दासबोध हा ।। १ ।।

शके सोळासें साहा १६०६ क्रोधननाम संवच्छरे भाद्रपद मासे शुक्लपक्षे नवमी शुक्रवारे तदीनी समाप्त । शुभं भवतु । श्रीरघुनाथार्पणमस्तु ।।"

६ आतां कल्याणस्वामींची म्हणून धुळेकरांनीं छापलेली प्रत व दत्तात्रयस्वामींची लष्करच्या मठांतील प्रत या दोन प्रतींत काय फरक आहे ? विशेष महत्त्वाचा फरक आहे असें नाहीं. दोन्ही प्रती शुद्ध आहेत व दोन्ही प्रती मिळून आपणांस दासबोधाचे शुद्ध पाठ मिळतात. शेंदोनशें पाठभेद, कांहीं लेखनभेद, एवढाच फरक आहे. हे पुढें दिले आहेत त्यावरून लष्करप्रतींतले बरेच पाठभेद अधिक सरस आहेत असें दिसून येईल. त्या वेळच्या लेखनपद्धतीचें वळण दोन्ही प्रतींना आहे. दोन्ही प्रतींत संस्कृत शब्दांचीं कांहीं अपभ्रष्ट रूपें आहेत. दोन्ही प्रतींचे लेखक समर्थांच्या संगतींत राहून परमार्थाचा थोर अधिकार प्राप्त झालेले उत्तम गुरुभक्त आहेत, तथापि प्रत्येकाच्या शुद्धलेखनाचें वळण त्याच्या प्रतीला लागलेलें आहे. दत्तात्रयस्वामींच्या प्रतीवर त्यांनीं स्वतःचें शिक्कामोर्तब केलें असून प्रतीचा लेखनसमाप्तिकाल शके १६०६ चा भाद्रपदमास दिला आहे हा या प्रतीचा विशेष आहे, म्हणजे सदर प्रत समर्थांच्या प्रयाणानंतर अडीच वर्षांनीं लिहून तयार झाली आहे. सारा दासबोध समर्थांचाच आहे कीं त्यांत मागाहून कोणी घुसडाघुसड केली आहे अशी शंका मागें एकदा रा. रा. भागवत यांनीं व अलीकडे भय्याशास्त्री देव यांनीं काढली होती, पण

या प्रतीनें त्या शंकेचें निर्मूलन केलें आहे. सारा दासबोध आद्यंत समर्थांच्याच मुखांतून निघाला आहे ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. डोमगांव येथील प्रत शिरगांवमठांतील प्रतीपूर्वी किंवा नंतर लिहिली गेली असली तरी उभयप्रतींच्या लेखनकालांत पांचचार वर्षांपेक्षां अधिक अंतर दिसत नाहीं. या दोन प्रतींना मूळ अशी एखादी तिसरी प्रत असेल काय? व असल्यास ती यापुढें उपलब्ध होण्याचा संभव आहे काय? कल्याणस्वामी समर्थांच्या कवितेचे लेखक होते ही गोष्ट प्रसिद्ध आहे, पण असें असलें तरी पहिल्या ७।८ दशकांचा दासबोध कल्याणस्वामींच्या हातचा वेगळा असण्याचा संभव आहे. पुढील भिन्नभिन्न स्फुट समास भिन्नभिन्न प्रसंगीं व प्राय: भिन्नभिन्न स्थळीं जे सांगितले गेले त्या **सर्व** प्रसंगीं व **सर्वस्थळीं** कल्याणस्वामीच लेखक होते यास प्रमाण काय? समर्थांचा संचार सर्वत्र असे, व जेथें ज्या स्थळीं ते असत तेथें रात्रीं आरतीधुपारतीनंतर श्रीरामरायाची सेवा ते निरूपणरूपानें करीत असत. पुष्कळ करुणाष्टकें, अभंग, पदें, सवाया, आरत्या अशा प्रसंगींच समर्थांच्या मुखांतून निघाल्या आहेत. जे स्फुट समास पुढें दासबोधांत अतर्भूत केले गेले तेही अशा प्रसंगींच निघाले असण्याचा संभव आहे. हें खरे असेल तर ते मूळ वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या शिष्यांनीं लिहिले असतील, व शेवटीं २०० समासांचा दासबोध करण्याचा संकल्प कायम झाल्यावर विसांव्याचा 'विसावा दशक' होऊन त्याच वेळीं समर्थांच्या सांगण्यावरून हे स्फुट समास त्यांत समाविष्ट केले गेले असतील. हें सर्व झाल्यावर वरील दोन्ही प्रती तयार झाल्या असल्या पाहिजेत.

७ 'सकळ सृष्टीची वर्ततीगती। सकळ तो वायो' (द. ९-८-१९) असा एका ओंवीचा अर्ध धुळें-प्रतींत आहे. यावर खालीं देवांची टीप आहे. "सकळ सृष्टीच वर्तती कळतो वायो अशीं चरणें प्रथम असून निराळ्या शाईनें प्रस्तुतची केलेली दिसतात." पण हींच प्रथमचीं अक्षरे शिरगांवप्रतींत आहेत! आणखी एक द. १३-२-२२ ही ओंवी पाहा, 'डहुळेना ना निवळेना। परब्रह्म तें' येथें धुळे-प्रतींत 'निवळेना' हें पद छापलें असून यावर "प्रथम 'वितुळेना' असें होतें त्याचें श्रीसमर्थांनीं 'निवळेना' केलें" अशी देवांनीं टीप दिली आहे. आतां शिरगांवप्रतींत 'वितुळेना' असाच पाठ आहे. अशीं आणखीं स्थळे दाखवितां येतील. 'समर्थांनी स्वहस्तें घातलेले' असे ज्या पाठांबद्दल देवांनीं म्हटलें आहे तेच पाठ शिरगांवप्रतींत कां नसावेत? समर्थांनीं स्वत: घातलेले पाठ दत्तात्रयस्वामी घेतल्याशिवाय राहते काय? कीं ही 'मूळप्रत' त्यांना मिळाली नव्हती? समर्थांचें अक्षर त्यांना ओळखवलें नाहीं हें म्हणणेंच शक्य नाहीं. कीं हे पाठ कल्याणप्रतीत १६०६ नंतर घातले गेले? याचें समर्पक उत्तर जें मिळेल तें मला मान्य होईल. माझा कोणताच आग्रह नाहीं. मला दोन्ही प्रती मान्य व पूज्य आहेत. पुढें डोमगांव व दत्तात्रयस्वामींची या दोन्ही प्रतीतले पाठभेद व लेखनभेद दिले आहेत. या दोन प्रतींपेक्षां मूळप्रत तिसरी एखादी निराळी असेल काय या दृष्टीनें कोणीं संशोधन केल्यास कोणीं सांगावें? कदाचित् कांहीं अपूर्व शोध लागतील. दासबोध संपूर्ण समर्थांचाच याविषयी मात्र नि:संदेहता ठेवावी.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

पुणें, मुमुक्षु कचेरी, विजयादशमी, शक १८४५

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

१ श्रीसमर्थांच्या कृपेनें सार्थ श्रीदासबोधाच्या पांच वर्षांत चार हजार प्रतींची महाराष्ट्रवाचकांस मेजवानी होऊन आतां दुसऱ्या समाराधनेची सुवर्णवेळा प्राप्त झाली याबद्दल आम्हांस आनंद होत आहे. श्रीसमर्थांचा दासबोध श्रीसमर्थांच्याच मुखानें ऐकावयाचें भाग्य ज्यांच्या वांट्यास आलें ते त्रिवार धन्य होत. चिदचित्ग्रंथी सोडविणारा दासबोधासारखा वरदीग्रंथ समर्थमुखानेंच ऐकावयास पाहिजे. सर्व सामान्य वाचकांस दासबोध ग्रंथ उलगडण्याच्या कामीं अल्पस्वल्प साह्य झाल्यास आमच्या श्रमाचें चीज होईल अशा नम्र भावनेनेंच आम्ही हा सार्थ ग्रंथ तयार केला व पुष्कळांकडून त्याबद्दल समाधानाचीं उत्तरेंही आलीं.

२ श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीसमर्थ हे योगानुभवांतही निष्णात होते हें काय आमच्यासारख्या योगज्ञानशून्यांनीं सांगावयास पाहिजे ? श्रीज्ञानोबारायांनीं आपलें योगैश्वर्य सत्यामळनाथासारख्या एखाद्याच शिष्यास सांगितलें व ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायांत जरी त्यांनीं आपलें योगज्ञान प्रगट केलें असलें तरी 'योगयागविधी येणें नोहे सिद्धी । वायांचि उपाधि दंभधर्म ॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा' असाच बोध प्राकृत जनांस केला आहे; त्याप्रमाणेंच श्रीसमर्थांनींही आपलें योगैश्वर्य जनांपासून लपवून समाधान हें 'नव्हे योगयागें नव्हे भोग त्यागें' मिळणारें आहे म्हणून 'हरे राम हा मंत्र सोपा जपारे' असाच बोध सर्वांस केला आहे. याचें कारण उघडच आहे. योगमार्गाचा अधिकार विरळ जनांचा आहे. समर्थांनीं तर आपल्या दासबोधादि लहान मोठ्या सर्व ग्रंथांत स्वतःच्या योगज्ञानाचा मागमूसही लागूं दिला नाहीं; तथापि त्यांच्या चरित्रांतल्या ज्या अनेक गोष्टी महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत त्यावरून समर्थ हे योगांतही पारंगत होते असें मनास वाटत होतें, व त्यास एक प्रत्यंतर पुरावा आज लोकांस देतां येत आहे.

३ श्रीसमर्थांनीं ५० ओव्यांचें छोटेंसें योगानुभवाचें प्रकरण श्रीकल्याणस्वामींसाठीं तयार केलें व तें आज प्रस्तुत सार्थ दासबोधाबरोबरच वाचकांस पाहावयास मिळत आहे. ह्या प्रकरणांत श्रीसमर्थांनीं आपला योगानुभव कल्याणासारख्या शिष्यश्रेष्ठास सांगून त्यास 'आपणासारिखे' केल्याचा दाखला आहे. ओव्या ४४, ४९ व ५० ह्या तीन ओव्यांवरून प्रस्तुत प्रकरण श्रीसमर्थांचें असून तें त्यांनीं कल्याणस्वामींकरितांच केलें आहे असें उघड दिसतें. बरें शेवटच्या ओवींत 'इति श्रीदासबोध ग्रंथ । त्यांतील हा सोलींव अर्थ' असें समर्थांनींच सांगितलें असल्यामुळें श्रीदासबोधाबरोबरच हें प्रसिद्ध करणें यांत औचित्य आहे असें वाटून हें प्रकरण प्रथमच प्रकाशांत आणण्याचें धाडस आम्ही करीत आहोंत.

४ ह्या प्रकरणावरील टीपा देण्याचे कामीं श्री. आण्णामहाराज आपदेव यांचें साह्य झाल्यामुळें त्यांचे आभार मानून प्रस्तुत ग्रंथ वाचकांच्या हातीं देत आहें.

साधुसंतांचा दासानुदास–
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर
संपादक 'मुमुक्षु', पुणें

माघ, शक १८५०

श्रीसमर्थकृत

सोलीव सुख

****

जयजयाजी सद्गुरुवर्या । पूर्णब्रह्म प्रतापसूर्या ।
तुज नमोजी आचार्या । करुणासिंधो ॥ १ ॥

जे भवसमुद्रीं पोळले । विषयमदें अंध जाहले ।
चौऱ्यांशींत[1] वाहूं लागले । मार्ग सुचेना तयांसी ॥ २ ॥

ऐसें विश्वें[2] बहुत बुडालें । मी जीव म्हणोनि धांवूं लागले ।
मुळींचें स्मरण विसरलें । मी कोण ऐसें ॥ ३ ॥

तयासी मुक्त करावया पूर्ण । तूं बा उतरलासि ज्ञानघन ।
रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिशी ॥ ४ ॥

ऐसें औदार्य तुझें सघन । म्हणोनि आलों मी शरण ।
दयार्णवा कृपा करून । मज दातारें तारावें ॥ ५ ॥

आपण[3] आपणातें पावे । ऐसें माझे मनीं बोलावें[4] ।
तें दातारें गोचर[5] करावें । रोकडें ब्रह्म ॥ ६ ॥

ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचें[6] भरतें आलें स्वामीलागोनी ।
आसन सांडोनियां तये क्षणीं । कडकडोनी भेटले ॥ ७ ॥

रे बाळका ! ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर[7] ।
माझे कंठीं बैसला[8] साचार । बरें घेई निजवस्तु ॥ ८ ॥

मग स्नेहाळें नवल केलें । वोसंगासी शिष्या घेतलें ।
अर्धमात्रा[9] रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्रीं ॥ ९ ॥

खडतर औषधी दिव्य रसायन । नयनीं झोंबलें जाऊन ।
डोळियाचा डोळा फोडून । चित्सूर्य भेदिले[10] ॥ १० ॥

---

१ चौऱ्यायशी लक्ष योनींच्या महापुरांत. २ असंख्य जीव. ३ ज्यां आपलें निजरूप पावावें. ४ विचारावयाचें आहे. ५ प्रत्यक्ष. ६ योगज्ञानाचें. ७ प्रश्नरूप दोर म्ह० लगाम. ८ मांडीवर. ९ अ उ म म्ह० तीन मात्रांचा जो ओंकार त्याचें म्ह० प्रणवाचें सार ज्याला महाकारण म्हणतात. १० कानांत ओतलेलें हें दिव्य रसायन त्याच्या नेत्रांत उतरलें व त्याला दिव्यदृष्टि आली व सूर्याच्या द्वारें वरील आकाशांत भेद करूं लागली.

पूर्ण अंशें गगनीं भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला ।
त्रिकूट श्रीहाट चुराडा केला । सेखीं भरला गगनगर्भी ॥ ११ ॥

उग्र तेज लखलखाट । तेथें जाला चौदेहांचा आटे ।
भ्रांति पडली बळकट । तेव्हां बाळ निचेष्टित पडे ॥ १२ ॥

ऐसें पाहोनि सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकीं ठेवित ।
वत्सा सावधे त्वरित । निजरूप पहा आपुलें ॥ १३ ॥

जागृत करोनि ते वेळीं । अजपांची दोरी देउनी जवळी ।
विहंगम डोल्हारीं तयेवेळीं । अलक्ष्यलक्षीं बैसविले ॥ १४ ॥

धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें ओढूनि सघट ।
धरें ऊर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदीं लक्ष लावी ॥ १५ ॥

पुढें करूनियां जाणिव । मागें सारोनि नेणिव ।
जे जे जाणिव अभिनव । ते तूं नव्हेसी तत्वता ॥ १६ ॥

तैं मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहतकोल्हाळ ॥ १७ ॥

आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळी ।
चंद्रज्योती प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ॥ १८ ॥

तें सुखं अंतरीं घेउनी । पुढें चाल करी संगमीं ।
तेथें विजुऐसा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥ १९ ॥

तेही जाणोनि मागें सारी । पुढें सूर्यबिंब अवधारी ।
ज्वाळीं निघती परोपरी । डंडळूं नको कल्पांतीं ॥ २० ॥

---

१ त्या दिव्याकाशांत सोहंचा उदय होऊन त्याच्या जीवरूप अंशानें सर्व विराट प्रकाशित झालें व त्रिकूट व श्रीहाट हे नाहींसे होऊन सोहं सर्वत्र दिसूं लागलें. २ स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चारही देह विरून गेले व देहभानविवर्जित होऊन शिष्य स्वरूपस्थितींत लीन झाला. ३ झाच स्वरूपानंदीं सावध होऊन रममाण हो. ४ देहभानावर आणून. ५ स्वरूपानुसंधान बळकट ठेवून. ६ विहंगममार्गानें नेऊन अलक्ष्याच्या पलीकडचें निर्वाणस्वरूपच त्याला करून सोडलें. ७ इंद्रियांचा पूर्ण संयम करून जो ऊर्ध्व सत्पथ त्या मार्गानें जाऊन स्वरूपीं स्थिर राहा असें सांगितलें. ८ घंटा, मृदु किंकिणी व तिसरा अनुहत असे नाद त्याला दाखविले. ९ वरच्या बाजूस लक्ष लावून पाहतां चंद्र चमकला व ब्रह्मसर्गाचा सारा व्यूह उभारला. १० तें सुख अंतरीं दृढ धरून व स्वरूपानुसंधान कायम ठेवून हळू हळू वर प्रवेश कर म्ह० सुवर्णवर्णाच्या अनंत विजा चमकल्याप्रमाणें होईल. ११ पुढें सूर्यबिंब दिसायला लागून त्याच्या चहूंकडून ज्वाळा पसरतील, पण तूं मात्र ढळूं नकोस, त्यांत गुरफटून राहूं नकोस.

वायोमुख करोनि तेथें । गिळी वेगें सूर्यकिरणांतें ।
मग देखसी आनंदमार्तंडातें । तेजोमय मम पुत्रा ॥ २१ ॥

अ[2]नंत भानु तेज अद्भुत । खदिरांगार ज्वाळा उसळत ।
धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट व्यूह तेथीचा ॥ २२ ॥

तेथें हुषारीचें काम । अ[3]भ्रीं लक्ष लावोनि नेम ।
तीरें लावोनि सुगम । मागें सारी सूर्यातें ॥ २३ ॥

पु[4]ढें दिसेल जें नवल । तें पाही हंसमेळ ।
चंद्रकिरण शीतळ । पाहसी तूं मम वत्सा ॥ २४ ॥

तेव्हां मागील दाह शमेल । शीतळाई सर्वांग होईल ।
चंद्रा[5]ंची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणें ॥ २५ ॥

तेचि डोळियाचा डोळां[6] पाही । देहातीत व[7]र्म विदेहीं ।
चिन्म[7]य सुखाची बवाई । भोगीं आपुले कीं गा ॥ २६ ॥

अनु[8]भवाची शीग भरली । आभ्रापरी उसळली ।
भूमंडळीं प्रभा पडली । कर्पूरवर्ण नभ जालें ॥ २७ ॥

तया मध्यभागीं सघ[9]न । अढळपद दैदीप्यमान ॥
उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ॥ २८ ॥

तें तुझें स्वरूप नेटेबोटें । जेथें समस्त जाण[10]णें आटे ।
ऐकें जालासी धिटे । बळकटपणें बलाढ्य ॥ २९ ॥

ऐसें सुख योगियां लाधलें । तेव्हां देहाचें मरण गेलें ।
सांगणें ऐकणें मुरालें । एकत्वपणें एकचि ॥ ३० ॥

---

१ तो ऊर्ध्वमुख झालेला श्वास त्या ठिकाणीं काकीमुखांतून वर नेऊन सभोंवार पसरलेलीं सूर्यकिरणें नाहींशीं करून टाक म्ह० आनंदसूर्यच सर्वत्र भरून राहील. २ अनंत सूर्यांचें व अनंत अग्नींचें तेज दिसूं लागेल. ३ मूळचें स्वरूप-धारणेचें निशाण चांगलें धर व तो सूर्यही मागें टाक. ४ सत्यस्वरूप परमात्मा पाहशील व त्याचा चंद्राप्रमाणें प्रकाश पसरेल. ५ तूंही चंद्राप्रमाणें कांतियुक्त व शीतळ होऊन राहशील. ६ तोच डोळियांचा डोळा होय. ७ तोच देहातीत परमात्मा होय. ७ तोच तूं होऊन त्याच्या अपरिमित सुखाचा भोग घे. ८ त्याचा स्वानुभवप्रकाश सर्वत्र व्यापून राहिला व आकाश श्वेतवर्ण झालें. ९ त्याच्या मध्यभागीं घनदाट अढळ परमात्मा–सर्व ब्रह्मांडाच्याही पलीकडचा आहे. १० तें तुझें शुद्धस्वरूप आहे. तेथें सर्व ज्ञानाची आटणी होते. ११ हें पूर्णसुख योग्यांनाच आकळलें.

शांती येऊनि माळ घाली । अलक्ष्यसेजे निजली ।
हंसपदें ऐक्य जाली । सुख सुखातें निमग्न ॥ ३१ ॥
तेथील अनुभव घेउनी । स्वानुभव पाहे कलटुनी ।
आला मार्ग ते क्षणीं । दिसेनासा जाला कीं ॥ ३२ ॥
त्रिकूट श्रीहाट गोल्हाट । बुडालें तें औटपीठ ।
इडा पिंगळा सुषुम्नातट । विराले ते स्वात्मसुखें ॥ ३३ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण । नेणों काय जालें महाकारण ।
इंद्रियें चुबकलीं जाण । धांव मोडली तयांची ॥ ३४ ॥
पंचभूतांचें खवलें । तयांचे ठावचि पुसले ।
अपरिमित आनंदले । निमग्न जाले सुखांत ॥ ३५ ॥
सखोल भूमिके ऐसें जालें । सुख सुखासी घोटलें ।
स्वयें आत्मत्व प्रगटलें । माझे देहीं रोकडें ॥ ३६ ॥
मग सहज समाधि जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन ।
हें सद्गुरूचें देणें । काय उत्तीर्ण म्यां व्हावें ॥ ३७ ॥
जरी स्तुती तयाची करावी । माझी मती नाहीं बरवी ।
अनिर्वाच्य गती बोलावी । परा वाचा कुंठित ॥ ३८ ॥
आतां जी मी लडिवाळपणें । तुमचे कृपेनें करितों स्तवन ।
सूर्यापुढें खद्योत जाण । तैशापरी बोल हे ॥ ३९ ॥
जयजयाजी करुणासिंधू । जयजयाजी भवरोगवैदू ।
जयजयाजी बाळबोधू । कृपाघना समर्था ॥ ४० ॥
जयजयाजी अविनाशा । जयजयाजी परेशा ।
जयजयाजी अध्यक्षा । दयार्णवा ॥ ४१ ॥
जयजयाजी पूर्णचंद्रा । जयजयाजी अलक्ष्यविहारा ।
जयजयाजी भवसिंधुभास्करा । आनंद प्रभु ॥ ४२ ॥

१ अखंड आत्मतृप्ती. २ तिनें अलक्ष्य सेजेवर वरिलें. ३ त्या स्वरूपानुभवांत शांतीचें व तुझें लग्न लागून तूं तिशीं समरसता पावलास. ४ येथवर येतांना त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, इडा, पिंगळा, सुषुम्ना—जें जें कांहीं वाटेंत लागेल तें तें सर्व स्वात्मसुखाच्या मूळपदीं आल्यावर मागें राहिलें—नाहींसें झालें. ५ त्या अफाट स्वात्मसुखाच्या भूमिकेवर.

तुझी स्तुती करितां सांग । वेदस्तुती जाले अव्यंग ।
तेथें प्राकृत मी कोंग । वर्णावया योग्य नव्हे ॥ ४३ ॥

कल्याण म्हणे जी रामदासा । माझा मुकेपणाचा ठसा ।
ते मोडोनि वसोंसा[2] । मज आपणाऐसें केलें ॥ ४४ ॥

ऐकोन मृदुवचन । कुरवाळलें तयालागुन ।
गुरुशिष्य हें बोलणें । उरलें नाहीं ते वेळीं ! ॥ ४५ ॥

एकपणें एकचि जालें । ऐक्यरूपीं सम मिळालें ।
करूनियां सुख उसळलें । नाहींपण जाउनी ॥ ४६ ॥

सुगरिणीचा पाक जाहला । नभाभाजनीं वाढिला ।
अक्षयपदीं सुगरावला[3] । संत जेवती स्वानंदें ॥ ४७ ॥

अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले ।
सिद्ध तरी डोलों लागले । बद्ध मुमुक्षु होताती ॥ ४८ ॥

यापरतें आन नाहीं बोलणें । श्रीराम दाशरथीची आण ।
एकपत्नी तो सुजाण । आपुलें पद दे दासा ॥ ४९ ॥

इति श्रीदासबोधग्रंथ । त्यांतील हा सोलीव अर्थ ।
श्रोते ऐकतां यथार्थ । समाधिस्थ होती ॥ ५० ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

१ कावळा. २ भ्रम. ३ एका परमात्मसुखानेंच रसाळ झाला.

ठळक पाठभेद

****

डोमगांव मठांतील प्रत	दत्तात्रेयस्वामींची प्रत
१ जयेसि स्तविती—	जयेस भजति १–३–१९
२ या वचनाचा—	ऐसिया वचनाचा १–३–२५
३ ह्मणौनि उपमा न साहे—	ह्मणौन हीण उपमा काय १–४–१६
४ काळांतरीं चळेना—	कल्पांतीं चळेना १–४–२८
५ संत विश्रांतीची विश्रांती—	संत मोक्षाची विश्रांती १–५–१७
६ ह्मणौन बोलतों सावकाश—	निःशंक बोले सावकास १–६–१६
७ सत्वधीर सत्वागळी—	शांतिरूप सत्वागळी १–८–२२
८ जेंही शोधून पाहिला । त्यासी अर्थ सांपडला—	त्यांसीच हा अर्थ सांपडला १–९–१२
९ जेणें परमार्थ वोळखिला—	जेणें परमात्मा वोळखिला १–९–२५
१० गिरिकंदरें सेविलीं—	लंघिलीं १–१०–२
११ पुरुषाचेनि अष्ट गुणें । स्त्रियांस ईश्वरी देणें—	ऐश्वर्य देणें २–१–४२
१२ नाहीं कळा नाहीं लाघव । रम्यसरस्वतीचें—	रमासरस्वतीचें २–४–२०
१३ पराचा करी घात—	पराव्याचा करी घात २–६–६
१४ तापस्यांचीं मनें—	तापसांचीं मनें २–७–२१ [वारी २–७–७५
१५ कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी—	कोणी येक जीवास मारी । तयास जाऊनियां
१६ नीतिन्याय उद्धट । तो पढतमूर्ख—	नीति नायके उद्धट । तो पढतमूर्ख २–१०–९
१७ नवमास बहुविपत्ती—	नवमास भोगिल्या विपत्ति ३–१–२९
१८ मागुतें मागुतें फुंजे रडे--	फुंदे रडे ३–२–६
१९ परस्त्री देखोनि दृष्टी—	देखतांचि दृष्टी । अभिलाष उठे पोटीं । ३–३–१६
२० आम्हांस कां ठेविलें । देवें वांज करूनी—	आम्हांस कासया ठेविलें । देवा वांज करूनी ३–३–३७
२१ द. ३ स. ६ मधील त्रिविधतापाचे ३ संस्कृत श्लोक शिरगांव प्रतींत अधिक शुद्ध आहेत.	
२२ त्यासी कैसें विसरावें—	चुकावें ३–१०–५५
२३ या कारणें नाना मतें । शोधित जावीं—	शोधून पाहावीं ४–१–२७
२४ जयंत्या उपोषणें नाना साधनें—	पूजाविधानें ४–१–३३
२५ कीर्तनें वाचा पवित्र	कीर्तनें दोषाचा देह पवित्र ४–२–२८
२६ नामस्मरण सांडूं नये—	नाम विसरोंचि नये ४–३–९
२७ गोप्य आसोनि भासे—	गोप्य वसोन भासे ४–४–१२
२८ समाधानें—	साधनें ४–४–१८
२९ ज्ञानमार्ग—	सन्मार्ग ४–४–२१
३० आर्चन–देवतार्चन ।	अर्चन–देवार्चन द. ४ स. ५ (सर्वत्र)
३१ नमस्कार घालावे--	करावी ४–६–७
३२ नमस्कारें मोडलीं जडती समाधानें-—	नमस्कारें मोडलीं सांदती समाधानें ४–६–१५
३३ आल्याचें करावें आतित्य—	आल्यांचें करावें आतित्य ४–७–२५
३४ म्हणोनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें—	म्हणोनि सख्य तरी खरेंचि करावें । हितगुज तयासीच सांगावें । ४–८–३१

३५ पाहतां तत्वविंवचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना । विश्वाकारें वेक्ती नाना । तत्वें विस्तारलीं ॥	पाहतां तत्व विवंचना । पिंडब्रह्मांडांची रचना । विश्वाकारें तत्वें नाना । व्यक्ती विस्तारल्या ॥ ४–९–१३
३६ वेष्टित राहिलें—	अंतरें वेष्टीत राहिले ४–१०–१४
३७ रोगव्याधीही असेना—	रोगव्याधी तरी असेचिना ४–१०–१९
३८ महत्वा न चढतेती—	महत्वा चढेना ५–१–४३
३९ जीवात्मयां परमात्मयांसी—	जिवात्मया शिवात्मयासी (ऐक्यता करी) ५–२–९

४० 'शिष्यास न लविती साधन । न करविती इंद्रियेंदमन । ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे'—या ओवींत 'करविती' बद्दल 'करिती,' 'आडक्याचे' बद्दल 'अडक्याचे' व 'त्यजावे' बद्दल 'टाकावे' आहे. ५–२–२१

४१ परलोकीचें सार्थक । तें दुऱ्हावें—	तें दुरी दुरावें ५–३–६
४२ विषयशक्तां ज्ञान जिरेल कैचें—	विषयासक्तां ज्ञान जिरेल कैचें ५–३–६२
४३ दीर्घसूत्री—	दीर्घदोषी ५–३–८१
४४ शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा । अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ॥	शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं परमार्थाचा । अनुताप आणि साधनाचा । मार्ग न धरी ५–६–८६
४५ मूर्तीची परीक्षा—	मूहूर्तांची परीक्षा ५–५–१६
४६ गृहांची—	ग्रहांची ५–५–१७ [पुनरुक्त होईल.
४७ संगीतकळा—	संकेतकळा ५–५–२८ ३० मध्यें आहे येथें
४८ सर्वसाक्षी अवस्था तुर्या—	सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या ५–६–६
४९ सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे—	दिवसेंदिवस समाधान । नेमस्त पावती ५–६–५३
५० बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षुपणीं नाहीं जाण—	नसती जाण ५–१०–११
५१ आपण आत्मा अंतरीं । बोध जाला—	अहमात्मा हा अंतरीं । बोध जाला ॥ ६–२–४१
५२ प्राणी संशयें गुंडाळला—	प्राणी संशयीं बुडाला ६–३–३४
५३ श्रोतीं क्षमा करावें—	श्रोतीं क्षमा केलें पाहिजे ६–३–३७
५४ लहानथोराचा निर्धार—	लाहान थोर हा निर्धार । जाणती ज्ञानी ६–४–१७
५५ श्रोते पुसती ऐसे—	श्रोतेन पुसिले ऐसे ६–५–१
५६ श्रोत्यावक्त्यांच्या—	श्रोतयावक्तयांच्या ६–५–१
५७ माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें—	अवीट तें ६–५–७
५८ उगाचि आला देहाभिमान—	पैसावला देहाभिमान ६–७–२७
५९ परंतु तेथें त्रिभाग—	पाषाण ६–८–१०
६० अविद्येचे यावे—	अविद्येचे गोवे ६–८–२५
६१ तथापि असो तुजला—	तथापि आझुनी तुला ६–८–३७
६२ गुप्तपरीस चिंतामणी । प्रगट खंडे कांचमणी—	गुप्त आहे चिंतामणी । हिरे परिसांचिया खाणी ६-९-११
६३ ब्रह्म सर्वांमध्यें विस्तारलें । अंशमात्रे—	ब्रह्म सर्वांमध्यें विस्तारलें । संचेलपणें ॥ ७–४–१५
६४ योगी जना येकांत—	योगीजनांचा एकांत । अनुभवें जाणावा ७–४–५२
६५ शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करी	क्षयो ७–५–२८
कल्पनेचा जयो । तुटोन गेला—	तुटोन जाये ७–५–२८
६६ श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी—	साधनांनी ७–८–८
६७ उपासन—	उपोशन ७–८–२४
६८ आतां श्रवण कैसें करावें । कोण्या पंथास पाहावें—	ग्रंथास पाहावें ७–८–५०
६९ जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणा—	कर्मणुक ७–९–५७

७० 'स्वर्गे मृत्यौच पाताले' ह्या श्लोक ६३वे ओंवीचे पुढें आहे— आधीं आहे ८–३
७१ शिरगांवप्रतींत द. ८ स. ४ मधील ओव्या ८ ते १३ दुबार लिहिल्या गेल्या आहेत.
७२ शिरगांवप्रतींत द. ८ स. ५ मध्यें बऱ्याच ओव्या मागें पुढें आहेत, पण कमजास्त नाहींत.

७३ दुश्चीत—	दुश्चित ८–६–१८ ते ३६ सर्व ठिकाणीं.
७४ बद्धन (बंधन ?) नाहीं म्हणोनिमुक्त—	बद्ध नाहीं म्हणोनि मुक्त ८–८–१६
७५ देव भक्त आपण जाला—	देव आपण भक्त जाला ८–८–२२
७६ देव भक्त दोनी येक—	देव भक्त मुळीं येक ८–८–२३
७७ शोकरहित—	स्वार्थरहित ८–९–३५
७८ द्वंद्वभेद—	द्वैतभेद ८–९–४२
७९ रेंद्यामध्यें—	इंद्रियांमध्यें ९–२–१४
८० घेईजे वाच्यांश—	शोधिजे वाच्यांश ९–२–२२
८१ येणेंचि न्यायें—	येणेंचि पाडें ९–३–३
८२ कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रांसी—	व्याप नाहीं वैभव नाहीं । कांहींच नाहीं पाहातां ९-४-१६
८३ हे च्यारी पिंडीचे देह जाण—	हे पिंडीचे देह चारी जाण ९–५–४
८४ सकळ गुण—	सप्तगुण ९–६–१९
८५ भूतें वेगळालीं दिसती । पाहतां येकचि भासती—	येकीं येकचि भासती ९–६–२५
८६ फळीं फुलीं लगडले । सावकाश—	पानीं फुलीं फळीं लगडले । सावकाश ९–६–४७
८७ खांद्या फोडून फळें पाहतां । वोलीं सालें—	खांद्यांचे ढलपे काढितां । ढलपेचि निघती ९–६–४८
८८ जळरूप फळ—	फळरूप जळ ९–६–४९
८९ पृष्ठिभागीं	पृष्ठीं चालती ९–७–४
९० मुकेल्याची अनुभवप्राप्ती । धाल्यास नाहीं—	धाल्याची अनुभवप्राप्ती । मुकेल्यास कैची ॥ ९–७–५६
९१ जंव्र येक सुवर्ण आणितां—	जव (जवाएवढें सूक्ष्म) येक सुवर्ण आणितां ९–९–३६
९२ वस्तु वृत्तीस कवळे—	वस्तु वृत्तीस न कवळे ९–९–३७
९३ जाणती याचें कौतुक—	जाण तयाचें कौतुक १०–१–२७
९४ संहारतो—	सितरतो १०–१–२७
९५ तैं जीवसृष्टि संहारेल—	आहाळेल १०–४–४३
९६ प्रचित—	साक्ष १०–६–३८
९७ सद्यप्रचीति रोकडी पाहावी—	रोकडी प्रचीती सद्य पावावी १०–७–५
९८ न्यायें सांडून न जावें । अन्यायमार्गें—	अन्याय सांडून जावें । न्यायपंथें १०–७–१२
९९ सर्व येकचि दिसती । अवघा येकंकार करिती—	'दिसती' बद्दल 'देखती' ११–१–३२
१०० जातो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान—	'जातो' बद्दल 'जाणतो' ११–१–३४
१०१ वरपंगचि जाला—	जडला ११–२–१९
१०२ सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां—	सुख म्हणउन आवडे । आळस लोकां ११–३–३०
१०३ प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग—	(आणि) नाना मार्ग । देवचि चालवी ११–४–५
१०४ संबंध पडों नेदावा । अति परी तयाचा—	अतिपरिचयाचा ११–५–८
१०५ बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें—	'बहुत' बद्दल 'अवघेंचि' ११–५–१८
१०६ तरी साहेब कुटील तयाला—	कुटिती तयाला । पाहाती लोक १२–१–५
१०७ पाहे विचारणा—	करी विचारणा १२–१–८
१०८ कामीं निकामी लोकां । बरें पाहे—	बरें जाणे १२–१–१९
१०९ सख्य—	सौख्य १२–२–१९

११० मीपण तें बुडालें—	मीतुंपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें १२–३–२८
१११ मेलीं—	मिडकलीं १२–७–११
११२ काय जीवेंसी—	हृदयीं धरावें १२–९–४
११३ विलग पडों नेदावें । कथेमधें—	विरंग पडों नेदावें कथेमध्यें १२–९–२०
११४ प्रळयेपावक वाढती—	येकवटती । चहूंकडे १३–४–६
११५ आत्मा जगेना—	तगेना १३–९–२
११६ भिक्षेसाठीं सांगों नये । परंपरा आपुली—	परमार्थ आपुला १४–१–५०
११७ प्रपंच प्रस्तीं जावों नये—	प्रपंच हस्तीं जावों नये १४–१–५२
११८ बहु लोकिक सांडूं नये—	बहु लोकीक कामा नये १४–१–६८
११९ नेमस्त गाणें—	तंतगाणें १४–४–५
१२० येक मन गुंतले स्वरीं—	येक मन तें गुंतलें स्वरीं १४–५–३४
१२१ उत्तम गुण घेईना—	उत्तम बोलों अभ्यासीना १४–६–११
१२२ नाहीं चंचळाचा वळसा—	नाना चंचळाचा वळसा १५–१०–१३
१२३ संध्यास्नान पूजाविधानें—	संध्यास्नान जपध्यानें १६–२–५
१२४ मेघ उठिले लोककाजा—	मेघ उठविती लोककाजा १६–६–११
१२५ सकळां ठायीं पुरवला—	विस्तारला । समर्थ वायु १६–६–२३
१२६ येकास येक सिंतरी—	सिंतरी हारी । १६–८–२२
१२७ तें निर्गुण ऐसें बोलिलें	तें निर्गुण ब्रह्मसें बोलिलें १६–९–१६
१२८ तरु—	तंतु १६–९–२०
१२९ ते जळें जाले—	तेजाळ जाले १६–१०–१९
१३० येकवीस सहस्र सासें जपा–	साहाशें जपा १७–५–१
१३१ जैसें लाखोलीचें धान्य । सगट मानितां अमान्य—	सगट मोजितां अमान्य १७–३–६
१३२ देह्याकरितां, देह्याचेन, देह्यामधें, देह्यावेगळा	देहांकरितां, देहाचेन, देहामध्यें, देहावेगळी द. १८ स. ४ सर्व ठिकाणीं.
१३३ रस चोवडिया कोण । शाहाणा सेवी—	सेवी १८–५–३०
१३४ त्यासी पुढें दुःख––	त्यापुढें दुख १८–७–५
१३५ विवेकें धरावें अर्थांतरीं—	विवेकें भरावें अर्थांतरीं १८–१०–१७
१३६ अन्यायाकडे—	अन्यायपंथें १८–१०–३०
१३७ विक्षेप—	विक्षेपकोप १९–७–२५
१३८ हिसेबझाडाचि पाहीना—	काढीना १९–९–३
१३९ कळकटेपणाची पदवी असो द्यावी—	असो न द्यावी १९–९–१२
१४० निसुगपण—	निःसंगपण १९–१०–२०
१४१ उपासना धुंडून वासना धरिली—	धुंडीनसी वासना धरिली २०–४–१५
१४२ पशुवीसलक्ष । तीसलक्ष स्थावर—	पशु तीस लक्ष । वीस लक्ष स्थावर २०–६–४।५
१४३ सूत्र—	यंत्र २०–८–२३
१४४ व्यापेंविण—	व्याप्येंवीण (कोण्याप्रकारें व्यापक म्हणावें) २०–१०–२३
१४५ दोनीसें समास—	दोनशें समास २०–१०–३२

ठळक लेखनभेद

डोमगांवमठांतील प्रत	दत्तात्रेयस्वामींची प्रत
१ क्षणक्ष्णा, क्ष्माकरी, क्ष्मावें, क्ष्माशीळ, क्ष्णभंगुर, प्रदक्ष्णा, लक्ष्णवंत—	क्षणक्षणा, क्षमाकरी, क्षमावें, क्षमाशीळ, क्षणभंगुर, प्रदक्षणा, लक्षणवंत
२ च्यारी खाणी च्यारी वाणी—	चारी खाणी चारी वाणी
३ अडथळे—	अडताळे
४ नीउन, न्यून—	निऊन्य, न्यून
५ जिवाची, जिवाचें	जीवाची, जीवाचें
६ अवस्ता, वेवस्ता—	अवस्था, वेवस्था (व्यवस्था)
७ आधेन—	अध्येन (अध्ययन)
८ अग्नी, लग्न, मग्न—	अग्नी (अग्नी), लग्न (लग्न), मग्न (मग्न)
९ हस्थी, शक्कटें—	हस्ती, शकटें
१० ह्मणौनी—	म्हणूनी, म्हणउनी
११ संपाधी—	संपादी
१२ मळियागरु—	मैलागरु (चंदन)
१३ बाह्होली—	बाहुली
१४ नारिकेळ—	नारेळ (नारळ)
१५ अवघ्यांची, पराव्यांची–	अवघियांची, परावियांची
१६ तापत्रैं—	तापत्रई
१७ ब्रह्मत्या—	ब्रह्महत्या
१८ अद्धम—	अधम
१९ कलौ चंडीविनायेका—	कलौ चंडीविनायका (कौ)
२० मधें—	मध्यें
२१ अस्तिमौंस, मांश—	अस्थिमांस
२२ प्रकृती—	प्रकुर्ती
२३ शरीरें, शरीरें—	शरीरें
२४ आवर्णवेड—	आवरणवेढे
२५ प्रळयोपावक—	प्रळयपावक
२६ वरिचावरी —	वरिच्यावरी
२७ सर्वविषीं —	सर्वविषई
२८ हीन —	हीण
२९ कित्येक —	कितेक
३० गुह्यराचे रंग —	गुहराचे रंग
३१ कर्त्यास —	कर्तयास
३२ निरार्थक —	निरर्थक
३३ मडें —	मढें
३४ मोनेंचि —	मौनेंचि, मौन्याचि
३५ स्थिती —	स्थीत
३६ वागविळास —	वाग्विळास (वाग्विलास)

३७ आत्मानात्माविवेक —	आत्मानात्मविवेक
३८ मिति —	मीत्री (मैत्री)
३९ भरम —	भ्रम
४० चर्मिका —	चर्मका (चांभारीण)
४१ उपाये अपाये —	उपाय अपाय
४२ श्रापदेह —	उश्रापदेह
४३ वौंश —	वंश
४४ कोण्ही —	कोणी
४५ वायूचे —	वायोचे
४६ वायदेव, वायेदेव —	वायुदेव, वायोदेव
४७ अन्हित —	अनहित
४८ स्फुर्ण, किर्ण —	स्फुरण, किरण
४९ सून्य —	शून्य
५० बाश्कळ —	बाष्कळ
५१ आश्चिर्य —	आश्चर्य
५२ नैवद्य —	नैवेद्य
५३ तश्कर —	तष्कर (तस्कर)
५४ सिंह्यासनावरी —	सिंहासनावरी
५५ श्वेद —	खेद

उभयप्रतींतील अशुद्धें

(संस्कृत नियमांप्रमाणें जे शब्द निर्विवाद अशुद्ध आहेत ते शब्द शुद्ध करून घेणेंच युक्त आहे. वाचकांच्या हातीं अशुद्ध पाठ देण्यांत कांहीं शहाणपण दिसत नाहीं. अशुद्ध तें अशुद्धच–मग तें लिहिणारा कोणीही असो. यानें त्याविषयींची पूज्यबुद्धि कमी होते असें मानण्याचें कारण नाहीं.)

अशुद्ध	शुद्ध	अशुद्ध	शुद्ध
१ मछ—	मत्स्य	१३ माहाक्रोधी—	महाक्रोधी
२ वाराह, वाऱ्हात्र—	वराह	१४ मोहोछाव—	महोत्सव
३ शृंघारिक—	शृंगारिक	१५ वग्त्रुत्व—	वक्तृत्व
४ श्रुंघारे—	शृंगारे	१६ सुचिस्मंत—	शुचिष्मंत
५ म्लेचि—	म्लेंच्छ	१७ अंतःकर्ण,	अंतःकरण,
६ मछर—	मत्सर	पुरश्चर्ण,	पुरश्चरण,
७ शड्गुण—	षड्गुण–	आवर्ण	आवरण,
८ सून्य—	शून्य	पंचीकर्ण,	पंचीकरण,
९ निर्शतां निर्शलें—	निरसतां निरसलें	किर्ण,	किरण
१० शैन्य—	सैन्य	स्फुर्ण,	स्फुरण,
११ शड्कर्मे—	षट्कर्में	विवर्ण	विवरण इ०
१२ उदेग—	उद्वेग	१८ स्वापद—	श्वापद

अशुद्ध	शुद्ध
१९ स्वान—	श्वान
२० ऊर्धमुखें—	ऊर्ध्वमुखें
२१ अधार्ध—	अधोर्ध्व
२२ सिधांत—	सिद्धांत
२३ तिक्षण	तीक्ष्ण
२४ स्वेतास्वेतास—	श्वेताश्वेतांस
२५ तुछय—	तुच्छ
२६ राशभी—	रासभी
२७ देवाल्याचे—	देवालयाचे
२८ जगदांतरीं—	जगदंतरीं
२९ पीड्याचे —	पिढ्यांचे
३० वेधना—	वेदना
३१ दीप—	द्वीप
३२ विदुल्यतांचें—	विद्युल्लतांचें
३३ युक्षदंड—	इक्षुदंड
३४ प्रसीध—	प्रसिद्ध
३५ अवेक्त—	अव्यक्त
३६ त्रुषा—	तृषा
३७ निलांजनें—	नीरांजन
३८ कुबुधी—	कुबुद्धि
३९ प्रजन्य—	पर्जन्य
४० निमिष्य—	निमिष
४१ जगोधार—	जगदुद्धार
४२ पष्ट—	स्पष्ट
४३ स्परुष—	स्पर्श
४४ आहिर्निशी—	अहर्निशी
४५ पिप्लीका—	पिपीलिका
४६ मानुभव—	महानुभव
४७ आधंऊर्ध—	अधऊर्ध्व, अधोर्ध्व
४८ कर्तुत्व—	कर्तृत्व
४९ युध्यास—	युद्धास
५० भोवानी—	भवानी
५१ क्षत्रदेव—	क्षेत्रदेव
५२ समशा—	समस्या
५३ माहावाक्यीं—	महावाक्यीं
५४ साहित—	साहित्य
५५ आशन—	अशन
५६ तदांशेंचि—	तदंशेंचि
५७ प्रतक्ष—	प्रत्यक्ष
५८ शुध—	शुद्ध
५९ आकोचन—	आकुंचन
६० जोतीरूप—	ज्योतिरूप

कमीजास्त ओंव्या

१ दशक ४ स. १ मध्यें 'श्रवणं कीर्तनं' ह्या श्लोकापुढील ओंवी '**श्रवण कीर्तन विष्णोः स्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । ऐसी हे नवविधा ॥ ६ ॥**' ही शिरगांवप्रतींत अधिक आहे. पुढील ओंव्या शिरगांवप्रतींत नाहींत —

२ द. १० स. ४ 'मनुष्यांची गौडविद्या' ही ३४ वी ओंवी.
३ द. १३ स. ४ 'जळोनि विरी सांडिली' ही ११ वी ओंवी.
४ द. १७ स. २ 'नाना नाणीं मोजून घेणें' ही ५ वी ओंवी.
५ द. १७ स. ५ 'उच्चारेविण जे शब्द' ही ८ वी ओंवी.
६ द. १९ स. ८ 'ऐसा आडळतां लोक' ही ७ वी ओंवी.
७ द. २० स. ६ 'जलजा नवलक्षाश्च' इ. २ संस्कृत श्लोक.
८ द. २० स. ७ 'कृत्रिम अवघें सांडावें' ही ३१ सावी ओंवी.
एकंदरींत कल्याणस्वामींच्या पांच ओंव्या अधिक आहेत.

सार्थ श्रीदासबोध

अनुक्रमणिका

(दत्तात्रयस्वामींच्या प्रतींत समासाचें नांव जेथें वेगळें दिलें आहे तें येथें कंसांत दाखल केलें आहे. दशकांवर नांवें बहुधा मराठी आहेत. 'दशक दुसरा मूर्खलक्षणांचा' इ. द्वितीय, तृतीय इ. बद्दल दुसरा, तिसरा असें लिहिलें आहे. तिसऱ्या दशकाचें नांव डोमगांवप्रतींत 'स्वगुणपरीक्षा' असें आहे. तें शिरगांवप्रतींत 'सगुणपरीक्षा' असें आहे व हेंच बरोबर आहे. 'सगुण' म्हणजे 'येर पंचभूतिक सगुण । नाशिवंत' (द. ६-२-८). तिसऱ्या दशकांत पंचभौतिकाचेंच जन्मापासून मृत्यूपर्यंत सारें वर्णन असल्यामुळें या दशकाला सगुणपरीक्षा हेंच नांव योग्य आहे.)

दशक नववा गुणरूपाचा

दशक दहावा जगज्जोतीचा

भीमदशक अकरावा

विवेकवैराग्यनाम दशक बारावा

नामरूप दशक तेरावा

दशक चौदावा अखंडध्याननाम

आत्मदशक पंधरावा

दशक सोळावा सप्ततिन्वयाचा

दशक सतरावा प्रकृतिपुरुषाचा

दशक अठरावा बहुजिनसी

दशक शिकवणनाम एकोणिसावा

पूर्णदशक विसावा

सांप्रदायिक मंगलाचरण

प्रत्यहीं स्नानसंध्यापूजादि नित्यकर्म केल्यावर श्रीदासबोधग्रंथाचे निदान दोन समास, मनोबोधाचे अकरा श्लोक व दोन करुणाष्टकें म्हणावींत. मननपूर्वक अर्थांतरीं भरून दोन समास तरी वाचावेत. श्रीदासबोधाचीं ११३ पारायणें करण्याचा संकल्प श्रीगुरुचरणीं करून दरएकादशीस नव्या पारायणास आरंभ करावा. पंधरा दिवसांत पारायण पुरें व्हावें हा उत्तम मार्ग. रोज नियमित समास वाचण्यापूर्वी पुढीलप्रमाणें मंगलाचरण करावें—

गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा ।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ॥ १ ॥

गणेश शारदा सद्गुरु । संत सज्जन कुळेश्वरु ।
सर्वही माझा रघुवीरु । सद्गुरुरूपें ॥ २ ॥

माझें आराध्य दैवत । परमगुह्य गुह्यातीत ।
गुह्यपणाची मात । न चले जेथें ॥ ३ ॥

यो जातो मरुद्वंशजो क्षितितले संबोधयन् सज्जनान्
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्व विदुषां स्वांतापहारिः सदा
सोयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः ॥ ४ ॥

शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्गुरुरामदासा ॥ ५ ॥

मला वाटतें अंतरीं त्वां वसावें ।
तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें ।
अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा ।
महाराजया सद्गुरो रामदासा ॥ ६ ॥

वाचन पुरें झाल्यावर दासबोधाच्या उपसंहारांतील बारा ओव्या— 'जालें साधनांचें फळ' येथपासून तों 'जगदीश्वरें अनुक्रमें । सकळ केलें' येथपर्यंत — पाठ म्हणून दासबोधाची आरती करावी.

डोमगांवमठ—कल्याणस्वामींची प्रत


कें प्रचित पाहाणें। प्रचित पाहे तें शाहाणे। अन्यथा नव्हे २५ सप्रचित आणी अनुमान। उधार आणी रोकडें धन। मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन। यांस महदांतर २६ पुढें जन्मांतरीं होणार। हा तों अवघा च उधार। तैसा नव्हे सारासार। तत्काळ लाभे २७ तत्काळ चि लाभ होतो। प्राणी संसारीं सुटतो। संशय अवघा चि तुटतो। जन्ममरणाचा २८ या चि जन्में येणें चि काळें। संसारीं होईजे निराळें। मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें २९ ये गोष्टीस करी अनुमान। तो सिद्ध चि पावेल पतन। मिथ्या वदे त्यास आण। उपासनेची ३० हें येथार्थ ची आहे बोलणें। विवेकें सीघ्र चि मुक्त होणें। असोनी कां


****
****

ग्वाल्हेरचा आबामहाराजांचा मठ-शिरगांव मठांतील दत्तमहाराजांची प्रत

– – – – – – कें प्रचीत पाहाणें ॥ प्रचीत पाहे ते शाहणे ॥ अन्यथा नव्हे ॥ २५ ॥ सप्रचीत आणी अनुमान ॥ उधार आणी रोकडें धन ॥ मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन ॥ यांसी महदंतर ॥ २६ ॥ पुढें जन्मांतरीं होणार ॥ हा तों अवघाच उधार ॥ तैसा नव्हे सारासार। तत्काळचि लाभ ॥ २७ ॥ तत्काळचि लाभ होतो ॥ प्राणी संसारीं सुटतो ॥ संशयो अवघाचि तुटतो ॥ जन्ममरणाचा ॥ २८ ॥ येचि जन्में येचि काळें। संसारीं होईजे नीराळें। मोक्ष पाविजे निश्चळें ॥ स्वरूपाकारें ॥ २९ ॥ ये गोष्टीस करी अनुमान ॥ तो सिद्धचि पावेल पतन। मिथ्या वदे त्यास आण। उपासनेची ॥ ३० ॥ हें येथार्थचि आहे बोलणें ॥ विवेकेंचि सीघ्र मुक्त होणें ॥ असोनी कां—————

—द. ६, म. ९





॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक प्रथम स्तवनांचा ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ । श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ १ ॥ ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ २ ॥ नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण । बहुधा अध्यात्मनिरोपण । निरोपिलें ॥ ३ ॥ भक्तिचेनयोगें देव । निश्चयें पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इयें ग्रंथीं ॥ ४ ॥ मुख्यभक्तीचा निश्चय । शुद्धज्ञानाचा निश्चय । आत्मस्थितीचा निश्चय । बोलिला असे ॥ ५ ॥ शुद्धउपदेशाचा निश्चय । सायुज्यमुक्तीचा निश्चय । मोक्षप्राप्तीचा निश्चय । बोलिला असे ॥ ६ ॥ शुद्धस्वरूपाचा निश्चय । विदेहस्थितीचा निश्चय । अलिप्तपणाचा निश्चय । बोलिला असे ॥ ७ ॥ मुख्यदेवाचा निश्चय । मुख्यभक्ताचा निश्चय । जीवशिवाचा निश्चय । बोलिला असे ॥ ८ ॥ मुख्यब्रह्माचा निश्चय । नाना मतांचा निश्चय । आपण कोण हा निश्चय । बोलिला असे ॥ ९ ॥ मुख्यउपासनालक्षण । नानाकवित्वलक्षण । नानाचातुर्यलक्षण । बोलिलें असे ॥ १० ॥ मायोद्भवाचें लक्षण । पंचभूतांचें लक्षण । कर्ता कोण हें लक्षण । बोलिलें असे ॥ ११ ॥

श्रोत्यांनीं प्रश्न केले, "महाराज! हा ग्रंथ कोणता? या ग्रंथांत काय सांगितलें आहे? व याच्या श्रवणानें श्रोत्यांना फलप्राप्ति कोणती होते?" (१). या तीन प्रश्नांचीं उत्तरें या समासांत पुढें क्रमानें दिलीं आहेत. ह्या ग्रंथाचें नांव 'दासबोध' हें असून ह्यांत भक्तिमार्ग स्पष्ट व सुलभ करून सांगितला आहे, यांत नवविधाभक्ति, ज्ञान व वैराग्य यांचीं लक्षणें दिलीं आहेत व बहुत प्रकारेंकरून अध्यात्माचें निरूपण केलें आहे (२–३). भक्तियोगानें मनुष्यांना निश्चयानें देवाची प्राप्ति होते हें या ग्रंथाचें रहस्य आहे (४). ह्या ग्रंथांत निश्चयात्मक सिद्धान्त सांगितले आहेत. मुख्य भक्ति व शुद्धज्ञान यांचा निश्चय सांगितला आहे. आत्मस्थिति कशाला म्हणतात, शुद्ध उपदेश कोणता, सायुज्य मुक्ति कोणती, मोक्षाचें स्वरूप काय, शुद्ध स्वरूप कशाला म्हणतात, विदेह स्थिति व अलिप्तपणा यांचें लक्षण काय, मुख्य देव कोणता, मुख्य भक्त कोणता, जीवशिवांचा संबंध व स्वरूप काय, मुख्य ब्रह्म कशाला म्हणतात, नाना मतें कोणतीं व आपण कोण याबद्दल या ग्रंथांत निश्चयात्मक निरूपण केलें आहे (५–९). मुख्य उपासना, कवित्व, चातुर्य, मायोद्भव, पंचभूतें यांचीं लक्षणें सांगून 'कर्ता कोण?' याचाही उलगडा येथें केला आहे (१०–११).

नाना किंत निवारिले । नाना संशयो छेदिले । नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ॥ १२ ॥ ऐसे बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भीं जें बोलिलें । तें अवघेंचि अनुवादलें । न वचे कदा ॥ १३ ॥ तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केला विशद । जे जे दशकींचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला ॥ १४ ॥ नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित ॥ १५ ॥ नाना संमती अन्वये । म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां ॥ १६ ॥ मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उच्छेदती । नाना ग्रंथांच्या संमती । भगवद्वाक्यें ॥ १७ ॥ शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता । उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणी वेदांत ॥ १८ ॥ भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता । गणेशगीता यमगीता । उपनिषदें भागवत ॥ १९ ॥ इत्यादिक नाना ग्रंथ । संमतीस बोलिलें येथ । भगवद्वाक्यें यथार्थ । निश्चयेंसीं ॥ २० ॥ भगवद्वचनीं अविस्वासे । ऐसा कवण पतित असे । भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथीचें ॥ २१ ॥ पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण । तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ॥ २२ ॥ अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार । पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥ २३ ॥ ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला । अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ॥ २४ ॥ कामक्रोधें लिथाडिला । तो कैसा

येथें नाना प्रकारच्या शंका, आशंका, संशय फेडिले आहेत; अनेक प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत (१२). हें सर्व ग्रंथांत त्या त्या स्थळीं स्पष्ट विवरण करून सांगितलें आहे, त्या सर्व विषयोपविषयांचा येथें उल्लेख करितां येत नाहीं (१३). विषयांच्या स्पष्ट मांडणीसाठीं दासबोधाचे दशकवार भाग पाडून त्या त्या दशकांत काय सांगितलें आहे हें जेथल्या तेथेंच दाखविलें आहे (१४). हें सर्व सांगतांना वेदवेदान्तादि अनेक ग्रंथांच्या संमति घेतल्या आहेत, शास्त्रसिद्धान्त आत्मप्रचीतीसह सांगितले आहेत (१५). अनेक ग्रंथांधारें हें प्रतिपादन केलेलें असल्यामुळें याला मिथ्या किंवा काल्पनिक म्हणतां येणार नाहीं. तथापि (हातच्या कांकणाला आरसा कशाला या म्हणीप्रमाणें) याचा श्रोत्यांना लवकरच प्रत्यय येणार आहे (१६). मत्सरी क्षुद्र पुरुष याला मिथ्या म्हणतील तर यांतील प्रतिपादन अनेक ग्रंथांधारें व भगवद्वाणीच्या आधारें केलें असल्यामुळें त्या सर्व ग्रंथांसच मिथ्या म्हणावें लागेल (१७). शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता, भगवद्गीता, वेद, वेदान्त, उपनिषदें, भागवत, इत्यादि नाना ग्रंथांच्या संमति येथें घेतल्या आहेत. भगवद्वचनें यथार्थ आहेत याविषयीं काय शंका आहे? भगवद्वचनावर अविश्वास ठेवील असा पतित कोण आहे? भगवद्वाक्यावांचून या ग्रंथांत वेगळें कांहीं सांगितलें नाहीं. (१८–२१), आद्यंत समग्र ग्रंथ पाहिल्यावांचून जो ग्रंथास दोष लावील तो दुरात्मा, दुरभिमानी व मत्सरी म्हटला पाहिजे. माझेंच खरें असा म्हणणारा हेकाड पुरुष तो. अभिमानानें मत्सर उठतो, मत्सरानें दुसऱ्याच्या सांगण्याविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो, त्यामुळें प्राणी क्रोधवश होतो. याप्रमाणें दुर्विकारांच्या स्वाधीन होऊन अंतरीं नासलेला प्राणी, त्याला भला कोण म्हणेल? देवांच्या पंक्तींत अमृत वाढीत असतांना पोटीं कपट ठेवून राहू बसला पण अखेर त्याला

म्हणावा भला ? । अमृत सेवितांच पावला । मृत्य राहो ॥ २५ ॥ आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें । परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम ॥ २६ ॥ मागां श्रोतीं आक्षेपिलें । जी ये ग्रंथीं काय बोलिलें । तें सकळही निरोपिलें । संकळित मार्गें ॥ २७ ॥ आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ । तुटे संशयाचें मूळ । येकसरां ॥ २८ ॥ मार्ग सांपडे सुगम । नलगे साधन दुर्गम । सायुज्यमुक्तीचें वर्म । ठाईं पडे ॥ २९ ॥ नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फळश्रुती । ईये ग्रंथीं ॥ ३० ॥ योगियांचें परम भाग्य । आंगीं बाणे वैराग्य । चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित ॥ ३१ ॥ भ्रांत अवगुणी अवलक्षण । तेचि होती सुलक्षण । धूर्त तार्किक विचक्षण । समयो जाणती ॥ ३२ ॥ आळसी तेचि साक्षपी होती । पापी तेचि प्रस्तावती । निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी ॥ ३३ ॥ बद्धचि होती मुमुक्ष । मूर्ख होती अति दक्ष । अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ॥ ३४ ॥ नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती । प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ॥ ३५ ॥ नाना धोके देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे । नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ॥ ३६ ॥ ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती । मनास होय विश्रांती । समाधान ॥ ३७ ॥ जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा । मत्सर धरी जो पुंसा । तयास तेंचि प्राप्त ॥३८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

ओळखून श्रीविष्णूनें त्याचा शिरच्छेद केला; त्याप्रमाणें अभिमानमत्सरादि विकारांची घाण पोटीं ठेवून कोणी ग्रंथश्रवणास बसले तर त्याला हें अमृत पचणार नाहींच उलट तो आपल्याच पापानें मरेल. असो. या मत्सरी श्रोत्यांविषयीं बोलणें पुरे झालें. श्रोते आपापल्या अधिकाराप्रमाणें ग्रंथ ऐकतीलच, पण निरभिमानानें ग्रंथश्रवण करावें, तरच श्रवणापासून लाभ होतील. या ग्रंथांत काय सांगितलें आहे तें येथवर थोडक्यांत सांगितलें (२२–२७). आतां श्रवणफल सांगतों. जो निर्मळ मनानें दासबोध ग्रंथाचें श्रवण करील त्याचे सर्व संशय उच्छिन्न होऊन त्याची क्रिया पालटेल, मोक्षमार्ग सुलभ रीत्या सापडेल — त्याला दुसऱ्या बिकट साधनांची वाट धरावी लागणार नाहीं — त्याला सहज सायुज्यमुक्तीचें रहस्य समजून येईल; दुःख, अज्ञान व भ्रांति यांचें निरसन होऊन तात्काळ ज्ञानलाभ होईल; ह्या ग्रंथाच्या श्रवणाची ही फलश्रुति आहे (२८–३०). श्रवणापासून आणखी कोणते लाभ होतील तें पहा. योग्यांचें परम भाग्य जें वैराग्य तें अंगीं बाणेल, विवेक व चातुर्य यथार्थ कळतील, श्रोता भ्रांत म्ह. संशयग्रस्त, अवगुणी व अवलक्षणी असेल तर हे त्याचे दोष जाऊन तोच सुलक्षणी, धूर्त, चतुर व समयज्ञ होईल. आळशी असतील ते उद्योगी होतील, पापी पश्चात्ताप पावून शुद्ध होतील, भक्तिमार्गाचे निंदक भक्तिमार्गाचीच प्रशंसा करूं लागतील. बद्धाचे मुमुक्षु, मूर्खाचे अतिदक्ष व अभक्ताचे भक्त होऊन मोक्ष पावतील. ह्या ग्रंथाच्या श्रवणानें चित्ताचे विकल्पादि दोष जातील, पतित तेच पावन होतील, तात्पर्य, श्रवणमात्रेंकरून प्राणी उत्तम पद पावतील. देहबुद्धीमुळें येणारे धक्के चुकतील, सकळ संशय छिन्न होतील, संसाराचे उद्वेग वाटणार नाहींत. ह्या ग्रंथश्रवणानें या प्रकारचे लाभ होतील. थोडक्यांत सांगायचें म्हणजे श्रवणानें अधोगति चुकून मनाला विश्रांति व समाधान मिळेल (३१–३७). जो जसा भावार्थ धरील त्यास तसें फळ मिळेल. जो जसा मत्सर बाळगील त्याला कुत्सितच फळ मिळेल (३८). [द० १, स० १]

॥ श्रीराम ॥ ओंनमोजि गणनायका । सर्वसिद्धिफळदायका । अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १ ॥ माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें । मज वाक्शून्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥ २ ॥ तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें । आणी विश्वभक्षकें काळें । दास्यत्व कीजे ॥ ३ ॥ येतां कृपेची निज उडी । विघ्नें कांपती बापुडीं । होऊनि जाती देशधडी । नाममात्रें ॥ ४ ॥ म्हणोनि नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचें माहेर । आदिकरूनी हरिहर । अमर वंदिती ॥ ५ ॥ वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी । आघात अडथाळें उपाधी । बाधूं सकेना ॥ ६ ॥ जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ॥ ७ ॥ सगुणरूपाची ठेव । महा लावण्य लाघव । नृत्य करितां सकळ देव । तटस्थ होती ॥ ८ ॥ सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदें डुल्लत । हरुषें निर्भर मुदित । सुप्रसन्नवदनु ॥ ९ ॥ भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहाप्रचंड । विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला ॥ १० ॥ नाना सुगंध परिमळें । थबथबां गळती गंडस्थळें । तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकारशब्दें ॥ ११ ॥ मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें । लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्षणा मंदस्त्वी । ॥ १२ ॥ चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी । लवलवित फडकावी । फडे फडे कर्णथापा ॥१३॥ रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ । कुंडलें तळपती

ॐ नमोजी गणनायका ! गणाधीशाला नमन असो. देवा ! तूं सर्व सिद्धीचें फळ देणारा, अज्ञानाचें आवरण दूर करणारा, ज्ञानस्वरूप असा आहेस (१). माझ्या अंतरीं भरून तूं सर्वकाळ येथेंच रहा व कृपादृष्टीनें अवलोकून मज वाङ्मूढाला वाक्स्फूर्ति दे (२). तुझ्या कृपाबळानें अज्ञानाचे ढग वितळतात व विश्वभक्षक काळ दास होतो (३). तूं कृपेची उडी घातलीस कीं विघ्नें दुर्बळ होऊन चळचळां कांपूं लागतात व तुझ्या नामस्मरणाबरोबर दूर सरतात. म्हणून तुला विघ्नहर्ता म्हणतात. तूं आम्हां अनाथांचें माहेरघर (उगमस्थान) आहेस. हरिहरादि तुझ्या पायीं लागतात (४।५). मंगलांचें तूं मंगल आहेस, तुला स्मरून कोणतेंही कार्य केलें कीं सिद्धीस जातें, आघात किंवा उपाधि यांची पीडा होत नाहीं (६). तुझ्या स्वरूपाचें ध्यान करतांच परमसमाधान वाटतें, इतर सर्व इंद्रियांतून निघून मन डोळ्यांत येऊन बसतें (७). आतां तुझ्या सगुणरूपाचें वर्णन करितों. तुझें लावण्य, तुझें कौशल्य, तुझें नृत्य पाहतांच देव तन्मय होतात (८). तूं सदा ब्रह्मानंदानें मस्त होऊन डोलत असतोस. हर्षनिर्भरतेमुळें तूं सर्वकाळ सोल्हास व प्रसन्नवदन असतोस (९). तुझें रूप भव्य असून मूर्ति प्रचंड (बलिष्ठ द्रढिष्ट अशी) आहे. तुझ्या विशाल भाळावर सुंदर शेंदूर चर्चिला आहे. तुझ्या गंडस्थळांतून जो सुगंधस्राव होत असतो तेथें भ्रमरांच्या झुंडी गुंजारव करीत येऊन बिलगत आहेत. सुंदर सरळ मुरडलेली तुझी सोंड, तुझें तें मनोहर गंडस्थळ, तेथून तो तीक्ष्ण थिबकणारा मदस्राव, ते विशाल अधरोष्ठ, यांची शोभा काय वानावी ? (१०।१२). तूं चौदा विद्यांचा स्वामी असून तुझ्या बुद्धिमत्तेचे द्योतक असे तुझे ऱ्हस्व (सूक्ष्म-बारीक) डोळे तूं जेव्हां उघडतोस व मिटतोस तेव्हांच्या तुझ्या डोळ्यांची उघडझांप ; तसेंच तुझ्या मृदु अशा कानांचें फडफड करणें ; तुझ्या रत्नखचित मुगुटाची प्रभा ; त्यांची नाना रंगांची चोहोंकडे फांकणारी दीप्ति ; वर जडलेल्या नीळ मण्यांच्या तेजाचें तळपणें व कानांतील कुंडलें ;

नीळ । वरी जडिले झमकती । ॥ १४ ॥ दंत शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु । ॥ १५ ॥ लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ॥ १६ ॥ चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर । फडके दोंदिचा फणीवर । धुधुकार टाकी । ॥ १७ ॥ डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालुन बैसला वेंटाळी । उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ॥ १८ ॥ नाना-याति कुसुममाळा । व्याळपरियंत रुळती गळा । रत्नजडित हृदयकमळा- । वरी पदक शोभे ॥ १९ ॥ शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ । येके करीं मोदकगोळ । तयावरी अतिप्रीति ॥ २० ॥ नट नाट्य कळांकुसरी । नाना छंदें नृत्य करी । टाळ मृदंग भरोवरी । उपांग हुंकारे ॥ २१ ॥ स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविषईं अग्रगण । साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ॥ २२ ॥ रुणझुणां वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें । घागरियासहित मनोहरें । पाउलें दोनीं ॥ २३ ॥ ईश्वरसभेस आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा । साहित्यविषईं सुलभा । अष्टनायका होती ॥ २४ ॥ ऐसा सर्वांगें सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु । त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ॥ २५ ॥ ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होय भ्रांता । गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ॥ २६ ॥ जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती । असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ॥ २७ ॥ जे मूर्ख अवलक्षण

तुझे बळकट व सोनेरी दांत आणि त्यांच्या मुळाशीं नाजूक बसलेलीं तगटें; तुझें विशाल थलथलित पोट; तुझ्या कमरेच्या घुंगुरांचे बारीक मणि व मंदमंद झणत्कार करणाऱ्या घुंगुरांचा कमरपट्टा; तुझे चार भुज व विशाल उदर; तुझ्या कमरेचा कास घातलेला पीतांबर; तुझ्या दोंदावरचा फूत्कार टाकीत डोलणारा, व जिव्हा बाहेर काढून वेटाळें घालून बसलेला व नाभीकमळाच्या ठिकाणीं फडा वर करून टकमकां पाहणारा तो नाग; नागापर्यंत तुझ्या गळ्यांत नाना जातींच्या फुलांच्या रुळणाऱ्या माळा; व वक्षस्थळावरचें रत्नखचित पदक: ह्या तुझ्या सगुण मनोहर रूपाचें वर्णन म्यां कसें करावें ? (१३।१९). तुझ्या एका हातांत परशू, दुसऱ्या हातांत कमळ, तिसऱ्या हातांत तीक्ष्ण धारेचा व चमचमणारा असा अंकुश व चौथ्या हातांत तुझ्या अत्यंत प्रीतीचा गोलाकार मोदक आहे (२०). तुझें कळाकुसरीचें म्ह. कौशल्ययुक्त तालसुरांसहित चाललेलें नटनाट्य; नृत्याच्या वेळीं उठणाऱ्या हुंकाराचा तो मंजुळ ध्वनि; व याला टाळमृदंगादि वादनसाहित्याची जोड; क्षणभरहि पाय किंवा अंगप्रत्यंग एके ठिकाणीं न ठरणारें तुझ्या सुलक्षण व सुंदर मूर्तीचें पराकाष्ठेचें चपळपण; तुझ्या पायांतील रुणझुण वाजणारीं नूपुरें व वाकींचा तीक्ष्ण नाद व त्यासह ठेक्यानें पडणारीं तुझीं मनोहर पाउलें; अशा तुझ्या ह्या मनोवेधक नृत्यामुळें देवांच्या सभेला मोठी शोभा आली आहे, तुझ्या दिव्यांबराची सर्वत्र प्रभा फांकली आहे, सर्व प्रकारचें साहित्य करण्याविषयीं अष्ट नायका तत्पर व उत्सुक आहेत, अशा सकल विद्याधिपति व सर्वांगसुंदर गणाध्यक्षाला माझा भक्तिभावपूर्वक साष्टांग नमस्कार असो (२१–२५). गणेशरूपाचें वर्णन करितां अज्ञान्याचीही बुद्धि प्रकाशित होते व त्याचे गुणानुवाद ऐकले असतां सरस्वती प्रसन्न होते (२६). ज्याचें ब्रह्मादिक देवही वर्णन करितात त्यापुढें बिचाऱ्या मानवाचा काय पाड ? असो.

जे कां हीणाहूनि हीण । तेचि होती दक्ष प्रविण । सर्वविशई ॥ २८ ॥ ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ । सप्रचीत भजनस्वार्थ । कलौ चंडीविनायकौ ॥ २९ ॥ ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला यथामती । वांछा धरून चित्तीं । परमार्थाची ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गणेशस्तवननाम समास दुसरा ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ आतां वंदीन वेदमाता ॥ श्रीशारदा ब्रह्मसुता । शब्दमूळ वाग्देवता । महामाया ॥ १ ॥ जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार । जे शब्दाचें अभ्यंतर । उकलून दावी ॥ २ ॥ जे योगीयांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी । जे विद्या अविद्याउपाधी । तोडून टाकी ॥ ३ ॥ जे महापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्था तुर्या । जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधु ॥ ४ ॥ जे महंतांची शांती । जे ईश्वराची निजशक्ती । जे ज्ञानियांची विरक्ती । नैराश्यशोभा ॥ ५ ॥ जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळाविनोदेंचि मोडी । आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे ॥ ६ ॥ जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे । जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ ७ ॥ जे सर्व नाटकअंतर्कळा । जाणीव स्फूर्ति

मंदमतींनीं गणेशाचें अत्यादरेंकरून चिंतन करावें, म्हणजे जे आधीं मूर्ख, कुलक्षणी व परमहीन असतील तेच सर्व विषयांत पारंगत व अत्यंत प्रवीण होतील (२७–२८). असा श्रीगणेश परमसमर्थ असून भजकाचे मनोरथ पूर्ण करणारा आहे. कलियुगांत देवी (शारदा) व देव (गणेश) यांचें भजन जीवांना परम हितप्रद होतें ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे (२९). मीं चित्तांत परमार्थाची वांच्छा धरून यथामति मंगळमूर्तीचें स्तवन केलें आहे (३०). [द० १, स० २]

आतां श्रीशारदेला वंदन करितों. शारदा ही सर्व शब्दसृष्टीचें मूळ व म्हणून वेदाची माता होय. मूळमाया हें तिचें रूप. [शुद्ध ब्रह्याच्या ठिकाणीं ‘ एकोहं ’ अशी जी मूलस्फूर्ति झाली ती द्विप्रकार आहे. ‘ वायू जाणीव मिळोन मेळा मूळमाया बोलिजे ’ (द० १०, स० ९) वायु व जाणीव मिळून मूळमाया. वायूला प्रकृति किंवा शारदा म्हणतात व जाणिवेचा जो अंश तो पुरुष किंवा गणेश होय. या उभयतांपासून पुढें त्रिगुण व त्रिगुणाचे विष्णु, ब्रह्मदेव व शंकर, हे देव झाले. त्यापुढें सृष्टि. मूळ ब्रह्याच्या संकल्पाबरोबर गणेशशारदारूप मूळमाया झाली म्हणून शारदेला येथें ‘ ब्रह्मसुता ’ म्हटलें आहे. शब्दाचें किंवा वेदाचें ती मूळ असल्यामुळें ती वाणीची देवता होय. [पुढील १४ ओवी पहा.] (१). परा, पश्यन्ती, मध्यमा या तीन वाचेंतून शब्द वैखरीवाणीनें प्रत्यक्ष प्रगट होतात व त्या मूळरूपी शारदेला पाहिलें म्हणजे शब्दांचें रहस्य कळतें ; शब्दाची मूलस्फूर्ति देणारी व शब्दांचें रहस्य उकलून दाखविणारी शारदाच होय (२). योग्यांची ती समाधि होय. योगी तेथें विश्रांति पावतात. धैर्यवंत स्थिरप्रज्ञांची प्रज्ञा तिच्या साह्यानें स्थिर असते. विद्या (ज्ञान) व अविद्या (अज्ञान) या दोन्ही उपाधि मूळमायेच्या ठिकाणीं उरत नाहींत (३). ती मूळ पुरुष जो गणेश त्याची भार्या होय. तुर्या अवस्थेला ती सन्निध आहे. तिच्या सत्तेनें महापुरुष श्रेष्ठ कार्यास प्रवृत्त झाले आहेत. ब्रह्माविष्णुमहेशांची मूलस्फूर्ति ती (४). महात्म्यांना तिच्या स्वरूपीं स्थिर झाल्यामुळेंच शांति मिळते. ईश्वर जो गणेश त्याची, ती शक्ति होय. ज्ञानी पुरुष तिच्या स्वरूपीं स्थिरावल्यामुळेंच पुढें होणाऱ्या मिथ्या सृष्टीविषयीं उदासीन असतात. नैराश्याची शोभा ती (५). अनंत ब्रह्मांडें लीलेनें घडणें व मोडणें व स्वतः ब्रह्मीं लीन होणें हा तिचा स्वभाव आहे (६). तिचें कार्य जी सृष्टि ती प्रत्यक्ष दिसते पण तिचा शोध घेऊं जातां ती सांपडत नाहीं. ब्रह्मादिक मागाहून झालेले असल्यामुळें तिचा पत्ता लागत नाहीं (७). प्राणिमात्रांच्या सर्व चेष्टांची (नाटक) ती अंतर्कळा म्ह० प्रेरकशक्ति आहे. ती विमल ज्ञानस्वरूप आहे, ती ज्ञानाची

निर्मळा । जयेचेनि स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती ॥ ८ ॥ जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा । जे शब्दीं वदोनि उभा । संसार नासी ॥ ९ ॥ जे मोक्षश्रिया महांमंगळा । जे सत्रावी जीवनकळा । जे सत्वलीळा सुसीतळा । लावण्यखाणी ॥ १० ॥ जे अव्यक्त पुरुषाची व्यक्ती । विस्तारें वाढली इच्छाशक्ती । जे कळिकाळाची नियंती । सद्गुरुकृपा ॥ ११ ॥ जे परमार्थमार्गींचा विचार । निवडून दावी सारासार । भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें ॥ १२ ॥ ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली । सिद्धचि अंतरीं संचली । चतुर्विधा प्रकारें ॥ १३ ॥ तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें । म्हणोन कर्तृत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ॥ १४ ॥ जे ब्रह्मादिकांची जननी । हरिहर जयेपासुनी । सृष्टिरचना लोक तिनी । विस्तार जयेचा ॥ १५ ॥ जे परमार्थाचें मूळ । नांतरी सद्विद्याचि केवळ । निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती ॥ १६ ॥ जे योगियांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं । जे सिद्धांचे अंतःकरणीं । समाधिरूपें ॥ १७ ॥ जे निर्गुणाची ओळखण । जे अनुभवाची खूण । जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वां घटीं ॥ १८ ॥ शास्त्रें पुराणें वेद श्रुती । अखंड जयेचें स्तवन करिती । नाना रूपीं जयेस भजती । प्राणीमात्र ॥ १९ ॥ जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरुपमाची उपमा । जयेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे ॥ २० ॥ नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी ।

शक्ति आहे म्हणून ब्रह्मानंदाचा सुखसोहळा ब्रह्मादि देवांना व सर्व ज्ञात्यांना तिच्या रूपीं ठाव दिल्यामुळेंच भोगायला सांपडतो (८). ती लावण्याचें लावण्य आहे. परब्रह्मसूर्याची ती प्रभा आहे. तत्त्वमस्यादि महावाक्यांचा आधार घेऊन ती संसारभ्रमाचें निरसन करिते (९). मोक्षलक्ष्मीचें मांगल्य ती. ब्रह्मरंध्रांतून अमृतरूपानें स्रवणारी सतरावी जीवनकला हें तिचेंच रूप. ती परम सत्त्वरूप, शांतिरूप, लावण्यस्वरूप आहे (१०). अव्यक्त पुरुष (गणेश) तिच्या द्वारेंच व्यक्तीला येतो. त्याच्या इच्छाशक्तीचा विस्तार करून ब्रह्मांडें उभीं करणारी तीच. कळिकाळाचें नियमन करून सद्गुरु (परब्रह्म) स्वरूपाला पोंचविणारी तीच (११). सारासारविचार तिच्यामुळें सुचतो. एका शब्दानें ती भवनदी पार नेते (१२). ह्याप्रमाणें बहुरूपांनीं नटणारी एक शारदाच. ही स्वयंभूच आहे पण आपल्या एका देहावर चतुर्विध वाणींचा ती विस्तार दाखविते (१३). तीन वाणींच्या अंतरांतला भाव वैखरीनें प्रगट होतो, म्हणून कर्तृत्वाचें मूळ मूळमायारूप शारदाच होय (१४). हरिहरब्रह्मांची ती माता, म्हणून सत्त्वरजतमात्मक त्रैलोक्याच्या विस्तारास तीच मूळकारण होय (१५). परमार्थाचें म्ह० परम अर्थ जो मोक्ष त्याचें मूळ ती किंबहुना ब्रह्मविद्या हें तिचेंच रूप होय; निवान्त, निर्मळ व निश्चळ अशी आत्मस्थिति म्हणजेच शारदा (१६). योगी तिचें ध्यान करितात, साधकांचें साध्य ती असल्यामुळें ते तिचेंच चिंतन करितात, सिद्धांची समाधि तीच (१७). निर्गुणपद देणारी ती. अनुभव पावलेल्यांची खूण ती. सर्व प्राणिमात्रांच्या अंतर्यामीं व्यापकपणानें नांदणारी ती (१८). वेद, शास्त्र, पुराणें तिला गातात, अनेक रूपांनीं (विविध उपास्यें कल्पून) नाना धर्मपथांचे लोक तिचीच स्तुति करितात (१९). वेदशास्त्रें शारदेचें स्तवन करितात म्हणून महत्त्वाला पावलीं आहेत. निरुपम जें केवळ ब्रह्म त्याला उपमा द्यायला केवळ ती एकटीच आहे. जिच्या स्वरूपीं मिळून गेल्यावर परमात्मा कोण कसा तें समजून जातें (२०). चौदा विद्या, चौसष्ट कळा, अष्ट महासिद्धि या सर्वांचें निश्चयात्मक ज्ञान तिच्यामुळेंच होतें म्ह० सर्वांचा

जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञप्तिमात्र ॥ २१ ॥ जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतर्निष्ठांची अंतरस्थिती । जे जीवन्मुक्तांची मुक्ती । सायुज्यता ते ॥ २२ ॥ जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी । जे थोरथोरासी गोवी । जाणपणें ॥ २३ ॥ जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें बोळखिलें । जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ॥ २४ ॥ स्तवन भजन भक्तिभाव । मायेवांचून नाहीं ठाव । ऐसिया वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥२५॥ म्हणोनि थोराहून थोर । जे ईश्वराचा ईश्वर । तयेसी माझा नमस्कार । तदंशेंचि आतां ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शारदास्तवननाम समास तिसरा ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना । तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १ ॥ न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती । तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ॥२॥ मज न कळे हा विचारु । दुरूनि माझा नमस्कारु । गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज ॥३ ॥ होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा । आतां असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी ॥ ४ ॥ मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांच्छित होतें मन । माया जाली लज्यायमान । काय करूं ॥ ५ ॥ नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा । तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा ॥ ६ ॥ आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।

निश्चय तिचें स्वरूप होय. सूक्ष्म परमात्मवस्तूशीं तन्मय ज्ञानस्वरूप होणें, हेंच शारदेचें निजरूप होय (२१). भगवद्भक्तांची आत्मरतिरूप भक्ति, अंतर्निष्ठांची आत्मनिष्ठा, जीवन्मुक्तांची मुक्तस्थिति, अनंताची वैष्णवी माया, अकळरूप जिचें अशी थोरथोरांस न कळणारी म्हणजे ही शारदाच होय ! (२२ – २३). जें जें नेत्रांस दिसतें, जें जें शब्दांनीं बोललें जातें, जें जें मनाला भासतें तें सर्व तिचें रूप (२४). माया शारदेवांचून स्तुतिस्तवन कोणाचें करणें उचित आहे ? भक्तिभावाला तिच्यावांचून दुसरें कोणतें अधिष्ठान आहे ? या वचनाचें वर्म अनुभवीच जाणतील (२५). म्हणूनच हरिहरादि जे थोर त्यांपेक्षांही जी थोर, जी ईश्वराचा ईश्वर, तिला तन्मय होऊन, म्ह० तिच्याशीं वेगळेपणानें राहून, मी आतां नमस्कार करितों (२६). [द० १, स० ३]

आतां सद्गुरुस्तवन करावें, पण सद्गुरुपद म्ह० परब्रह्मस्वरूप मूळ मायेच्याही पलीकडे आहे ! तें मला अज्ञानाला कळावें कसें ? व मीं त्याचें वर्णन करावें कसें ? (१). नेति नेति म्हणून श्रुति जेथें मौन धरिते त्या स्वरूपाचा विचारच मला करवत नाहीं, मी दुरूनच नमस्कार करितों व प्रार्थना करितों कीं "गुरुदेवा ! मला भवपार न्या. तुमची स्तुति करीन अशी खोटी आशा मीं बाळगली होती, मायेच्या बळें (आश्रयानें) तुम्हांस वर्णीन अशी इच्छा होती, पण मायेनें तुमचें नांव घेतांच आपलें तोंड लपविलें ; आतां मी तुम्हांला कसें वर्णूं ? तुम्ही असाल तशा तुम्हांला हा माझा नमस्कार असो ! (२–५). परमात्मा यथार्थ आकळत नाहीं म्हणून आपण त्याची प्रतिमा करून तेथें पूजा, स्तुतिस्तवन करून समाधान पावलों, त्याप्रमाणें सद्गुरुस्वरूप अकळ आहे, तथापि मायेचा आश्रय धरून मी सद्गुरूचें स्तवन करितों. माझा भाव पाहून सद्गुरु प्रसन्न होईल. भावाप्रमाणें देवाचें ध्यान करावें (६–७). जयजयाजी सद्गुरुराजा ! तूं ह्या विश्वाचें

तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ ७ ॥ जयजयाजि सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा । परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ ८ ॥ तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे । जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ९ ॥ आदित्यें अंधकार निवारे ॥ परंतु मागुतें ब्रह्मांड भरे । निशी जालियां नंतरें । पुन्हा काळोखें ॥ १० ॥ तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्म-मृत्य वाव । समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ११ ॥ सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं । तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥१२॥ कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १३ ॥ परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें । तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ॥ १४ ॥ परीस आपणाऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना । उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा ॥ १५ ॥ शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां नये । म्हणोनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ १६ ॥ उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षार । अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ॥ १७ ॥ उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु । तैसा नव्हे कीं सद्गुरु । कोमळ दीनाचा ॥ १८ ॥ उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण । या कारणें दृष्टांत हीण । सद्गुरूस गगनाचा ॥ १९ ॥ धीरपणें उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं । म्हणोन धीरत्वास दृष्टांतीं

मूळ आहेस, ह्या विश्वाचें पोषणही तूंच करितोस. तूं परम पुरुष आहेस, मोक्षध्वज व दीननाथ तूंच आहेस. तुझा अभयहस्त शिरीं पडला म्हणजे सूर्योदयीं अंधार तशी माया दूर पळते. पण सूर्याचा दृष्टान्त अपुरा आहे; सूर्योदय झाला असतां अंधार जातो, पण अस्तमान समयीं रात्र होऊन पुन्हा ब्रह्मांड काळोखानें भरून जातें; सद्गुरूला सूर्यासारखे उदयास्त नाहींत. त्यांनीं जन्ममृत्युरूप संसार एकदा पुसून टाकला कीं मायेची रात्र पुन्हा कधींही यायचीच नाहीं. परिसाच्या संगतीनें लोखंडाचें एकवार सोनें झालें म्हणजे पुन्हा त्या सोन्याचें लोखंड होत नाहीं. त्याप्रमाणें जीव एकदा गुरुकृपेनें ब्रह्मरूपता पावला कीं पुन्हा गुरुदास जीवपणाच्या संदेहांत पडायचाच नाहीं (८–१२). सामान्य नदी गंगेस मिळाली कीं गंगारूप होते, मग केली तरी वेगळी होत नाहीं. पण ह्याही दृष्टान्तांतील एक उणेपणा आहे व गंगासंगम होण्यापूर्वी त्या नदीला सामान्य नदीशींच लेखतात, पण शिष्य गुरुपद पावला म्हणजे त्याचें शिष्यत्व जाऊन तो स्वामीच होतो (१३–१४). परिसाचा दृष्टान्त दुसऱ्याही दृष्टीनें हीन आहे. परीस लोखंडाचें सोनें करितो, पण सोन्याचा परीस करीत नाहीं. लोखंडाचें झालेलें सोनें दुसऱ्या लोखंडाला सोनें बनवीत नाहीं; इकडे सद्गुरू शिष्यास सद्गुरुच करितात व तो शिष्य सद्गुरु झाल्यावर इतर शिष्यांस पुन्हा सद्गुरुपद देतो. यासाठीं सद्गुरूला परिसाची उपमा शोभत नाहीं (१५–१६). सागराची उपमा शोभत नाहीं, कारण सागर क्षाररूप आहे व श्रीगुरु अमृतरूप आहेत; क्षीरसागराचीही शोभत नाहीं कां तो कल्पांतीं तरी नाश पावणारा आहे व सद्गुरु शाश्वत आहेत (१७). मेरुपर्वताची उपमा गौरवास्तव द्यावी तर मेरु जड, कठोर, पाषाण आहे व सद्गुरु चिद्रूप, दयासागर आहेत (१८). गांभीर्यगुणास्तव आकाशाची उपमा द्यावी तर आकाश निर्गुण खरें पण पंचभूतांपैकीं असल्यामुळें अखेर गुणांतच पडतें व म्हणून अशाश्वत ठरतें. सद्गुरुस्वरूप आकाशापेक्षां निर्गुण आहे (सगुणनिर्गु-णातीत आहे) म्हणून आकाशाहून तें थोर आहे (१९). सोशिकतेसाठीं पृथ्वीची उपमा द्यावी तर पृथ्वी कल्पांतीं नाश

हीण वसुंधरा ॥ २० ॥ आतां उपमावा गभस्ती । गभस्तीचा प्रकाश किती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥ २१ ॥ म्हणोनि उपमे उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर । आतां उपमावा फणीवर । तरी तोहि भारवाही ॥ २२ ॥ आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरी आटेल सकळ । सद्गुरुस्वरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ २३ ॥ सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्युपंथ । सद्गुरुकृपा यथार्थ । अमरचि करी ॥ २४ ॥ सद्गुरूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु । कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ॥ २५ ॥ चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी । कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती ॥ २६ ॥ सद्गुरु म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत । ज्याचे द्वारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ॥ २७ ॥ स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरी विटंबती । सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २८ ॥ हरिहरब्रह्मादिक । नाश पावती सकळिक । सर्वदा अविनाश येक सद्गुरुपद ॥ २९ ॥ तयासी उमपा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी । पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥ ३० ॥ म्हणोनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना । अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥ ३१ ॥ इति सद्गुरुस्तवन नाम समास चौथा ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान । जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ॥ १ ॥ जे वस्तु परम दुर्लभ । जयेचा अलभ्य लाभ । तेचि होये सुलभ । संतसंगेंकरूनी ॥ २ ॥ वस्तु प्रगटचि असे । पाहातां कोणासीच न दिसे । नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं ॥ ३ ॥

पावणारी आहे व श्रीगुरुरूप शाश्वत आहे (२०). तेजास्तव त्यांना सूर्य म्हणावें तर सूर्याचा प्रकाश मर्यादित आहे व सद्गुरु ज्ञानप्रकाश थोर आहे. शेष म्हणावें तर शेष भारवाही आहे व श्रीगुरु शिष्याचाही भार उतरविणारे आहेत ! (२१–२२). जळ काळान्तीं आटणारें आहे त्याची उपमा अपुरी आहे ! अमृतही अमरांना मृत्युपंथाला नेणारें आहे, सद्गुरुकृपेनें शिष्य खराच अमरपद पावतो. कल्पतरूचा दृष्टान्तही श्रीगुरूला साजत नाहीं, कां कीं कल्पिलें तेवढेंच तो देतो, पण कल्पनेचा अंत करून श्रीगुरु निर्विकल्पपद देतात. चिंतामणीची उपमा? छे. श्रीगुरु चिंताच उरूं देत नाहींत? कामधेनूची दुभणी निष्काम करणाऱ्या गुरुला काय कामाची? लक्ष्मीचा दृष्टान्तही कुचकामाचा होय. लक्ष्मी चंचळ व नाशवंत. श्रीगुरुपद निश्चळ अविनाशी आहे (२३–२७). स्वर्गलोकसुख, इंद्रसंपत्ति हीं नाशवंत आहेत, श्रीगुरुकृपा शाश्वत आहे. हरिहरब्रह्मादिकांनाही नाश आहे, सर्वकाळ अविनाशी असें एक सद्गुरुपद आहे. पंचभौतिक सृष्टि नाशवंत, तेथल्या पदार्थांची उपमा श्रीगुरुला काय साजणार आहे? म्हणून सद्गुरुवर्णन होत नाहीं हेंच त्यांचें वर्णन होय! ही अंतःस्थितीची खूण अंतर्निष्ठच जाणतील (२८–३१). [द. १, स. ४]

आतां परमार्थाला आधारभूत अशा संतसज्जनांना मी वंदन करितों. जनांना गुप्त असलेलें खरें ज्ञान त्यांच्यामुळें प्रगट होतें. जी परमात्मवस्तु एरवीं परमदुर्लभ आहे, जिचा लाभ झाला असतांना अपूर्वता वाटते, ती सत्संगानें सुलभ होते. वस्तु तर

जेथें परीक्षवंत ठकले । नांतरी डोळसचि अंध जाले । पाहात असतांचि चुकले । निजवस्तूसी ॥ ४ ॥ जे दीपाचेनि दिसेना । नाना प्रकारें गवसेना । नेत्रांजनेंहि वसेना । दृष्टीपुढें ॥ ५ ॥ सोळां कळी पूर्ण शशी । दाखऊं सकेना वस्तूसी । तीव्र आदित्य कळारासी । तोहि दाखवीना ॥ ६ ॥ जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतु तोहि दिसे । नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ॥ ७ ॥ चिरलें वाळाग्र तेहि प्रकासी । परी तो दाखवीना वस्तूसी । ते जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये ॥ ८ ॥ जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले । जेथें तर्क मंदावले । तर्कितां निजवस्तूसी ॥ ९ ॥ वळे विवेकाची वेंगडी । पडे शब्दार्ची बोबडी । जेथें मनाची तांतडी । कामा नये ॥ १० ॥ जो बोलकेपणें विशेष । सहस्रमुखांचा जो शेष । तोहि सिणला निःशेष । वस्तु न संगवे ॥ ११ ॥ वेदें प्रकाशिलें सर्वही । वेदविरहित सर्व कांहीं । तो वेद कोणासही । दाखऊं सकेना ॥ १२ ॥ तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे । त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ॥ १३ ॥ विचित्र कळा ये मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची । मायातीता अनंताची । संत सोय सांगती ॥ १४ ॥ वस्तूसी वर्णिलें नवचे । तेंचि स्वरूप संतांचें । या कारणें वचनाचें । कार्य नाहीं ॥ १५ ॥ संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥ १६ ॥ संत मोक्षाची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती । नांतरी भक्तीची । फळश्रुती । ते हे संत ॥ १७ ॥ संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र । नातरी पुण्याची पवित्र । पुण्य भूमी ॥ १८ ॥ संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें

उघड आहे, पण स्थूलदृष्टीच्या लोकांना दिसत नाहीं, तिच्या प्राप्तीसाठीं अनेक साधनांचे कष्ट केले तरी तिचा लाभ होत नाहीं. मोठमोठे पारखी येथें चकतात, डोळस असून आंधळे बनतात, वस्तु पाहत असतांना त्यांना ती दिसत नाहीं (१–४). परमात्मवस्तूला दिव्याच्या किंवा अन्य कोणत्याही प्रकाशांत पाहतां येत नाहीं. डोळ्यांत अंजन घातलें तरी ती दिसत नाहीं. षोडशकलात्मक चंद्र किंवा कलाराशि चंडातप सूर्य तिला दाखवूं शकत नाहींत. वस्त्राचा बारीक तंतु किंवा अणुरेणूसारखे सूक्ष्म पदार्थ, फार काय पण केसाचें टोकही जो दाखवूं शकतो तो सूर्यही परमसूक्ष्म अशी परमात्मवस्तु दाखविण्यास असमर्थ आहे, पण ती संतसज्जनसंगतींत साधकांना प्राप्त होते (५–८). वस्तूविषयीं तर्क, प्रयत्न, आक्षेप सर्व मंद होतात, विवेकाचें बळ चालत नाहीं, शब्द मुका होतो, मन पांगुळ होतें. सर्व बोलक्यांचा अग्रणी जो शेष तोही वस्तूचें वर्णन करूं शकत नाहीं. वेद इतर सर्वांवर प्रकाश पाडतात, पण येथें मौन धरितात. अशी वस्तु सत्संगतींत अनुभवाला येते. वस्तुमहिमा कोण सांगेल ? मायेच्या लीला अनंत आहेत, पण तीही वस्तूची ओळख करून देऊं शकत नाहीं. कशी करणार ? वस्तु पडली मायातीत, तथापि मायातीत परमात्म्याची ओळख संत करून देतात. ते त्याचा मार्ग दाखवितात. वस्तूचें वर्णन करतां येत नाहीं व वस्तुस्वरूप संत असतात म्हणून संतांचेंही वर्णन करणें कठीण आहे (९–१५). तथापि ओळखीस्तव कांहीं लक्षणें सांगूं. संत आनंदाचें स्थळ आहेत, सुखस्वरूप संतोषरूप आहेत, विश्रांति, तृप्ति, भक्ति यांना सर्वस्वीं आधार संतच आहेत. संत धर्म पिकविणारे आहेत. स्वस्वरूपाची ओळख संतांच्या ठिकाणीं करून घ्यावी. पुण्याची पुण्यभूमि संतच आहेत.

भांडार। नातरी बोलिजे माहेर। सायुज्यमुक्तीचें ॥ १९ ॥ संत सत्याचा निश्चयो। संत सार्थकाचा जयो। संत प्राप्तीचा समयो। सिद्धरूप ॥ २० ॥ मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे हे संत श्रीमंत। जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले ॥ २१ ॥ जें समर्थपणें उदार। जे कां अत्यंत दानशूर। तयांचेनि हा ज्ञानविचार। दिधला न वचे ॥ २२ ॥ माहाराजे चक्रवर्ती। जाले, आहेत, पुढें होती। परंतु कोणी सायुज्यमुक्ती। देणार नाहीं ॥ २३ ॥ जें त्रैलोकीं नाहीं दान। तें करिती संतसज्जन। तयां संतांचें महिमान। काय म्हणोनि वर्णावें ॥ २४ ॥ जें त्रैलोक्याहून वेगळें। जें वेदश्रुतीसी नाकळे। तेंचि जयांचेनि बोळे। परब्रह्म अंतरीं ॥ २५ ॥ ऐसी संतांची महिमा। बोलिजे तितुकी उणी उपमा। जयांचेनि मुख्य परमात्मा। प्रगट होये ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे संतस्तवननाम समास पांचवा ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ आतां वंदूं श्रोते जन। भक्त ज्ञानी संत सज्जन। विरक्त योगी गुणसंपन्न। सत्यवादी ॥ १ ॥ येक सत्वाचे सागर। येक बुद्धीचे आगर। येक श्रोते वैरागर। नाना शब्दरत्नाचे ॥ २ ॥ जे नाना अर्थामृताचे भोक्ते। जे प्रसंगीं वक्तयाचे वक्ते। नाना संशयांतें छेदिते। निश्चई पुरुष ॥ ३ ॥ ज्यांची धारणा अपार। जे ईश्वराचे अवतार। नातरी प्रत्यक्ष सुरवर। बैसले जैसे ॥ ४ ॥ कीं हे ऋषेश्वरांची मंडळी। शांतस्वरूप सत्वागळी। जयाचेनि सभामंडळीं। परम शोभा ॥ ५ ॥ हृदइं वेदगर्भ विलसे। मुखीं सरस्वती विलसे। साहित्य बोलतां जैसे। भासती देवगुरु ॥ ६ ॥

समाधानाचें ते पवित्रमंदिर आहेत. विवेकाचें भांडार, सायुज्यतेचें माहेर, सत्याचा मूर्तिमंत निश्चय, जन्मसाफल्याचें दृश्यस्वरूप असे हे संत आहेत. आत्मसिद्धीचा समय व संतभेट एकदमच होतात (१९–२०). संत लौकिकदृष्टीनें दरिद्री दिसोत, पण खरे श्रीमंत तेच होत. मोक्षलक्ष्मीचे अलंकार त्यांच्या अंगावर चढविलेले असतात. जे समर्थ असून दानशूर असतात अशा श्रीमंतांनाही संतासारखें सुविचाररत्नांचें दान करितां येत नाहीं. राजे, महाराजे, चक्रवर्ती लाखों झाले व होतील, पण सायुज्यमोक्षाचें ऐश्वर्य त्यांच्याच्यानें देववणार नाहीं. हें औदार्य संतांच्या ठिकाणीं पहावें. त्रैलोक्यांत जे कोणी देऊं शकणार नाहीं असें स्वस्वरूपाचें दान संतच करूं शकतात. अशा संतांचा महिमा कोणीं वर्णावा ? त्रैलोक्याच्या पलीकडचा निजठेवा, जो श्रुतिशास्त्रांनाही कळत नाहीं तो संत लीलेनें ठायींच्या ठायीं प्राप्त करून देतात. संताचा महिमा दुर्गम आहे. त्यांच्या उपमेस कोण येईल ? मुख्य परमात्माच प्रकट करणारे समर्थ व दानशूर एक संतच ! (२१–२६). [द. १, स. ५]

आतां श्रोत्यांना वंदन करितों. श्रोत्यांमध्यें भक्त, ज्ञानी, संत, विरक्त, योगी, गुणी, सत्यनिष्ठ असे नानाप्रकारचे अधिकारी लोक असतात (१). कोणी सत्त्वाचे समुद्र, कोणी महाबुद्धिमंत, कोणी स्वतः शब्दरत्नाकर (२), कोणी अनेक अर्थामृताचे भोक्ते व प्रसंगीं वक्त्याला योग्य अर्थ बोलविणारे, स्फूर्ति देणारे, कोणी संशयच्छेद करण्यांत कुशल असे निश्चयाचे मेरु (३), ज्यांची ग्रहणशक्ति अचाट, जे ईश्वराचे अवतार, किंवा प्रत्यक्ष देवच येऊन बसलेले, सभेला शोभा आणणारे असे शांत व सत्त्वस्थ ऋषिच हे ! ज्यांच्या हृदयांत वेदार्थ विलसत आहे, जिव्हेवर सरस्वती नाचत आहे, ज्ञान बोलूं लागले कीं साक्षात्

जे पवित्रपणें वैश्वानर। जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर । ज्ञातेपणें दृष्टीसमोर। ब्रह्मांड न ये ॥ ७ ॥ जे अखंड सावधान। जयांस त्रिकाळाचें ज्ञान । सर्वकाळ निरभिमान । आत्मज्ञानी ॥ ८ ॥ ज्यांचे दृष्टीखालून गेलें । ऐसें कांहींच नाहीं उरलें । पदार्थमात्रांसी लक्षिलें । मनें जयांच्या ॥ ९ ॥ जें जें कांहीं आठवावें । तें तें तयांस पूर्वींच ठावें । तेथें काय अनुवादावें । ज्ञातेपणेंकरूनी ॥ १० ॥ परंतु हे गुणग्राहिक । म्हणोन बोलतों निःशंक । भाग्य पुरुष काय येक । सेवीत नाहीं ॥ ११ ॥ सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकारणें अवेट अन्नें । तैसींच माझीं वचनें । पराकृतें ॥ १२ ॥ आपुले शक्तिनुसार । भावें पुजावा परमेश्वर । परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंचि नाहीं ॥ १३ ॥ तैसा मी येक वाग्दुर्बळ। श्रोते परमेश्वरचि केवळ। यांची पूजा वाचाबरळ। करूं पाहें ॥१४॥ व्युत्पत्ती नाहीं कळा नाहीं। चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं। भक्तिज्ञानवैराग्य नाहीं। गौल्यता नाहीं वचनाची ॥ १५ ॥ ऐसा माझा वाग्विळास। निःशंक बोलतों सावकाश। भावाचा भोक्ता जगदीश। म्हणोनियां ॥ १६ ॥ तुम्ही श्रोते जगदीशमूर्ति । तेथें माझी व्युत्पत्ति किती । बुद्धिहीण अल्पमती । सलगी करितों ॥ १७ ॥ समर्थाचा पुत्र मूर्ख जगीं । परी सामर्थ्य असे त्याचे आंगीं । तुम्हां संतांचा मी सलगी । म्हणोनि करितों ॥ १८ ॥ व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित लोक। परी त्यांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळती ॥१९॥ तैसा मी संतांचा अंकित । तुम्हां संतांपासीं बोलत । तरी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेलच कीं ॥ २० ॥ आपलेंचि बोले वाउगें। त्याची संपादणी

बृहस्पतिच (४–६), जे अग्नीसारखे पवित्र स्फूर्तिकिरणांचे सूर्य, ज्यांचें ज्ञान ब्रह्मांडाहून विशाळ, जे स्वस्वरूपीं निरंतर जागृत, त्रिकालज्ञ, निरभिमानी, आत्मनिष्ठ (७–८), ज्यांच्या दृष्टीला आलें नाहीं असें कांहींच नाहीं, ज्यांनीं प्रत्येक गोष्टीचा पूर्ण विचार केलेला, जें सांगायचें मनांत आणावें तें ज्यांना पूर्वींच ठाऊक,—अशा सर्वगुणसंपन्न श्रोत्यांपुढें जाणतेपणानें काय बोलावें ? पण हे गुणज्ञ म्हणून निःशंकपणानें बोलावेंसें वाटतें. थोर लोक काय काय संग्रहीं ठेवीत नाहींत ? सदा पंच पक्वान्नांचें भोजन करणाऱ्यांना एखादे वेळेस तोंडपालट करण्याकरितां साधी भाजीभाकरीच गोड लागते, त्याप्रमाणें माझीं हीं प्राकृतवचनें हे सज्जन गोड करून घेतीलच (९–१२). आपल्या शक्तीप्रमाणें भक्तिपूर्वक भगवंताचें पूजन करावें पण (साहित्य उणें आहे म्हणून) करूं नये' असें कोठेंच सांगितलें नाहीं ; त्याप्रमाणें मी वाग्दुर्बळ असूनही ईश्वरस्वरूप श्रोत्यांची पूजा करूं पाहात आहें (१३–१४). पद्धतशीर शास्त्राध्ययन नाहीं, कला नाहीं, चातुर्य नाहीं, कवित्व नाहीं, भक्तिज्ञानवैराग्य नाहीं, वाङ्माधुर्यही नाहीं, असा हा माझा वाग्विलास आहे ! पण जगदीश हा भावाचा भोक्ता आहे हें जाणून मी अघळपघळ बोलत आहें (१५–१६). श्रोते हो ! तुम्ही प्रत्यक्ष भगवन्मूर्ति आहांत. तुम्हांपुढें म्यां पांडित्य काय मिरवावें ? मी मतिमंद आहें, निर्बुद्ध आहें, पण सलगीचें भाषण करीत आहें. जगांत समर्थाचा पुत्र मूर्ख असला तरी बापाच्या बळावर विकतो, तसा मी तुम्हां संतांचा म्हणून तुमच्याच प्रेमबळावर ही सलगी करीत आहें. सिंहव्याघ्रादि भयंकर प्राणी पाहून इतर लोक भिऊन जातात पण त्यांचीं पिलें त्यांजपुढें निःशंक खेळतात, तसा मी तुम्हां संतांचें लेंकरूं तुम्हांपुढें मोकळ्या मनानें बोलतों, भरंवसा कीं माझी काळजी तुम्हीच वाहणार ! आपलें लेंकरूं वेडेंबोवडें बोललें तरी थोर त्याची संपादणी करीत असतात. येथें कांहीं कमी

करणें लागे । परंतु कांहीं सांगणें नलगे । न्यून तें पूर्ण करावें ॥ २१ ॥ हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावेंचि करी मन । तैसे तुम्ही संतसज्जन । मायबाप विश्वाचे ॥ २२ ॥ माझा आशय जाणोनि जीवें । आतां उचित तें करावें । पुढें कथेसि अवधान द्यावें । म्हणे दासानुदास ॥ २३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रोतेस्तवननाम समास साहवा ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ आतां वंदूं कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर । नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥ १ ॥ कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन । नाना शब्दांचें भुवन । यथार्थ होय ॥ २ ॥ कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदीश्वराचें महत्व । नाना लाघवें सत्कीर्तिस्तव । निर्माण कवी ॥ ३ ॥ कीं हे शब्दरत्नांचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर । नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ॥ ४ ॥ अध्यात्मग्रंथांची खाणी । कीं हे बोलके चिंतामणी नाना कामधेनूंचीं दुभणीं । वोळलीं श्रोतयांसी ॥ ५ ॥ कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पडिभरु । नाना सायुज्यतेचे विस्तारु । विस्तारले ॥ ६ ॥ कीं हा परलोकींचा निजस्वार्थु । कीं हा योगियांचा गुप्त पंथु । नाना ज्ञानियांचा परमार्थु । रूपासि आला ॥ ७ ॥ कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण । मायाविलक्षणाचें लक्षण । ते हे कवी ॥ ८ ॥ कीं हा श्रुतीचा भावगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ । नातरी होये सुलभ । निजबोध कविरूपें ॥ ९ ॥ कवि मुमुक्षाचें अंजन । कवि साधकांचें साधन । कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ॥ १० ॥ कवि स्वधर्माचा आश्रयो ।

पडलं तरी पुरें करून घ्या हें विनविण्याची कांहीं गरज नाहीं. तुमची मजवरील प्रीति तुमच्याकडून हें स्वाभाविकपणे न विनवितांही करवोलच, तुम्ही संतसज्जन विश्वाचे मायबाप आहांत. माझा आशय जाणून उचित तें करा. असो. आतां पुढील कथेकडे अवधान द्यावें हीच दासानुदासाची प्रार्थना आहे (१७–२३). [द. १, स. ६]

आतां कवीश्वरांना वंदन करूं. कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर अथवा वेदरूप परमेश्वरच आहेत. हे शारदेचें मंदिर, सकलकलांचें जीवन अथवा शब्दांचें भुवनच होत (१–२). हे पुरुषार्थाचें (मोक्षाचें) ऐश्वर्य किंवा जगदीश्वराचें महत्त्व अथवा विविध प्रकारचें चातुर्य व थोरांचें यश वाढविण्यासाठीं निर्माण झालेले असतात. शब्दरत्नांचे समुद्र, मुक्तमोत्यांचें सरोवर अथवा बुद्धीच्या नाना प्रकारच्या खाणी म्हणजे हे कवीश्वर होत (३–४). कवि हे अध्यात्मग्रंथांच्या खाणी अथवा बोलके चिंतामणि आहेत. कवींचे शब्द म्हणजे कामधेनूंच्या अमृतधारा होत (५). हे मनोरथ पुरविणारे कल्पवृक्ष किंवा मोक्षाचें ऐश्वर्य अथवा सायुज्यतेचा प्रचंड विस्तार होत (६). हे जीवांचे परलोकींचें स्वहित किंवा योग्यांचा गुप्तपंथ किंवा ज्ञात्यांचा परमार्थ अवतार घेऊन प्रत्यक्ष प्रगट झाला आहे (७). मायातीत निर्गुण परब्रह्माचें मूर्त स्वरूप किंवा वेदाचें रहस्य किंवा परमेश्वराचा अलभ्य लाभ कविरूपानें होऊन आत्मबोध सुलभ होतो (८–९). कवि हे मुमुक्षूंचे डोळे उघडणारें अंजन आहे, हे साधकांना साधनमार्ग दाखवितात. हे सिद्धांचें निश्चयात्मक समाधान व्यक्त करतात (१०). कवि हे स्वधर्माची जागृति ठेवणारे असल्यामुळें स्वधर्माला यांचा मोठा आश्रय आहे, हे मनोजयाचा मार्ग दाखवितात. हे धार्मिकांचा विनय कसा असतो हें सांगतात (११).

कवि मनाचा मनोजयो । कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ॥ ११ ॥ कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण । नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवी ॥ १२ ॥ कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती । कवि उपासकांची वाढ कीर्ती । विस्तारली ॥ १३ ॥ नाना साधनांचें मूळ । कवि नाना प्रयत्नांचें फळ । नाना कार्यसिद्धी केवळ । कविचेनि प्रसादें ॥ १४ ॥ आधीं कवीचा वाग्विलास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस । कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होय ॥ १५ ॥ कवि व्युत्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंतांची सत्ता । कवि विचक्षणाची कुशळता । नाना प्रकारें ॥ १६ ॥ कवि कवित्वाचा प्रबंद । कवि नाना धाटी मुद्रा छंद । कवि गद्यपद्यभेदाभेद । पदप्रासकर्ते ॥ १७ ॥ कवि सृष्टीचा अळंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार । सकळ सिद्धींचा निर्धार । ते हे कवी ॥ १८ ॥ कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण । नाना सुखाचें संरक्षण । ते हे कवी ॥ १९ ॥ कवि देवांचें रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्त्ववर्णिते । नाना शास्त्रांचें सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥ २० ॥ नस्ता कवींचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार । म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ २१ ॥ नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं । कवीपासून सर्वही । सर्वज्ञता ॥ २२ ॥ मागां वाल्मीकव्यासादिक । जाले कवेश्वर अनेक । तयांपासून विवेक । सकळ जनासी ॥ २३ ॥ पूर्वी काव्यें होतीं केलीं । तरीच व्युत्पत्ती प्राप्त जाली । तेणें पंडिता आंगीं बाणली । परम योग्यता ॥ २४ ॥ ऐसे पूर्वी थोर थोर ॥ जाले कवेश्वर अपार । आतां आहेत पुढें होणार । नमन

वैराग्याचें रक्षण, भक्तांचें भूषण व स्वधर्मसंरक्षण कवींच्या योगानें होत असतें (१२). प्रेमळांची प्रेमवृत्ति किंवा ध्यान करणाऱ्यांची ध्यानमूर्ति अथवा उपासकांची भजनकीर्ति विश्वांत कवि विस्तारतात (१३). अनेक साधनांचें बीज व अनेक प्रयत्नांचें फळ कवि उत्कृष्ट रीतीनें वर्णीत असल्यानें कवींच्या प्रसादानें मोठमोठीं कार्यें सिद्ध होतात (१४). कवींच्या वाणीचा विलास सुरू झाला म्हणजे श्रोत्यांचे कर्ण विविध रसास्वादनानें तृप्त होतात. कवींची उत्तमोत्तम काव्यें नवकवींच्या कवित्वशक्तीस जागृत करतात (१५). पंडितांची योग्यता, समर्थांची सत्ता व चिकित्सकांचें चातुर्य कवि वाखाणतात (१६). कवित्वाचे नानाविध गद्यपद्यादिक प्रकार, विविध प्रकारचे पदप्रास व लेखनाच्या अनेक प्रकारच्या रचना व छंद वगैरे उपाय योजून कवि लोकांस शिकवितात. कवि हा ईशसृष्टीचा अलंकार आहे, हा लक्ष्मीचा शृंगार आहे, हा सकल सिद्धींचा निर्धार आहे (१७–१८). कवींमुळें सभेला शोभा येते. कवि हे भाग्याचें भूषण व सुखाचें संरक्षण आहेत (१९). देवांना नामरूप देणारे, ऋषींची थोरवी गाणारे व शास्त्रसामर्थ्य लोकांच्या मनावर बिंबविणारे कविच होत (२०). महाकवींनीं उत्तमोत्तम काव्यें रचलीं नसतीं तर जगाचा उद्धार कशानें झाला असता? म्हणून कवि हे सकल सृष्टीचा आधार आहेत. अनेक प्रकारच्या विद्या व ज्ञान कवीश्वरांवांचून मिळालें नसतें. कवींमुळेंच सर्व विषयांचें ज्ञान सकल जगाला होतें. मागें व्यासवाल्मिकादिक मोठमोठे कवि झाले व त्यांचेपासून सर्व लोकांना विवेकविचाराचा लाभ झाला. पूर्वी काव्यें केलेलीं होतीं म्हणूनच मोठमोठ्या पंडितांना व्युत्पत्ति प्राप्त झाली व त्यांची योग्यता जगामध्यें प्रगटली. असो. पूर्वी

त्यांसी ॥ २५ ॥ नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती । वेदश्रुती बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें ॥ २६ ॥ परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें । सेखीं बोलिले पूर्णपणें । संशयातीत ॥ २७ ॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघ लोटले । नाना सुखाचे उचंबळले । सरोवर हे ॥ २८ ॥ कीं हे विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जालीं मनुष्याकारें । नाना वस्तूचेनि विचारें । कोंदाटले हे ॥ २९ ॥ कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थांस आणी उणें । लाधलें पूर्व संचिताच्या गुणें । विश्वजनासी ॥ ३० ॥ कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षे आनंदें उतटलीं । विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥ ३१ ॥ कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती । नातरी भक्तीची फळश्रुति । फळास आली ॥ ३२ ॥ कीं हा ईश्वराचा पवाड । पाहतां गगनाहून वाड । ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंधरचना ॥ ३३ ॥ आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर । तयांसी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कवेश्वरस्तवननाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ आतां वंदूं सकळ सभा । जये सभेसी मुक्ति सुलभा । जेथें स्वयें जगदीश उभा । तिष्ठतु भरें ॥ १ ॥

श्लोक ॥ नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥ ६ ॥

नाहीं वैकुंठीचा ठाईं । नाहीं योगियांचा हृदईं । माझे भक्त गाती ठाईं ठाईं ।

थोरथोर अनंत कवीश्वर होऊन गेले, आतांही आहेत व पुढेंही होतील. त्या सर्वांना माझा नमस्कार असो (२१–२५). कवि हे चातुर्याच्या मूर्ति किंबहुना साक्षात बृहस्पतीच आहेत. वेदश्रुतिसुद्धां यांच्याच मुखानें आपण प्रगट व्हावें असें म्हणतात. यांनीं केवळ परोपकारासाठीं अनेक प्रकारचे निश्चय व निःसंदेह सिद्धान्त जगांत प्रगट केले आहेत (२६–२७) अमृतानें भरलेले मेघच पृथ्वीवर कविरूपानें कोसळले आहेत किंवा हे नवरसाचे महानद लोटले आहेत अथवा यांच्या रूपानें सुखाचें सरोवरच उंचबळलें आहे (२८). हीं विवेकनदीचीं भांडारें मनुष्यरूपानें प्रगट झालीं आहेत. ब्रह्मविचारानें भरलेले हे कवीश्वर म्हणजे इतर पदार्थांस तुच्छ करणारें महालक्ष्मीचें भांडार पूर्वपुण्याईच्या योगानें जगाच्या उपयोगास आलें असें वाटतें (२९–३०). हे कवि म्हणजे महानंदाच्या जिनसांनीं भरलेलीं सुखाचीं तारवेंच लोटलीं असून अनेक प्रकारांनीं सकळ लोकांच्या उपयोगास आलीं आहेत (३१). परब्रह्माचें ऐश्वर्य, विराट पुरुषाची योगस्थिति व भक्तीची फलश्रुतीच कविरूपानें फळास आली आहे (३२). आकाशाहून व्यापक अशी ही कविरूप देणगी जगास देऊन परमेश्वरानें आपला मोठेपणा प्रगट केला आहे. महाकवींची काव्यरचना ईश्वराच्या ब्रह्मांडरचनेहूनही श्रेष्ठ आहे. जगाला आधारभूत जे कवीश्वर त्यांना साष्टांग नमस्कार करून हा कविवर्णनाचा प्रकार येथें पुरा करतों (३३–३४). [द० १, स० ७]

जेथें भक्तभाविक एकत्र जमून भगवंताचे गुणानुवाद प्रेमानें गातात अशा कीर्तनपुराणनिरूपणांच्या सर्व सभांना आतां वंदन करूं. अशा सभेला मुक्ति सुलभ असते, कां कीं मुक्तिदाता परमेश्वर प्रेमपडिभरानें स्वतः तेथें उभे असतात. ‘ मी एक वेळ वैकुंठांत सापडणार नाहीं, योग्यांच्या हृदयांत आढळणार नाहीं किंवा भानुबिंबांत असणार नाहीं, पण माझे भक्त जेथें

तेथें मी तिष्ठतु नारदा ॥ २ ॥ याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ । नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥ प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवत्कथा हरिकीर्तनें । वेदव्याख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर ॥ ४ ॥ परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणाचे संवाद । अध्यात्मविद्या भेदाभेद- । मथन जेथें ॥ ५ ॥ नाना समाधानें तृप्ती । नाना आशंकानिवृत्ती । चित्तीं बैसे ध्यानमूर्ति । वाग्विळासें ॥ ६ ॥ भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोल सात्विक । रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ॥ ७ ॥ कर्मसीळ आचारसीळ । दानसीळ धर्मसीळ । सुचिस्मंत पुण्यसीळ । अंतरशुद्ध कृपाळु ॥ ८ ॥ योगी वीतरागी उदास । नेमक निग्रह तापस । विरक्त निस्पृह बहुवस । अरण्यवासी ॥ ९ ॥ दंडधारी जटाधारी । नाथपंथी मुद्राधारी । येक बाळब्रह्मचारी । योगेश्वर ॥ १० ॥ पुरश्चरणी आणी तपस्वी । तीर्थवासी आणी मनस्वी । महायोगी आणी जनस्वी । जनासारिखे ॥ ११ ॥ सिद्ध साधु आणी साधक । मंत्रयंत्र-शोधक । येकनिष्ठ उपासक । गुणग्राही ॥ १२ ॥ संत सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ महाजन । प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमळकर्ते ॥ १३ ॥ योगी व्युत्पन्न ऋषेश्वर । धूर्त तार्किक कवेश्वर । मनोजयाचे मुनेश्वर । आणी दिग्वल्की ॥ १४ ॥ ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्त्वज्ञानी पिंडज्ञानी । योगाभ्यासी योगज्ञानी । उदासीन ॥ १५ ॥ पंडित आणी पुराणिक । विद्वांस आणी वैदिक । भट आणी पाठक । यजुर्वेदी ॥ १६ ॥ महाभले माहाश्रोत्री । याज्ञिक आणी अग्निहोत्री । वैद्य आणी पंचाक्षरी । परोपकारकर्ते ॥ १७ ॥ भूत भविष्य वर्तमान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान । बहुश्रुत निरभिमान । निरापेक्षी ॥ १८ ॥ शांतिक्षमादयासीळ । पवित्र आणी सत्त्वसीळ । अंतरशुद्ध ज्ञानसीळ ।

गातात तेथें मी हटकून सापडेन ' असें देव सुरर्षि नारदाजवळ स्वतःच बोलले आहेत. त्यासाठीं भक्त जेथें हरीचे गुणानुवाद गातात व त्याच्या नामाचा जयघोष करितात, अशा सभा परमश्रेष्ठ होत. वैकुंठ तेंच होय (१–३). अशा सभांतून प्रेमळ भक्तांचीं गायनें, हरीचे गुणानुवाद, वेदव्याख्यान, पुराणश्रवण, निरूपणाचे सुखसंवाद, द्वैताद्वैतचर्चा व अध्यात्मविवरण होत असतें. तेथें शंकानिवृत्ति होऊन समाधानसुख मिळतें, भक्तांच्या वाग्विलासामुळें ध्यानमूर्ति चित्तीं स्थिर होते (४–६). अशा सभांतून अनेक गुणीसज्जनांचें दर्शनसंभाषणसुख मिळतें. भक्त, प्रेमळ, भाविक, सात्त्विक, तीक्ष्ण बुद्धीचे, निष्ठावंत, गायक, कर्मनिष्ठ, आचारशील, दानशूर, पुण्यशील, निर्मलांतःकरणी, योगी, विरागी, उदासीन, नित्यनेमी (नेमक), तापसी, विरक्त, निस्पृह, बहुधा अरण्यांत राहणारे, जटाधारी, दंडधारी (संन्यासी), नाथपंथी, मुद्रा धारण करणारे, वैष्णव, बाळब्रह्मचारी, योगी, गायत्रीपुरश्चरण करणारे, मनोजयी (मनस्वी), जनसमुदायाबरोबर जाणारे (जनस्वी), सिद्ध, साधक, मंत्रयंत्रादि शोधक, एकविध भक्त, विद्वांस, वेदशास्त्रपुराणज्ञ, जाणते, विमल समाधान करणारे, दूरदर्शी (धूर्त), तर्कशास्त्री, कवीश्वर, दिगंबर, ब्रह्मज्ञानी, तत्त्वज्ञानी, पिंडज्ञानी, वैदिक, शास्त्री, पाठक, महाश्रोत्रिय, अग्निहोत्री, वैद्य, पंचाक्षरी, त्रिकालज्ञ ज्योतिषी, शांतिक्षमादयाशील, साधु, ज्ञानशील, शुद्धचित्त असे अनेक

ईश्वरी पुरुष ॥ १९ ॥ ऐसे जे कां सभानायक । जेथें नित्यानित्यविवेक । त्यांचा महिमा अलोलिक । काय म्हणोनि वर्णावा ॥ २० ॥ जेथें श्रवणाचा उपाय । आणी परमार्थसमुदाय । तेथें जनासी तरणोपाय । सहजचि होय ॥२१॥ उत्तम गुणांची मंडळी । शांतरूप सत्वागळी । नित्यसुखाची नव्हाळी । जेथें वसे ॥ २२ ॥ विद्यापात्रें कळापात्रें । विशेष गुणाचीं सत्पात्रें । भगवंताचीं प्रीतिपात्रें । मिळालीं जेथें ॥ २३ ॥ प्रवृत्ती आणी निवृत्ती । प्रपंची आणि परमार्थी । गृहस्थाश्रमी वानप्रस्थी । संन्यासादिक ॥ २४ ॥ वृद्ध तरुण आणी बाळ । पुरुषस्त्रियादिक सकळ । अखंड ध्याती तमाळनीळ । अंतर्यामीं ॥ २५ ॥ ऐसे परमेश्वराचे जन । त्यांसी माझें अभिवंदन । जयांचेनि समाधान । अकस्मात बाणे ॥ २६ ॥ ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार । जेथें नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचें ॥ २७ ॥ जेथें भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती । ऐसा निश्चय बहुतां ग्रंथीं । महंत बोलिले ॥ २८ ॥ कलौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ । कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सभास्तवन ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ । नातरी समर्थामध्यें समर्थ । योग हा ॥ १ ॥ आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम । कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ॥ २ ॥ नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार । वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥ आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टी न पडे ।

प्रकारचे ईश्वराला वाहिलेले सत्पुरुष अशा पवित्र सभांतून बसलेले असतात (७–१९). तेथें नित्यानित्यविवेक होतो, परमार्थ्यांचे समुदाय जमतात, श्रवणसाधन सहज घडतें. बहुजनांस तरणोपाय सापडतो, नित्य नवें स्वसुख भोगावयास मिळतें. अनेक गुणांची सत्त्वशील मंडळी भेटते. विद्यावंत, कलावंत, प्रेमळ भक्त, प्रपंची व परमार्थी, गृहस्थ व संन्यासी, वृद्ध तरुण बाळ, नारीनर नानाप्रकारचे लोक जमून चित्तांत घनश्यामसुंदराचें ध्यान करितात. त्यांच्या संगतीनें समाधान प्राप्त होतें. जेथें अखंड भगवंताचे गुण गातात व त्याच्या नामाचा घोष चालतो, अशा सत्सभांना व तेथील भगवज्जनांना माझा नमस्कार असो. जेथें भगवन्मूर्ति जीवांना उत्तम गति मिळते असा निर्णय थोरांनीं ग्रंथांतरीं केलेला आहे. सकल साधनांत कलियुगीं कीर्तन श्रेष्ठ आहे व हरिकीर्तन होतें अशा सभा सर्वसभांत श्रेष्ठ आहेत. कां कीं तेथें सकल संदेह नष्ट होऊन निश्चयाचें समाधान सर्वांना मिळतें (२०–२९). [द० १, स० ८]

आतां परमार्थाचें स्तवन करूं. परमार्थ म्हणजे अध्यात्म, मोक्ष. परमार्थ हें साधकांचें साध्य आहे. हा सर्व योगांत अत्यंत श्रेष्ठ योग आहे. परमार्थ अत्यंत सुगम आहे, पण सत्समागमाचें वर्म चुकल्यामुळें जनास दुर्गम झाला आहे! इतर साधनें उधारीचीं आहेत, पण परमार्थांत ब्रह्मसाक्षात्कार तत्काळ होत असतो. वेदांत व शास्त्रांत ज्या आत्मतत्त्वाचें विवरण केलें आहे तें प्रत्यक्ष अनुभवास येतें (१–३). परब्रह्म चहूंकडे आहे, पण त्याचा अणुरेणूही चर्मचक्षूंना दिसत नाहीं. तें सर्वांत असून एकदेशीपणानें

उदास परी येकीकडे । पाहतां दिसेना ॥ ४ ॥ आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ । इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ॥ ५ ॥ साराचेंहि निजसार । अखंड अक्षै अपार । नेऊं न सकती तश्कर । कांहीं केल्यां ॥ ६ ॥ तयांस नाहीं राजभय । अथवा नाहीं अग्निभय । अथवा स्वापद-भय । बोलींच नये ॥ ७ ॥ परब्रह्म तें हालवेना । अथवा ठावही चुकेना । काळांतरींही चळेना । जेथीचा तेथें ॥ ८ ॥ ऐसें तें निज ठेवणें । कदापी पालटों नेणे । अथवा नव्हे आदिक उणें । बहुतां काळें ॥ ९ ॥ अथवा तें घसवटेना । अथवा अदृश्य होईना । नातरी पाहातां दिसेना । गुरुअंजनें-विण ॥ १० ॥ मागा योगिये समर्थ । त्यांचाहि निजस्वार्थ । यासी बोलिजे परमार्थ । परमगुह्य म्हणोनि ॥ ११ ॥ जेंहीं शोधून पाहिला । त्यासी अर्थ सांपडला । येरां असोनि अलभ्य जाला । जन्मोजन्मीं ॥ १२ ॥ अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्याची । आणी पदवी सायोज्यतेची । सन्निधचि लाभे ॥ १३ ॥ माया विवेकें मावळे । सारासार विचारें कळे । परब्रह्म तेंहि निवळे । अंतर्यामीं ॥ १४ ॥ ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड । पंचभूतांचें थोतांड । तुच्छ वाटे ॥ १५ ॥ प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका । शुद्ध आत्मा विवेका- । अंतरीं आला ॥ १६ ॥ ब्रह्मस्थित बाणतां अंतरीं । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी । दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाली ॥ १७ ॥ ऐसा हा परमार्थ । जो करी त्याचा निजस्वार्थ । आतां या समर्थास

पाहतां कोठचें दिसत नाहीं. हा आकाशमार्गाचा गुप्त पंथ आहे म्ह० परमसूक्ष्म जें आकाशतत्त्व त्यांतूनही विवेकानें पैलपार गेल्यासच अध्यात्मयोग साधणारा आहे, परमश्रेष्ठ योग्यांनाच हा पंथ माहीत असतो, इतरांना सहसा हें रहस्य उमगत नाहीं. परमात्म तत्त्व हें सारांतलें सार आहे, हें अखंड, अक्षय व अपार आहे. हें कितीही यत्न केले तरी चोरांना नेतां येत नाहीं. त्याला राजभय नाहीं, अग्निभय नाहीं व श्वापदभय नाहींच नाहीं. परब्रह्म स्थानावरून उचलून नेतां येत नाहीं किंवा तें आपल्या स्थानावरून ढळत नाहीं. काळांतरींसुद्धा तें अचळ व अढळच राहतें. अशी ही निजठेव आहे. ती कधीं पालटत नाहीं किंवा अनंत काळानेंहि तिच्यांत अधिकउणें होत नाहीं, ती झिजत नाहीं, अदृश्य होत नाहीं, गुरुकृपेचें अंजन डोळ्यांत पडल्यावांचून ती डोळसांनाही सापडत नाहीं. पूर्वीं परम समर्थ जे योगी होऊन गेले त्यांचें साध्य हेंच होतें. यालाच परमगुह्य म्हणून परमार्थ म्हणतात. हा परमार्थ ऊर्फ निजठेवा ज्यांनीं शोधून पाहिला त्यांनाच सापडला आहे, इतरांना संनिध असून जन्मोजन्मीं दुर्लभ झाला आहे (४–१२). ह्या परमार्थाची अपूर्वता काय सांगावी ? याचा लाभ झाला असतांना जन्ममृत्यूच्या यातायाती चुकतात आणि सायुज्यमोक्ष आपला आपल्याशींच आपल्याला सापडतो (१३). विवेकानें मायेचें निरसन होतें, सारासार विचार स्फुरतो व परब्रह्म अंतर्यामींच विलसतें, जिकडे तिकडे ब्रह्म भासतें. ब्रह्मभासांत ब्रह्मांड बुडून जातें व पंचभूतांचें बंड तुच्छ होतें. प्रपंच मिथ्या होऊन जातो, मायेचा पोचटपणा कळतो व विवेकामुळें परमात्मा अंतरीं स्फुरतो. ह्याप्रमाणें ब्रह्मस्थिति अंगीं बाणली म्हणजे सर्व संशय ब्रह्मांडाबाहेर जातात व दृश्यसृष्टीची जुनी जर्जरित गोधडी विटून नाहींशी होऊन जाते (१४–१७). असा हा परमार्थ जो करील त्याला सहज आहे. ह्या समर्थ अध्यात्मयोगाला समर्थ म्हणून काय सांगावें ? ह्या परमार्थामुळें ब्रह्मादिकांना विश्रांति मिळते, ह्यामुळेंच योगी ब्रह्मस्वरूपीं

समर्थ । किती म्हणोनि म्हणावें ॥ १८ ॥ या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसि विश्रामता । योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ॥ १९ ॥ परमार्थ सकळांस विसांवा । सिद्धसाधुमहानुभावां । सेखीं सात्त्विक जडजीवां । सत्संगेंकरूनी ॥ २० ॥ परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक । परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥ २१ ॥ परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार । परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥ २२ ॥ परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी । या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥ २३ ॥ अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे । मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ॥ २४ ॥ जेणें परमात्मा वोळखिला । तेणें जन्म सार्थक केला । येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें ॥ २५ ॥ असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा सीण । त्या मूर्खाचें मुखावलोकन । करूंच नये ॥ २६ ॥ भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें । पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ २७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे परमार्थस्तवन ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो । जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥ या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें । येकीं परम वीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ॥ २ ॥ येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें । येक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ॥ ३ ॥ येक तपें करूं लागले । येक योगाभ्यासी महाभले ।

तन्मय होतात. हा परमार्थ सिद्ध, साधु, संतमहंत ह्या सर्वांचें विश्रांतिस्थान आहे. हा शेवटीं जड परंतु सात्त्विक जीवांना सत्संगानें प्राप्त होतो (१८–२०). परमार्थ हें जन्माचें सार्थक आहे, परमार्थच भवार्णवांतून तारून नेणारा आहे, परमार्थ हा धार्मिकांना परलोक दाखविणारा आहे. तपस्व्यांचा व साधकांचा आधार असा हा परमार्थ भवसागरांतून जीवांना पार नेणारा आहे (२१–२२). परमार्थ ज्याला साध्य झाला तोच खरा राजाधिराज होय, ज्याला हा साधला नाहीं तो भिकारी, दरिद्री! परमार्थाची बरोबरी कोण करील ? जन्मजन्मांतरींचें पुण्य पदरीं असेल तरच परमार्थ साधतो म्ह० परमात्मयोग घडतो. ज्यानें परमात्मा ओळखला त्याचाच जन्म सफल झाला. ज्यानें तो ओळखला नाहीं, तो पापी केवळ कुळक्षयासाठीं जन्मला आहे. असो. भगवत्प्राप्ति करून न घेतां जो केवळ संसाराच्या खटाटोपींतच जन्म घालवितो त्या मूर्खाचें तोंडही पाहूं नये. तात्पर्य, भल्यानें परमार्थयोग साधावा, शरीर सार्थकीं लावावें व हरिभजनानें पूर्वजांचा उद्धार करावा (२३–२७). [द० १, स० ९]

हा नरदेह अत्यंत धन्य होय. याची अपूर्वता तर पहा, ह्या परमार्थासंबंधीं जो जी इच्छा करावी ती ती नरदेहांत सिद्धीला पावते (१). ह्या नरदेहाच्या संबंधानें किती एक भक्तिमार्गाला लागले आहेत, कितीएक विरागी होऊन गिरिकंदरांत जाऊन राहिले आहेत, कोणी तीर्थाटणें करतात, कोणी पुरश्चरणें करतात, कोणी नामनिष्ठ नामस्मरण करतात (२–३), कोणी तप, कोणी योग, कोणी वेदशास्त्राध्ययन करतात. कोणी हटयोगानें देह झिजवतात. कोणी भक्तिभावानें देव

येक अभ्यासयोगें जाले । वेदशास्त्रीं व्युत्पन्न ॥ ४ ॥ येकीं हटनिग्रह केला । देह अत्यंत पीडिला । येकीं देव ठाईं पाडिला । भावार्थबळें ॥ ५ ॥ येक महानुभाव विख्यात । येक भक्त जाले ख्यात । येक सिद्ध अकस्मात । गगन वोळगती ॥ ६ ॥ येक तेजीं तेजचि जाले । येक जळीं मिळोन गेले । येक ते दिसतचि अदृश्य जाले । वायुस्वरूपीं ॥ ७ ॥ येक येकचि बहुधा होती । येक देखतचि निघोनि जाती । येक बैसले असतांची भ्रमती । नाना स्थानीं समुद्रीं ॥ ८ ॥ येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चालविती । येक प्रेतें उठविती । तपोबळें ॥ ९ ॥ येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती । येक वायो निरोधिती । विश्वजनाचा ॥ १० ॥ ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी । जयांस वोळल्या नाना सिद्धि । ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊन गेले ॥ ११ ॥ येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध । ऐसे नाना प्रकारीचे सिद्ध । विख्यात जाले ॥ १२ ॥ येक नवविधाभक्तिराजपंथें । गेले तरले परलोकींच्या सुखस्वार्थें । येक योगी गुप्तपंथें । ब्रह्मभुवना पावले ॥ १३ ॥ येक वैकुंठास गेले । येक सत्यलोकीं राहिले । येक कैलासीं बैसले । शिवस्वरूप होउनी ॥ १४ ॥ येक इंद्रलोकीं इंद्र जाले । येक पितृलोकीं मिळाले । येक ते उडुगणीं बैसले । येक ते क्षीरसागरीं ॥ १५ ॥ सलोकता समीपता । स्वरूपता सायोज्यता । या चत्वार मुक्ती तत्वता । इच्छा सेऊन राहिले ॥ १६ ॥ ऐसे सिद्ध साधु संत । स्वहिता प्रवर्तले अनंत । ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणोनि वर्णावा ॥ १७ ॥ या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें । मुख्य

आपलासा करतात. कोणी सिद्ध व कोणी भक्त होतात व कोणी सिद्धिबळानें आकाशसंचार करतात (४–६). कोणी तेजोरूप होऊन तेजांत मिळून जातात, कोणी जलांत मिळून जातात व कोणी – तुकोबांसारखे – पाहतां पाहतां वायुरूप होऊन अदृश्य होतात (७). कोणी एक असून अनेकरूप होतात, कोणी पाहतां पाहतां गुप्त होतात, कोणी एके ठिकाणीं बसले असतांच नाना स्थानीं फिरून येतात (८). कोणी (चांगदेवांसारखे) व्याघ्रादि हिंस्रपशूवर आरूढ होतात, कोणी (ज्ञानेश्वरांसारखे) जड भिंती चालवितात व कोणी आपल्या तपस्तेजानें प्रेतें उठवितात (९), कोणी (सूर्यचंद्रादि) तेजें हतप्रभ करतात, कोणी (अगस्तीसारखे) समुद्र आटवितात, कोणी जगाचा वायूच कोंडून धरतात, असे लक्षावधि सिद्ध पुरुष हटयोगी व कृतार्थ झाले आहेत. कोणाला मनःसिद्धी होते, कोणाला वाचासिद्धी होते. कोणाला महासिद्धी प्राप्त होतात, कोणाला लहान सहान सिद्धी होतात. कोणी नवविधाभक्तीच्या धोपट मार्गानें जाऊन कृतार्थ झाले आहेत, कांहीं योगी गुप्तमार्गानें ब्रह्मलोकाला गेले आहेत. आपापल्या उपासनेप्रमाणें कोणी वैकुंठीं, कोणी सत्यलोकीं व कोणी कैलासीं गेले आहेत. कोणी इंद्र होऊन इंद्रलोकीं गेले, कोणीं पितृलोकीं मिसळले, कोणीं नक्षत्रांत व कोणी क्षीरसागरीं गेले (१०–१५). सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता ह्या चार मुक्तींपैकीं ज्याला जी आवडली ती तीच घेऊन कोणी राहिले आहेत. याप्रमाणें अनेक सिद्ध साधूंनीं नरदेहाच्या आश्रयानें आपापलें स्वहित साधलें आहे. ह्या नरदेहाश्रयानें नानासाधनें करून पण मुख्यतः सारासार विचार करून बहुत लोक मुक्त झाले आहेत, मीपण सोडून स्वानंदसुख भोगले

सारासारविचारें । बहुत सुटले ॥ १८ ॥ या नरदेहाचेनि संमंधें । बहुत पावले उत्तम पदें । अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ॥ १९ ॥ नरदेहीं येऊन सकळ । उद्धरागती पावले केवळ । येथें संशयाचें मूळ । खंडोन गेलें ॥ २० ॥ पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती । म्हणोनी नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ २१ ॥ संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी । भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ २२ ॥ तत्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मच्यारी दिगंबर संन्यासी । शडदर्शनी तापसी । नरदेहींच जाले ॥ २३ ॥ म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमध्यें वरिष्ठ । जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचें ॥ २४ ॥ नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन । परंतु हा परोपकारीं झिजऊन । कीर्तिरूपें उरवावा ॥२५॥ अश्व वृषभ गाई ह्मैसी । नाना पशु स्त्रिया दासी । कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणी तरी धरील ॥ २६ ॥ तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जावो अथवा राहो । परी यास कोणी पाहो । बंधन करूं सकेना ॥ २७ ॥ नरदेह पांगुळ असता । तरी तो कार्यास न येता । अथवा थोंटा जरी असता । तरी परोपकारास नये ॥ २८ ॥ नरदेह अंध असिला । तरी तो निपटचि वायां गेला । अथवा बधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ॥ २९ ॥ नरदेह असिला मुका । तरी घेतां नये आशंका । अशक्त रोगी नासका । तरी तो निःकारण ॥३०॥ नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख । तरी तो जाणावा निरर्थक । निश्चयेसीं ॥ ३१ ॥ इतुकें हें नस्तां वेंग । नरदेह आणि सकळ सांग । तेणें धरावा परमार्थमार्ग । लागवेगें ॥ ३२ ॥ सांग नरदेह जोडलें । आणी परमार्थबुद्धि विसरलें । तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ॥ ३३ ॥ मृत्तिका खाणोन घर केलें । तें माझें ऐसें दृढ कल्पिलें । परी तें बहुतांचें हें कळलें । नाहींच तयासी ॥ ३४ ॥ मूषक म्हणती घर आमुचें । पाली म्हणती घर आमुचें ।

झाले आहेत. नरदेहांत येऊन हे उत्तम गतीला पोचले. तेव्हां आतां नरदेहाच्या श्रेष्ठतेविषयीं संशय राहत नाहीं. पशुदेहीं गति नाहीं. मोठमोठे संतमुनि नरदेहींच झाले आहेत. म्हणून जन्ममृत्यूचें अरिष्ट चुकवणारा हा नरदेहच सर्व देहांत श्रेष्ठ आहे (१६–२४). नरदेह हा स्वाधीन आहे, सहसा पराधीन नाहीं. परंतु हा परोपकारीं झिजवून कीर्तिरूपानें उरवला पाहिजे. अश्व, वृषभ, गाई, म्हशी इत्यादि अनेक प्रकारचे पशु, स्त्रिया व दासी यांना कृपा करून मोकळें सोडलें तर दुसरा कोणी तरी धरील तसा हा नरदेह नाहीं. मनुष्याची यावरची इच्छा राहो किंवा जावो पण याला कोणी बंधन करूं शकत नाहीं. नरदेह पांगळा, थोटा, अंध, बहिरा, मुका, अशक्त, रोगी, मूर्ख असा असला तर त्याचा स्वतःला किंवा दुसऱ्याला उपयोग होत नाहीं. यांपैकीं कोणतेंही व्यंग नसून नरदेह जर निर्व्यंग असेल तर मनुष्यानें तत्काळ परमार्थमार्ग धरावा. सांग नरदेह मिळून तो परमार्थी लाविला नाहीं तर मायेच्या जाळीं भ्रमणाऱ्या या मूर्खांना काय म्हणावें ? (२५–३३). माती खणून हा घर बांधतो

मक्षिका म्हणती घर आमुचें । निश्चयेंसी ॥ ३५ ॥ कांतण्या म्हणती घर आमुचें । मुंगळे म्हणती घर आमुचें । मुंग्या म्हणती घर आमुचें । निश्चयेंसी ॥ ३६ ॥ विंचू म्हणती आमुचें घर । सर्प म्हणती आमुचें घर । झुरळें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ३७ ॥ भ्रमर म्हणती आमुचें घर । भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर । आळिका म्हणती आमुचें घर । काष्ठामधें ॥ ३८ ॥ मार्जरें म्हणती आमुचें घर । श्वानें म्हणती आमुचें घर । मुंगसे म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ३९ ॥ पुंगळ म्हणती आमुचें घर । वाळव्या म्हणती आमुचें घर । पिसुवा म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४० ॥ ढेंकुण म्हणती आमुचें घर । चांचण्या म्हणती आमुचें घर । घुंगर्डी म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४१ ॥ पिसोळे म्हणती आमुचें घर । गांधेलें म्हणती आमुचें घर । सोट म्हणती आमुचें घर । आणी गोंबी ॥ ४२ ॥ बहुत किड्यांचा जोजार । किती सांगावा विस्तार । समस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४३ ॥ पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर । घरीचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४४ ॥ पाहुणे म्हणती आमुचें घर । मित्र म्हणती आमुचें घर । ग्रामस्थ म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४५ ॥ तस्कर म्हणती आमुचें घर । राजकी म्हणती आमुचें घर । अग्नि म्हणे आमुचें घर । भस्म करूं ॥ ४६ ॥ समस्त म्हणती घर माझें । हें मूर्खही म्हणे माझें माझें । सेवट जड जालें ओझें । टाकिला देश ॥ ४७ ॥ अवघीं घरें भंगलीं । गांवाची पांढरी पडिली । मग ते गृहीं राहिलीं । अरण्यश्वापदें ॥ ४८ ॥ किडा मुंगी वाळवी मूषक । त्यांचेंच घर हें निश्चयात्मक । हें प्राणी बापुडें मूर्ख । निघोन गेलें ॥ ४९ ॥ ऐसी गृहांची स्थिती । मिथ्या आली आत्मप्रचीती ।

आणि तें माझें असें त्याचें ममत्व धरतो, पण तें बहुतांचें आहे हें त्या मूर्खाला कळतच नाहीं. उंदीर म्हणतात हें घर आमचें, पाली म्हणतात हें घर आमचें ; याप्रमाणें माशा, कातण्या, मुंगळे, मुंग्या, विंचू, सर्प, झुरळें, भुंगे, गांजण्या, लाकडांतल्या आळ्या, मांजरें, कुत्रीं, मुंगसें, पुंगळ म्ह. पाद्रे, किडे, वाळव्या, ढेंकूण, चांचण्या म्ह. तांबडे मुंगळ, घुंगरडीं, पिसा, गांधिलमाशा, सोट नांवाचे जंतु इत्यादि अनेक प्रकारचे धरांत हिंडणारे प्राणीही हें घर आमचें म्हणून म्हणत असतात ! घरांतले पशु, दासी घरांतील इतर माणसें, पाहुणे, ग्रामस्थ हे सर्व आमचेंच घर म्हणतात. चोर म्हणतात आमचें घर, सरकार म्हणतें आमचें घर आणि अग्नि म्हणतो माझें घर मी वाटेल तेव्हां जाळीन ! याप्रमाणें हीं सारींच हें घर माझें असें सांगतात व हा मूर्खही घर माझें असेंच म्हणत राहतो ! ! बरें, संसारभार कठीण झाला म्हणजे हा आपलें हें घर व गांव टाकून पोटासाठीं दूर देशीं जातो. सगळ्या घरांची हीच स्थिति. कालांतरानें सारींच घरें पडून जातात. गांवचे गांव ओस होतात आणि त्याच घरांतून कोल्हींकुत्रीं येऊन राहतात. किडा, मुंगी, वाळवी व उंदीर यांचेंच खरोखर हें घर आहे. माझें माझें म्हणणाऱ्या ह्या मूर्खाला तें सोडून जावें लागतें. याप्रमाणें मातीचें घर माझें माझें म्हणून त्यावर ममत्व ठेवणें हें किती वृथा आहे हें

जन्म दों दिसांची वस्ती । कोठें तरी करावी ॥ ५० ॥ देह म्हणावें आपुलें । तरी हें बहुतांकारणें निर्मिलें । प्राणियांच्या माथां घर केलें । उवा मस्तकीं भक्षिती ॥ ५१ ॥ रोममुळीं किडे भक्षिती । खांडुक जाल्या किडे पडती । पोटामध्यें जंत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ॥ ५२ ॥ कीड लागे दांतांसी । कीड लागे डोळ्यांसी । कीड लागे कर्णासी । आणी गोमाशा भरती ॥ ५३ ॥ गोचिड अशुद्ध सेविती । चामवा मांसांत घुसती । पिसोळे चाऊन पळती । अकस्मात ॥ ५४ ॥ भोंगें गांधेलें चाविती । गोंबी जळवा अशुद्ध घेती । विंचू सर्प दंश करिती । कानटें फुर्सीं ॥ ५५ ॥ जन्मून देह पाळिले । तें अकस्मात व्याघ्रें नेलें । कां तें लांडगींच भक्षिलें । बळात्कारें ॥ ५६ ॥ मूषकें मार्जरें दंश करिती । श्वानें अश्वें लोळे तोडिती । रीसें मर्कटें मारिती । कासावीस करूनी ॥ ५७ ॥ उष्ट्रें डसोन उचलिती । हस्ती चिरडून टाकिती । वृषभ टोचून मारिती । अकस्मात ॥ ५८ ॥ तस्कर तडतडां तोडिती । भूतें झडपोन मारिती । असो या देहाची स्थिती । ऐसी असे ॥ ५९ ॥ ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें । परंतु खाजें जीवाचें । तापत्रें बोलिलें ॥ ६० ॥ देह परमार्थीं लाविलें । तरीच याचें सार्थक जालें । नाहीं तरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्यपंथें ॥ ६१ ॥ असो जे प्रापंचिक मूर्ख । तें काय जाणती परमार्थसुख । त्या मूर्खांचें लक्षण कांहीं येक । पुढें बोलिलें असे ॥ ६२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नरदेहस्तवन-निरूपणनाम समास दाहावा ॥ १० ॥

या अनुभवावरून कळून आलें. तात्पर्य, जन्म हो दोन दिवसांची वस्ती आहे, ती कोठें तरी करावी (३४–५०). घर आपलें म्हणणें हें असें खोटें तसा देह आपला म्हणणें हेंही खोटें आहे. देह तरी अनेकांकरितां निर्माण झाला आहे. उवा प्राण्यांच्या मस्तकावर घर करून मस्तकच खात असतात. रोमरंध्रांत किडे निर्वाह करून राहतात. खांडूक झालें तर त्यांत किडे उत्पन्न होतात. पोटांत जंत होतात हें तर आपण पाहतोंच. दांत व डोळे यांना कीड लागते. कानालाही कीड लागते व शिवाय त्यांत गोमाशाही भरतात. गोचीड रक्त पितात, चामवा मांसांत घुसतात, पिसाळें चावून पळून जातात. काळे भुंगे व गांधिलमाशा चावतात, गोमी व जळवा रक्त पितात, विंचू, सर्प, घणस व फुरशीं डसतात. जन्मभर वाढविलेला देह एकाएकीं वाघ वेऊन जातो व लांडगा झडप घालून फाडून खातो. मांजरउंदीर चावतात, कुत्रींघोडीं लचके तोडतात, अस्वलें व माकडें कासावीस करून मारतात. उंट डसून फेंकून देतात, हत्ती पायांखालीं चिरडतात व बैल शिंग खुपसून ठार मारितात. चोर तोडतात, भुतें झडपतात. असो. देहाची स्थिति या प्रकारची आहे. असें हें शरीरही अनेकांचें आहे व त्यालाच हा मूर्ख माझें असें म्हणतो. परंतु हें जीवाचेंच खाद्य आहे हें पुढें तापत्रयनिरूपणांत (दशक ३, समास ६–८) सांगितलें जाणार आहे. देह परमार्थीं लावला तरच याचें सार्थक होतें नाहीं तर अनेक अपघात होऊन मृत्युपंथाला जातो, असो. जे प्रपंचासक्त मूर्ख आहेत त्यांना परमार्थसुखाची काय कल्पना होय ? त्या मूर्खांचीं कांहीं लक्षणें आतां पुढें सांगतों (५१–६२). [द० १, स. १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ मूर्खलक्षणनाम दशक द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ ॐ नमोजि गजानना । येकदंता त्रिनयना । कृपादृष्टी भक्तजना । अवलोकावें ॥ १ ॥ तुज नमूं वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते । अंतरीं वसे कृपावंते । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥ वंदुनी सद्गुरुचरण । करुनी रघुनाथस्मरण । त्यागार्थ मूर्खलक्षण । बोलिजेल ॥ ३ ॥ येक मूर्ख येक पढतमूर्ख । उभयलक्षणीं कौतुक । श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ॥ ४ ॥ पढतमूर्खाचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण । सावध होऊनि विचक्षण । परिसोत पुढें ॥ ५ ॥ आतां प्रस्तुत विचार । लक्षणें सांगतां अपार । परी कांहींयेक तत्पर । होऊन ऐका ॥ ६ ॥ जे प्रापंचिक जन । जयांस नाहीं आत्मज्ञान । जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें ॥ ७ ॥ जन्मला जयांचे उदरीं । तयांसी जो विरोध करी । सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख ॥ ८ ॥ सांडुनी सर्वही गोत । स्त्रीआधीन जीवित । सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख ॥ ९ ॥ परस्त्रीसीं प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी । कुळेंवीण कन्या वरी । तो येक मूर्ख ॥ १० ॥ समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता ।

हे ओंकाररूप गजानना ! हे एकदंता ! हे त्रिनयना ! कृपादृष्टीनें आपल्या ह्या भक्ताकडे अवलोकन करावें. हे वेदमाते शारदे ! तुलाही नमन असो. हे दयाशीले ! स्फूर्तिरूपानें तूंही माझ्या अंतरांत रहा. सद्गुरु श्रीपरब्रह्म यांच्या चरणांना वंदन करून व उपास्य श्रीराम यांचें स्मरण करून मी आतां लोकहितार्थ मूर्खलक्षणें सांगतों; हेतु हा कीं लोकांनीं हीं ऐकून त्यांचा त्याग करावा (१–३). कांहीं मूर्ख असतात व कांहीं पढतमूर्ख असतात. उभयतांचीं लक्षणें श्रोत्यांनीं सादर व विवेकपूर्वक ऐकावीत. पढतमूर्खांचीं लक्षणें विचक्षण म्ह० चतुर श्रोत्यांना पुढें ऐकावयास मिळतील, प्रस्तुत मूर्खलक्षणें अपार आहेत त्यांपैकीं कांहीं सांगतों, तीं तत्पर होऊन ऐका. (४–६) ज्यांना आत्मज्ञान नाहीं व जे केवळ प्रपंचांतच दंग झाले आहेत असे जे अज्ञान जन त्यांनाच येथें मूर्ख म्हटलें आहे व त्यांचीं हीं लक्षणें आहेत (७). हीं लक्षणें समासाच्या शेवटपर्यंत सांगितलीं आहेत. आईबापांशीं विरोध करून बायकोला सर्व गूज सांगणें, इतर आप्तेष्टांचा त्याग करून केवळ बाईलबुद्ध्या होणें, आईबाप व इतर आप्तइष्ट यांना दूर ठेवून बायकोशींच तेवढा एकान्त करून तिला मात्र एकान्तांत घेणें, परस्त्रीशीं लघळपणा करणें, सासुरवाडीं कायम वस्ती करून राहणें, कुळशील न पाहतां केवळ सौंदर्यादि गुणांवर लुब्ध होऊन लग्नसंबंध करणें, यांत स्त्रैणत्व प्रगट होत असल्यामुळें, गृहकलहाचें बीज पेरलें जात असल्यामुळें व स्त्रैण पुरुष हा प्रपंचांत काय किंवा परमार्थांत काय पराक्रमशून्य निघत असल्यामुळें मूर्खलक्षणांत हें लक्षण प्रथम सांगितलें आहे (८–१०). आपल्याहून श्रेष्ठ व अधिक साधनें अनुकूल असलेल्या पुरुषांशीं अहंकारानें बरोबरी

सामर्थ्येंविण करी सत्ता। तो येक मूर्ख ॥ ११ ॥ आपली आपण करी स्तुती। स्वदेशीं भोगी विपत्ती। सांगे वडिलांची कीर्ती। तो येक मूर्ख ॥१२॥ अकारण हास्य करी। विवेक सांगतां न धरी। जो बहुतांचा वैरी। तो येक मूर्ख ॥ १३ ॥ आपुलीं धरुनियां दुरी। पराव्यासीं करी मीत्री। परन्यून बोले रात्रीं। तो येक मूर्ख ॥ १४ ॥ बहुत जागते जन। तयामध्यें करी शयन। परस्थळीं बहु भोजन। करी तो येक मूर्ख ॥ १५ ॥ मान अथवा अपमान। स्वयें करी परिच्छिन्न। सप्त व्यसनीं जयाचें मन। तो येक मूर्ख ॥ १६ ॥ धरून परावी आस। प्रेत्न सांडी सावकास। निसुगाईचा संतोष। मानी तो येक मूर्ख ॥ १७ ॥ घरीं विवेक उमजे। आणि सभेमध्यें लाजे। शब्द बोलतां निर्बुजे। तो येक मूर्ख ॥ १८ ॥ आपणाहून जो श्रेष्ठ। तयासीं अत्यंत निकट। सिकवणेचा मानी वीट। तो येक मूर्ख ॥ १९ ॥ नायके त्यांसी सिकवी। वडिलांसी जाणीव दावी। जो आरजास गोवी। तो येक मूर्ख ॥ २० ॥ येकायेकीं येकसरा। जाला विषईं निलाजिरा। मर्यादा सांडून सैरा। वर्ते तो येक मूर्ख ॥ २१ ॥ औषध ने घे असोन वेथा। पथ्य न करी सर्वथा। न मिळे आलिया पदार्था। तो येक मूर्ख ॥ २२ ॥ संगेविण विदेश करी। वोळखीविण संग धरी। उडी घाली महापुरीं। तो येक मूर्ख ॥ २३ आपणास जेथें मान। तेथें अखंड करी गमन। रक्षूं नेणें मानाभिमान। तो येक मूर्ख ॥ २४ ॥ सेवक जाला लक्ष्मीवंत। तयाचा होय अंकित। सर्वकाळ जो दुश्चित्त। तो येक मूर्ख ॥ २५ ॥ विचार न करितां कारण। दंड करी

करूं जाणें व सामर्थ्य नसतां सत्ता गाजविणें शेवटीं पराभवाला व फजीतीला कारण होणारें असल्यामुळें मूर्खत्वच होय (११). आत्मस्तुति करणें, पुरुषार्थाच्या गोष्टी सांगत स्वदेशीं खिचपत पडणें, स्वतःचा नाकर्तेपणा प्रगट असतां आमचे वडील असे मोठे होते व आमचें घराणें इतक्या योग्यतेचें आहे अशा उगाच फुशारक्या मारणें, कारणावांचून हसणें, दुसऱ्याचा विचार न ऐकणें, बहुतांशीं वाकडें असणें हें सारें मूर्खत्वाचें होय (१२–१३). ज्यांचा स्वाभाविक स्नेह अशा स्वकीयांना दूर लोटून परक्यांशीं स्नेह करणें व रात्रीं परच्छिद्रांची काथ्याकूट करणें (१४); इतर माणसें जागत असतां मध्येंच हातपाय ताणून घोरत पडणें, परक्या ठिकाणीं पचेल त्यापेक्षां अधिक जेवणें, मानापमान स्वतःच्या तोंडानें उघड करणें, जारणमारणादि हीन व्यसनांत निमग्न असणें (१५–१६); दुसऱ्याच्या विश्वासावर स्वतःचे प्रयत्न पार सोडणें, आळसाचा संतोष मानणें, घरीं विचार सुचून चारचौघांत लाजणें व बोलूं लागतांच गोंधळणें, वरिष्ठांशीं सलगी करणें, शिकवणीला कंटाळणें (१७–१९); दाटून उपदेश करणें, वडिलांपुढें शहाणपण मिरवणें, श्रेष्ठांस (आर्य) संकटांत पाडणें (२०); विषयभोगांविषयीं निर्लज्ज होऊन अमर्याद वागणें (२१); रोग असून औषध न घेणें व घेतल्यास पथ्य न संभाळणें, पुढें आलेल्या पदार्थांस आवडून न घेणें (२२); सोबतीवांचून परदेशास जाणें, ओळखीवांचून संगत करणें, महापुरीं उडी घालणें (२३), ज्या घरीं मानतात तेथें अकारण वारंवार जाणें, आपला मान राखूं न जाणें, सेवक श्रीमंतीस चढला तर त्याचा गुलाम होणें, सर्वकाळ चंचलचित्त असणें, कारणाचा शोध न करितां निरपराध्याला शिक्षा करणें, थोडक्यासाठीं कृपणता करणें (२४–२६), हीं मूर्खलक्षणें होत. देवकार्य व पितृकार्य (श्राद्धपक्षादि) न करणारा, शक्ति

अपराधेंविण । स्वल्पासाठीं जो कृपण । तो येक मूर्ख ॥ २६ ॥ देवलंड पितृलंड । शक्तिवीण करी तोंड । ज्याचे मुखीं भंडउभंड । तो येक मूर्ख ॥ २७ ॥ घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा । ऐसा जो कां मूढ वेडा । तो येक मूर्ख ॥ २८ ॥ नीच यातीसीं सांगात । परांगनेसीं येकांत । मार्गें जाय खात खात । तो येक मूर्ख ॥ २९ ॥ स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनोपकार । करी थोडें बोले फार । तो येक मूर्ख ॥ ३० ॥ तपीळ खादाड आळसी । कुश्चीळ कुटीळ मानसीं । धारिष्ट नाहीं जयापाशीं । तो येक मूर्ख ॥ ३१ ॥ विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान । कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख ॥ ३२ ॥ लंडी लटिका लाबाड । कुकर्मी कुटीळ निचाड । निद्रा जयाची वाड । तो येक मूर्ख ॥ ३३ ॥ उंचीं जाऊन वस्त्र नेसे । चौबारां बाहेरी बैसे । सर्वकाळ नग्न दिसे । तो येक मूर्ख ॥ ३४ ॥ दंत चक्षु आणी घ्राण । पाणी वसन आणी चरण । सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ॥ ३५ ॥ वैधृति आणी वितिपात । नाना कुमुहूर्तें जात । अपशकुनें करी घात । तो येक मूर्ख ॥ ३६ ॥ क्रोधें अपमानें कुबुद्धि । आपणास आपण वधी । जयास नाहीं दृढ बुद्धि । तो येक मूर्ख ॥ ३७ ॥ जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तोहि नेदी । नीच जनास वंदी । तो येक मूर्ख ॥ ३८ ॥ आपणास राखे परोपरी । शरणागतांस अव्हेरी । लक्ष्मीचा भर्वसा धरी । तो येक मूर्ख ॥ ३९ ॥ पुत्र कळत्र आणी दारा । इतुकाचि मानुनियां थारा । विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ॥ ४० ॥ जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें । हें जयास नेणवे । तो येक मूर्ख

नसतां तोंड करणारा, नीच शब्द फटकळपणें बोलणारा (२७), घरच्यांना वाघोबा व बाहेर गोगलगाय असा, हलक्या जातीशीं दोस्ती व परस्त्रीशीं एकान्त करणारा, वाटेनें खात खात जाणारा, परोपकार न करणारा व जो करील त्याशीं कृतघ्नपणें वागणारा, 'करी थोडें बोले फार' असा मनुष्य, हे मूर्खच होत (२८–३०). रागीट (तपिळ), खादाड, आळशी, घाणेरा (कुश्चिळ), कुटिल मनाचा, धारिष्टशून्य, हे सारे मूर्ख (३१), विद्या, वैभव, धन, पराक्रम, सामर्थ्य, मान यांपैकीं कांहीं एक नसून कोरडा अभिमान वाहणारा (३२); भेकड (लंडी), खोटा, लबाड, दुष्कर्मी, कुटिल, बेपर्वा किंवा उद्धट (निचाड), बहुनिद्रा (३३), उंच जागीं जाऊन वस्त्र नेसणारा, चव्हाट्यावर शौचविधीस बसणारा, सर्वकाळ नग्नप्राय (३४); हस्तपादादि सर्व अवयव नेहमीं मलिन ठेवणारा (३५); कुमुहूर्तावर बाहेर पडणारा व अपशकुन झाले तरी ते न जुमानून आपला घात करून घेणारा (३६); रागीटपणानें, अपमान झाला असें वाटून किंवा दुर्बुद्धीनें आत्महत्या करून घेणारा (३७); मायेच्या माणसांना सुखाचा शब्दही न देतां छळणारा व नीचांशीं नमून राहणारा (३८); हरप्रकार करून स्वशरीर राखून शरणागतांना झिडकारणारा व संपत्ति सर्वकाळ टिकेल असें मानणारा (३९); स्त्री, पुत्र व आपलें कुटुंब एवढाच आश्रय मानून ईश्वराला विसरणारा (४०); 'करावें तसें भरावें' हें तत्त्व न समजणारा (४१); पुरुषांपेक्षां स्त्रियांना आठपट काम असतो (स्त्रीणामष्टगुणः

॥ ४१ ॥ पुरुषाचेनि अष्टगुणें । स्त्रियांस ईश्वरी देणें । ऐशा केल्या बहुत जेणें । तो येक मूर्ख ॥ ४२ ॥ दुर्जनाचेनि बोलें । मर्यादा सांडून चाले । दिवसां झांकिले डोळे । तो येक मूर्ख ॥ ४३ ॥ देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही । ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो येक मूर्ख ॥ ४४ ॥ परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख । गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ॥ ४५ ॥ आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें । निंद्य वस्तु आंगिकारणें । तो येक मूर्ख ॥ ४६ ॥ तुक तोडून बोले । मार्ग सांडून चाले । कुकर्मी मित्र केले । तो येक मूर्ख ॥ ४७ ॥ पत्य राखों नेणे कदा । विनोद करी सर्वदा । हासतां खिजे पेटे द्वंदा । तो येक मूर्ख ॥ ४८ ॥ होड घाली अवघड । काजेंविण करी बडबड । बोलोंचि नेणे मुखजड । तो येक मूर्ख ॥ ४९ ॥ वस्त्र शास्त्र दोनी नसे । उंच जाऊन बैसे । जो गोत्रजांस विस्वासे । तो येक मूर्ख ॥ ५० ॥ तस्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु तेचि मागे । आपलें अनहित करी रागें । तो येक मूर्ख ॥ ५१ ॥ हीन जनासीं बराबरी । बोल बोले सरोत्तरीं । वामहस्तें प्राशन करी । तो येक मूर्ख ॥ ५२ ॥ समर्थासीं मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा करी । घरीचा घरीं करी चोरी । तो येक मूर्ख ॥ ५३ ॥ सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा । सार्थकेंविण वेची वयसा । तो येक मूर्ख ॥ ५४ ॥ संसारदुःखाचेनि गुणें । देवास गाळी देणें । मैत्राचें बोले उणें । तो येक मूर्ख ॥ ५५ ॥ अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ

कामः) हा ईश्वरी नियम असून पुष्कळ स्त्रियांशीं विवाह करणारा (४२); दुर्जनाच्या बोलामुळें स्वतः मर्यादा सोडून वागणारा व दिवसा डोळे झाकून (परिणामाकडे न पाहतां) वागणारा (४३); देव, गुरु, माता, पिता, ब्राह्मण व स्वामी यांच्याशीं कपटाचरण (द्रोह) करणारा (४४); परपीडेचें सुख मानणारा व परसुखाचें दुःख मानणारा आणि गेल्या वस्तूचा शोक करणारा (४५); ऐकणाराचा आदर नसेल तरी बोलणारा, विचारतां साक्ष न देणारा व निंद्य वस्तूचा (मद्य, परस्त्री इ०) स्वीकार करणारा (४६); दुसऱ्याचें महत्त्व (तुक) कमी होईल असें (तोडून) बोलणारा, आडमार्गानें जाणारा, दुराचाऱ्यांशीं मैत्री करणारा (४७); सचोटी न सांभाळणारा, सदा थट्टामस्करी करणारा व ती करितांना दुसऱ्यांनीं थट्टा केली तर खिजून वरदळीवर येणारा (४८); कठीण पैज घालणारा, कारण नसतां बडबडणारा व बोलायला पाहिजे तेव्हां मूकस्तंभासारखा गप्प बसणारा (४९); अंगावर उंची वस्त्र किंवा मुखांत 'शास्त्र' म्ह० ज्ञान अगर हातांत 'शस्त्र' नसून सभेंत प्रमुखस्थानीं (पहिल्या रांगेंत) जाऊन बसणारा, दायाद ऊर्फ भाऊबंद यांवर विश्वास ठेवून राहणारा (५०); चोराला ओळख सांगणारा, पाहिली वस्तु मागणारा व रागारागानें आपलेंच नुकसान करणारा (५१); हलक्या लोकांशीं बरोबरी करणारा, चढेलपणानें बोल बोलणारा, डाव्या हातानें दूधपाणी इ० पिणारा (५२); समर्थासी मत्सर व अलभ्यवस्तूची हांव बाळगणारा, घरच्या घरीं चोरी करणारा (५३); जगदीशाला विसरून मनुष्याचा भरंवसा मानणारा, आयुष्याचें (वयसा, वय) सार्थक न करितां तें फुकट दवडणारा (५४); संसारांत दुःख प्राप्त झालें म्हणून देवाला शिव्या देणारा, मित्राचे दोष लोकांत प्रगट करणारा (५५); लहानसहान दोषांची क्षमा न करितां सर्वकाळ धारेवर धरणारा, विश्वासघात करणारा (५६);

धारकीं धरी । जो विस्वासघात करी । तो येक मूर्ख ॥ ५६ ॥ समर्थांचे मनीचा तुटे । जयाचेनि सभा विटे । क्षणा बरा क्षणा पालटे । तो येक मूर्ख ॥ ५७ ॥ बहुतां दिवसांचे सेवक । त्यागून ठेवी आणिक । ज्याची सभा निर्नायक । तो येक मूर्ख ॥ ५८ ॥ अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीतीन्याय सोडी । संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मूर्ख ॥ ५९ ॥ घरीं असोन सुंदरी । जो सदांचा परद्वारी । बहुतांचें उच्छिष्ट अंगीकारी । तो येक मूर्ख ॥ ६० ॥ आपुलें अर्थ दुसऱ्यापासीं । आणि दुसऱ्याचें अभिळासी । पर्वत करी हीनासी । तो येक मूर्ख ॥ ६१ ॥ अतिताचा अंत पाहे । कुग्रामामधें राहे । सर्वकाळ चिंता वाहे । तो येक मूर्ख ॥ ६२ ॥ दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें । डोई खाजवी दोहीं हातें । तो येक मूर्ख ॥ ६३ ॥ उदकामधें सांडी गुरळी । पायें पाय कांडोळी । सेवा करी हीनकुळीं । तो येक मूर्ख ॥ ६४ ॥ स्त्रीबाळका सलगी देणें । पिशाच्यासन्निध बैसणें । मर्यादेविण पाळी सुणें । तो येक मूर्ख ॥ ६५ ॥ परस्त्रीसीं कळह करी । मुकी वस्तु निघातें मारी । मूर्खांची संगती धरी । तो येक मूर्ख ॥ ६६ ॥ कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे । खरें अस्तां खोटें साहे । तो येक मूर्ख ॥ ६७ ॥ लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी । देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ॥ ६८ ॥ आपलें काज होय तंवरी । बहुसाळ नम्रता धरी । पुढिलांचें कार्य न करी । तो येक मूर्ख ॥ ६९ ॥ अक्षरें गाळून वाची । कां तें घाली पदरिचीं । निगा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ॥ ७० ॥ आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी । बांधोन ठेवी बंदीं । तो येक मूर्ख ॥ ७१ ॥

समर्थांच्या म्ह० श्रेष्ठाच्या मनांतून उतरणारा, सभाजनांना विटवणारा आणि क्षणभर बरा व लगेच फिरणारा असा चिडचिड्या किंवा चलचित्त (५७); जुने सेवक काढून नवे ठेवणारा, अध्यक्षावांचून (नायक) सभा भरवणारा (५८); पापमार्गानें द्रव्यार्जन करणारा, धर्मन्यायनीति सोडून वागणारा, संगतीचें मनुष्य तोडणारा (५९); घरीं सुंदर स्त्री असून परस्त्रीगमन करणारा व दुसऱ्याच्या उष्ट्या पत्रावळी चाटणारा (६०); आपलें धन दुसऱ्याजवळ ठेवून तिसऱ्याच्या द्रव्याचा अभिलाष करणारा; व हलक्या लोकांबरोबर देण्याघेण्याचा व्यवहार (पर्वत) करणारा (६१); अतीताचा अंत पाहणारा म्ह० छळ करणारा, कुग्रामांत राहणारा, सर्वदा चिंता वाहणारा (६२); दोघे बोलत असतां तेथें जाऊन बसणारा, दोन्ही हातांनीं दुसऱ्यां-समोर डोकें खाजविणारा (६३); उदकांत चूळ (गुरळी) टाकणारा, पायानें पाय खाजविणारा, कुलीन नव्हे अशाची नोकरी करणारा (६४); स्त्रीपुत्रांना फाजील लाड करून सलगी देणारा, पिशाचाजवळ बसणारा, कुत्र्याला अमर्यादेनें वागूं देणारा (६५); परस्त्रीशीं भांडणारा, मुक्या प्राण्याला शस्त्रानें मारणारा, मूर्खांची संगति धरणारा (६६); कौतुकानें भांडण पाहत उभा राहून तें न मिटविणारा, खरें माहीत असतां खोटें सहन करणारा (६७); घरांत संपत्ति आल्यावर मागची ओळख विसरणारा, देवांब्राह्मणांवर सत्ता चालवूं पाहणारा (६८); आपलें काम होईतों नम्रतेनें वागणारा व प्रत्युपकाराची वेळ चुकविणारा (६९); अक्षरें गाळून व पदरचीं घालून वाचणारा, पुस्तकाची जोपासना न करणारा (७०); आपलें पुस्तक आपण कधींहि

ऐसीं हें मूर्खलक्षणें । श्रवणें चातुर्य बाणे । चित्त देउनियां शहाणे । ऐकती सदा ॥ ७२ ॥ लक्षणें अपार असती । परी कांहीं येक यथामती । त्यागार्थ बोलिलें श्रोतीं । क्षमा केलें पाहिजे ॥ ७३ ॥ उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्खलक्षणें त्यागावीं । पुढिलिये समासीं आघवीं । निरोपिलीं ॥ ७४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मूर्खलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

श्रीराम ॥ श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण । जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ॥ १ ॥ वाट पुसिल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये । पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ॥ २ ॥ अतिवाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये । शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता ॥ ३ ॥ विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये । मर्यादेविण हालों नये । कांहीं येक ॥ ४ ॥ प्रीतीविण रुसों नये । चोरास वोळखी पुसों नये । रात्रीं पंथ क्रमूं नये । येकायेकीं ॥ ५ ॥ जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये । पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ६ ॥ निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये । द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें ॥ ७ ॥ वक्तयास खोदूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये । विद्याअभ्यास सोडूं नये । कांहीं केल्यां ॥ ८ ॥ तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये । संतसंग

न वाचतां तें दसरांत बांधून ठेवून दुसऱ्यास वाचण्यापुरतेंही न देणारा (७१); हे सर्व मूर्ख आहेत. यांपैकीं एक किंवा अधिक लक्षणें ज्याच्या अंगीं आहेत तो मूर्ख समजावा. हीं लक्षणें ऐकल्यानें हीं टाकायची बुद्धि होऊन मनुष्य चतुर होतो, शहाणे लोक हीं चित्त देऊन ऐकतात. मूर्खलक्षणें असंख्य आहेत ? तीं कोठवर सांगावी ? पण त्यांपैकीं कांहीं त्यागार्थ 'सांगितलीं आहेत. श्रोत्यांनीं क्षमा करावी. वरील मूर्खलक्षणें टाकावींत व उत्तम लक्षणें घ्यावींत तीं पुढें सांगूं (७२–७४). [द० २, स० १.]

मूर्खलक्षणें सांगितलीं. आतां कोणत्या गुणांना उत्तम लक्षणें म्हणतात तें सांगतों. हीं लक्षांत आलीं म्हणजे सर्वज्ञपण' म्हणजे काय तें समजेल (१). पुढील ओव्या सोप्या असल्यामुळें शब्दशः भाषांतर देण्याचें कारण नाहीं. वाट पुसल्यावांचून चालूं नये. (कां कीं ती चुकली असें मागून कळलें तर तेवढी परत चालून यावी लागते व पुन्हा इष्ट मार्ग सुधारावा लागतो. या गबाळपणामुळें द्रव्य, वेळ व कष्ट व्यर्थ फुकट जाऊन कार्यहानि होण्याचा संभव असतो.) फळ ओळखल्यावांचून खाऊं नये, (तें एखादे वेळीं अपाय करील व प्राणनाशाचीही पाळी आणील.) चौकशी केल्यावांचून पडलेली वस्तु पाहिली कीं लोभानें घेतली असें करूं नये, (नस्ती चोरी अंगीं लागायची व संकटांत पडायचा संभव असतो.) ह्या समासांत सावधानतेच्या सूचना श्रीसमर्थांनीं केल्या आहेत (२). अतिवादानें दीर्घकाळाचा स्नेह तुटून वैर उत्पन्न होतें व त्याच्या मागून उभयपक्षीं दुःखें भोगावीं लागतात. वाद चांगला नाहींच पण अतिवाद अत्यंत वाईट होय. घराण्यांतील माणसांची व मुलीची वर्तणूक कशी आहे याची बारकाईनें चौकशी काढल्याशिवाय कुलहीन कांता करूं नये, मागाहून पश्चात्तापाची पाळी यायची ! (३). प्रेमावांचून रागावलांत तर तुमच्या रागाला पुसतो कोण ? (५). आर्जव म्ह० सरळपणा गोडी (६). वक्त्याचा मानभंग होईल अशा तऱ्हेनें त्याला अडवणुकीचे प्रश्न करूं नयेत. सभेंत एकविचार होत असेल तर विचारांचे फाटे फोडून सभा मोडूं नये (८). अंतर्यामीं संतसंग खंडूं नये म्ह० सद्वस्तु जी परब्रह्म किंवा तद्रूप झालेला संत

खंडूं नये । अंतर्यामीं ॥ ९ ॥ अतिक्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये । मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ॥ १० ॥ क्षणक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये । केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ॥ ११ ॥ बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये । केल्याविण निखदूं नये । पुढिलांसी कदा ॥ १२ ॥ आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये । शोधिल्याविण करूं नये । कार्य कांहीं ॥ १३ ॥ सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये । कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १४ ॥ सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये । पैज होड घालूं नये । कांहीं केल्यां ॥ १५ ॥ बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये । परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ॥ १६ ॥ कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये । परपीडा करूं नये । विस्वासघात ॥ १७ ॥ शोच्येंविण असों नये । मळिण वस्त्र नेसों नये । जाणारास पुसों नये । कोठें जातोस म्हणउनी ॥ १८ ॥ व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये । आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ॥ १९ ॥ पत्रेंविण पर्वत करूं नये । हीनाचें रुण घेऊं नये । गोहीविण जाऊं नये । राजद्वारा ॥ २० ॥ लटिकी जाजू घेऊं नये । सभेस लटिके करूं नये । आदर नस्तां बोलों नये । स्वाभाविक ॥ २१ ॥ आदखणेपण करूं नये । अन्यायेंविण गांजूं नये । अनीतीनें वर्तों नये । आंगबळें ॥ २२ ॥ बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये । बहुत दिवस राहों नये । पिसुणाचेथें ॥ २३ ॥ आपल्याची गोही देऊं नये । आपली कीर्ती वर्णूं नये । आपलें आपण हासों नये ।

यांच्याविषयींचें प्रेम मोडूं नये (९). कोणी चांगल्या गोष्टी किंवा सदुपदेश सांगत असेल तर तो ऐकावा. नवीन असेल तर फायदाच आहे, माहीत असलेलेंच तो पुन्हा सांगत असेल तर नवी जागृति मिळत आहे असें मनांत आणून ऐकायला कंटाळूं नये (१०). आपला पराक्रम आपणच स्वमुखानें सांगण्यांत मूर्खपण-पदरीं येतें. पराक्रम नसून प्रौढी मिरवणें फारच मूर्खत्वाचें आहे. पराक्रम केल्यावर सांगूं नयेच, मग न करितां घमेंडीनें बोलणें म्ह० तर मूर्खत्वाची कमाल होय (११). दुसऱ्यास निखंदूं नये म्ह० त्याचा तिरस्कार व उपहास करूं नये (१२). चहाडी ऐकूंच नये पण कानांवर पडलीच तर तिचा मनावर परिणाम होऊं देऊं नये. स्वबुद्धीनें न्यायान्याय पाहून ठरवावें (१३). शरीर आळसानें सुखाच्या आधीन करूं नये, कष्ट व प्रयत्न करणें सोडूं नये (१४), निसुगपण = आळस (१६). आपली स्वतंत्रता मोडते म्हणून कोणाचा उपकार घेऊंच नये, पण प्रसंगानें घेतलाच तर पर्यायानें तरी तो फेडल्याशिवाय राहूं नये (१७). व्यापकपण म्ह० मोठ्या मनानें सर्व बाजूंचा विचार करून बहु उद्योग करणें (१९). पत्रेंवीण म्ह० लेख किंवा दस्तऐवज, त्यावांचून पर्वत म्ह० देण्याघेण्याचा व्यवहार करूं नये. हलक्या माणसाचें कर्ज घेऊं नये, तो अल्पासाठीं आपली अब्रू चव्हाट्यावर आणील. साक्षीदार बरोबर घेतल्यावांचून राजदरबारीं जाऊं नये (२०). खोटी बाजू , कज्जा (जाजू) अंगावर घेऊं नये. आपल्या मतासाठीं सभा खोटी पाडूं नये (२१). अदेखणेपण—अमंगळपणा, कुत्सितपणा. अंगबळें म्ह० झोंडपणानें, शरीरबळाचा दुरुपयोग करून अन्यायानें वागूं नये (२२). आपला मनुष्य आहे एवढ्यावरच त्याची ग्वाही देऊं नये म्ह० हट्टानें त्याच्या म्हणण्याचा आग्रह

गोष्टी सांगोनी ॥ २४ ॥ धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेऊं नये । बहुचकासीं करूं नये । मैत्री कदा ॥ २५ ॥ कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये । आसुदें अन्न सेऊं नये । वडिलांचेंही ॥ २६ ॥ तोंडीं सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये । उणें अंगीं संचरों नये । कुळवंताचे ॥ २७ ॥ देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये । जिवलगांसी करूं नये । कलह कदा ॥ २८ ॥ कोणी येकाचा घात करूं नये । लटिकी गोही देऊं नये । अप्रमाण वर्तों नये । कदाकाळीं ॥ २९ ॥ चाहाडी चोरी धरूं नये । परद्वार करूं नये । मागें उणें बोलों नये । कोणियेकाचें ॥ ३० ॥ समईं यावा चुकों नये । सत्त्वगुणा सांडूं नये । वैरियांस दंडूं नये । शरण आलियां ॥ ३१ ॥ अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये । मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ॥ ३२ ॥ मूर्खासीं समंध पडों नये । अंधारीं हात घालों नये । दुश्चितपणें विसरों नये । वस्तु आपुली ॥ ३३ ॥ स्नानसंध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये । अनाचार मांडूं नये । चुकुरपणें ॥ ३४ ॥ हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये । परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ॥ ३५ ॥ देवाचा नवस बुडऊं नये । आपला धर्म उडऊं नये । भलतें भरी भरों नये । विचारेंविण ॥ ३६ ॥ निष्ठुरपण धरूं नये । जीवहत्या करूं नये । पाउस देखोन जाऊं नये । अथवा अवकाळीं ॥ ३७ ॥ सभा देखोन गळों नये । समईं उत्तर टळों नये । धिःकारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ॥ ३८ ॥ गुरुविरहित असों नये । नीच यातीचा गुरु करूं नये । जिणें शाश्वत मानूं नये । वैभवेंसीं ॥ ३९ ॥ सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये । कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ ४० ॥ अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाढवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ ४१ ॥ न घेतां हे उत्तम गुण । तें मनुष्य अवलक्षण । ऐक तयांचें लक्षण । पुढिलिये समासीं ॥ ४२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमलक्षणनाम समास दुसरा ॥ २ ॥

धरूं नये. निःपक्षपातीपणा ठेवून खऱ्याखोट्याचा निवाडा करावा (२४). धूम्रपानादि व्यसनांत सापडूं नये. बहुचकासी म्ह० बोहोचक, चोंबडा, वाचाळ, अशाशीं मैत्री करूं नये (२५). असुदें म्ह० मिंधेपणानें वडिलांचेंही अन्न खाऊं नये. आयतोबा होऊं नये. काम करून स्वकष्टार्जित अन्न खावें, त्यांत तेज राहतें (२६). कुलवंताचे म्ह० भल्याचे दोष मनास आणूं नयेत (२७). अप्रमाण म्ह० मर्यादा सोडून वागूं नये (२९). यावा धारिष्ट (३१). पवित्र जनांची मर्यादा राखावी (३२). कुळाचार सोडूं नयेत, चुकारपणें अनाचार (वाईट आचार) मांडूं नयेत (३४). भलत्या भरीं भरूं नये म्ह० हट्टाला पेटूं नये (३६). अवकाळीं म्ह० अकाळीं, कुमुहूर्तावर (३७). नीच यातीचा गुरु कां करूं नये हें पुढें दशक ५ मध्यें सांगतील. गुरुवांचूनही राहूं नये (३९). [द. २, स. २]

॥ श्रीराम ॥ ऐका कुविद्येचीं लक्षणें। अतिहीनें कुलक्षणें। त्यागार्थ बोलिलीं ते श्रवणें। त्याग घडे ॥ १ ॥ ऐका कुविद्येचा प्राणी। जन्मा येऊन केली हानी। सांगिजेल येहीं लक्षणीं। वोळखावा ॥ २ ॥ कुविद्येचा प्राणी असे। तो कठिण निरूपणें त्रासे। अवगुणाची समृद्धि असे। म्हणोनियां ॥ ३ ॥

श्लोक ॥ दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च। अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥

काम क्रोध मद मत्सर। लोभ दंभ तिरस्कार। गर्व ताठा अहंकार। द्वेष विषाद विकल्पी ॥ ४ ॥ आशा ममता तृष्णा कल्पना। चिंता अहंता कामना भावना। असूया अविद्या ईषणा वासना। अतृप्ती लोलंगता ॥ ५ ॥ इच्छा वांछा चिकित्सा निंदा। आनित्य ग्रामणी मस्ती सदा। जाणीव अवज्ञा विपत्ती आपदा। दुर्वृत्ती दुर्वासना ॥ ६ ॥ स्पर्धा खटपट आणी चटपट। तऱ्हे झटपट आणि वटवट। सदा खटपट आणी लटपट। परम व्यथा कुविद्या ॥ ७ ॥ कुरूप आणी कुलक्षण। अशक्त आणी दुर्जन। दरिद्री आणी कृपण। आतिशयेंसीं ॥ ८ ॥ आळसी आणी खादाड। दुर्बळ आणी लाताड। तुटक आणी लाबाड। अतिशयेंसी ॥ ९ ॥ मूर्ख आणी तपीळ। वेडें आणी वाचाळ। लटिकें आणी तोंडाळ। आतिशयेंसीं ॥ १० ॥ नेणे आणी नायके। न ये आणी न सीके। न करी आणी न देखे। अभ्यासदृष्टी ॥ ११ ॥ अज्ञान आणी अविस्वासी। छळवादी आणी दोषी। अभक्त आणी भक्तांसी। देखों सकेना ॥ १२ ॥ पापी आणी निंदक। कष्टी आणी घातक। दुःखी आणी हिंसक। आतिशयेंसीं

आतां त्यागार्थ कुविद्येचीं लक्षणें सांगतों. कुविद्येचा प्राणी नरदेह व्यर्थ दवडतो. त्याचीं लक्षणें ऐका (१–२). त्याला सद्विद्येचे ग्रंथ ऐकणें संकट वाटतें. वेद, वेदान्त, उपनिषदें, शास्त्रें अशा जन्मसाफल्याचा मार्ग दाखविणाऱ्या ग्रंथांचें निरूपण त्यास त्रासदायक वाटतें! मात्र नाटककादंबऱ्यादि ग्रंथ तो मिटक्या मारीत वाचतो व ऐकतो. तो स्वतः दोषांची खाण असतो म्हणून त्याचें परमार्थग्रंथश्रवणानें डोकें उठतें (३). दोष कोणते म्हणाल तर दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता, अज्ञान इ० (गीता अ० १६–४). कामक्रोधादि सहा रिपु, द्वेष, रडकेपणा (विषाद), विकल्प म्ह० संशयखोरपणा, आशा, ममता, चिंता, अहंता, कामना, इच्छा (ईषणा), हांव (अतृप्ति), विषयासक्ति (लोलंगता), अनीति, गांवकुटाळपणा (ग्रामणी), मस्तपणा, नाना खटपटींत व लटपटींत सदा मग्न असणें, इ० कुविद्येचीं ऊर्फ आसुरी संपत्तीचीं लक्षणें त्याच्या अंगीं असतात (४–७). आळशी असून खादाड. (येथून पुढें २१ ओव्यांत ' आणि ' हा शब्द ' असून ' ह्या अर्थी मोठ्या चातुर्यानें योजलेला असून त्याचा अर्थ मननपूर्वक ध्यानीं आणला पाहिजे.) ' आळशी आणि (असून) खादाड ' स्वतः उद्योगरत असून पुष्कळ मिळवून यथेच्छ खात असेल तर फारसा दोष नाहीं; बरें, आळशी असून खाण्यापिण्याचा कोणाला त्रास होत नसेल तरी फारसें बिघडत नाहीं; पण स्वतः आळशी म्ह० कष्ट करून पैसे मिळवावयाला नकोत व जेवावयाला मात्र चारी ठाव चमचमीत पाहिजे; मग त्या दोषाला काय म्हणावें ? ' दुर्बळ आणि लाताड ' म्ह० तिरसट, कजाग. दुर्बळ असून गरिबीनें वागणारा असेल त्याला लोक मिळवून घेतात, सबळ असून लाताड असेल तर चार लाथा खाईल व चार देईल, बरोबरीनें तरी वागेल. पण शक्ति नाहीं म्हणून दुर्बळ आणि त्यांत पुन्हां लाताड, मग त्याचे क्लेश काय विचारावे ? तुटक आणि लबाड; मूर्ख आणि तापट (तपीळ); वेडा आणि वाचाळ; लटिका आणि तोंडाळ; नेणे आणि नायके; न ये आणि न शिके, छळवादी आणि दोषी; पापी आणि निंदक; कष्टी आणि घातक अथवा दुःखी आणि हिंसक; हीन आणि कृत्रिमी म्ह० ढोंगी, नटव्या, ढोंगी; रोगी आणि

॥ १३ ॥ हीन आणी कृत्रिमी । रोगी आणी कुकर्मी । आचंगुल आणी अधर्मी । वासना रमे ॥ १४ ॥ हीन देह आणी ताठा । अप्रमाण आणी फांटा । बाष्कळ आणी करंटा । विवेक सांगे ॥ १५ ॥ लंडी आणी उन्मत्त । निकामी आणी डुल्लत । भ्याड आणी बोलत । पराक्रमु ॥ १६ ॥ कनिष्ठ आणी गर्विष्ठ । नुपरतें आणी नष्ट । द्वेषी आणी भ्रष्ट । आतिशयेंसीं ॥ १७ ॥ अभिमानी आणी निसंगळ । वोडगस्त आणी खळ । दंभिक आणी अनर्गळ । आतिशयेंसीं ॥ १८ ॥ वोखटें आणी विकारी । खोटें आणी अनोपकारी । अवलक्षण आणी धिःकारी । प्राणिमात्रांसी ॥ १९ ॥ अल्पमती आणी वादक । दीनरूप आणी भेदक । सूक्ष्म आणी त्रासक । कुशब्दें करूनि ॥ २० ॥ कठिणवचनी कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी । दुःखवचनी तीव्रवचनी । क्रूर निष्ठुर दुरात्मा ॥ २१ ॥ न्यूनवचनी पैशून्यवचनी । अशुभवचनी आनित्यवचनी । द्वेषवचनी अनृत्यवचनी । बाष्कळवचनी धिःकारु ॥ २२ ॥ कपटी कुटिल गाठ्याळ । कुटें कुचर नठ्याळ । कोपी कुधन टवाळ । आतिशयेंसीं ॥ २३ ॥ तपीळ तामस अविचार । पापी अनर्थी अपस्मार । भूतसमंधी संचार । आंगीं वसे ॥ २४ ॥ आत्महत्यारा स्त्रीहत्यारा । गोहत्यारा ब्रह्महत्यारा । मातृहत्यारा पितृहत्यारा । महापापी पतित ॥ २५ ॥ उणें कुपात्र कुतर्की । मित्रद्रोही विस्वासघातकी । कृतघ्न तल्पकी नारकी । आतित्याई जल्पक ॥ २६ ॥ किंत भांडण झगडा कळहो । अधर्म अनराहाटी शोकसंग्रहो । चाहाड वेमनी विग्रहो । निग्रहकर्ता ॥ २७ ॥ द्वाड अपेसी वोंगळ । चाळक चुंबक लच्याळ । स्वार्थी अभिळासी वोढाळ । अदत्त झोंड आदखणा ॥ २८ ॥ शठ शुंभ कातरु । लंड तर्मुंड सितरु । बंड पाषांड तस्करु । अपहारकर्ता ॥ २९ ॥ धीट सैराट मोकाट । चाट चावट वाजट ।

कुकर्मी; कृपण (आचंगुल) आणि पापवासना असलेला; बाष्कळ (नियमानें न चालणारा) आणि परोपदेशी; भित्रा (लंडी) आणि उद्धट; निरुद्योगी (निकामी) आणि ताठर म्ह० अभिमानानें डोलणारा; विषयासक्त (नुपरतें) आणि कृपण (नष्ट); वोडगस्त म्ह० देण्याघेण्याच्या चिंतेंत गुरफटलेला आणि खळ; अल्पमति आणि वादक; दीनरूप आणि दोषदृष्टि (भेदक); स्वतः चिडचिड्या (सूक्ष्म) आणि कुशब्दांनीं इतरांस ताडण करणारा; (इ० जोड्या समर्थांनीं दिल्या आहेत त्यांचा वर सुचविल्याप्रमाणें अर्थ करावा. सर्व जोड्या उलगडून दाखविल्यास विस्तार फार होईल व वाचकांनाही विचार करावयाला जागा न ठेवल्यास त्यांच्या मार्मिकतेचा अपमान केल्यासारखें होईल !) (७–२०). त्याचें बोलणें (कठोर, कर्कश, कपटाचें, संशयाचें, दुःख देणारें, असत्य, बाष्कळपणाचें, धिक्काराचें इ० असतें (२१–२२). जो रागीट, आंतल्या गांठीचा (गांठ्याळ), कुरटा म्ह० क्षुद्र मनाचा, अंगचोर (कुचर), सर्वांशीं वाईट रीतीनें वागणारा, निंदक, मठ्ठ (शुंभ), भित्रा (कातर), कोडगा (झोंड), लंड तर्मुंड सितरु म्ह० ठक, अद्वातद्वा वागणारा (सैराट), अनर्गळ

थोंट उद्धट लंपट । बटवाल कुबुद्धी ॥ ३० ॥ मारेकरी वरपेकरी । दरवडेकरी खाणोरी । मैंद भोंदु परद्वारी । भुरेकरी चेटकी ॥ ३१ ॥ निशंक निलाजिरा कळभंट । टोणपा लौंद घट उद्धट । ठस ठोंबस खट नट । जगभांड विकारी ॥ ३२ ॥ अधीर आळिका अनाचारी । अंग पंगु खोंकलेकरी । थोंटा बधिर दमेकरी । तऱ्ही ताठा न संडी ॥ ३३ ॥ विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन । शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीन भिकारी ॥ ३४ ॥ बळहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन । लक्षणहीन लावण्यहीन । आंगहीन विपारा ॥ ३५ ॥ युक्तिहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन । क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशई ॥ ३६ ॥ भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लकु ॥ ३७ ॥ समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे । आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ॥ ३८ ॥ असो ऐसे नाना विकार । कुलक्षणाचें कोठार । ऐसा कुविद्येचा नर । श्रोतीं वोळखावा ॥ ३९ ॥ ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनि त्यागची करणें । अभिमानें तऱ्हे भरणें । हें विहित नव्हे ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कुविद्यालक्षणनाम समास तिसरा ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ । त्याहीमधें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे ॥ १ ॥ नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहीवरी संध्यास्नान । सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें ॥ २ ॥ भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम । काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा ॥ ३ ॥ प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणी भक्तांचा

(मोकाट), बडबड्या (चाट), वात्रट (वाजट), कुभांड्या (थोंट), भ्रष्ट (बटवाल), लुटारू (वरपेकरी), प्राण घेणारा (खाणोरी), भुरळ पाडणारा (भुरेकरी), निर्लज्ज, निःशंक, भांडकुदळ कलहभट (कळभंट), दडप्या (ठस), ठोंब्या म्ह० अक्षरशत्रु, कपाळकरंटा (अदृष्टहीन), कोणताच धर्मसंप्रदाय नसलेला (मुद्राहीन), व्रत किंवा धर्मविधि न करणारा (दीक्षाहीन), कुरूप (विपारा), तात्पर्य 'सर्वहीन क्षुल्लक' असा हा कुविद्येचा प्राणी असतो (२३–३७). भावभक्ति, ज्ञान, आचार, वैराग्य, क्षमा इ० दैवी संपत्तीचे गुण त्याजवळ नसतात, त्याला समयप्रसंग कळत नाहीं, प्रयत्न, अभ्यास, आर्जव, मैत्री यांपैकीं 'कांहींच नेणे अभागी'; असा तो नाना विकारांनीं भरलेला, कुलक्षणांचें घर असा कुविद्येचा प्राणी स्वतःस व इतरांस अनुपयोगी होय. त्याचें जन्म व्यर्थ होय (३८–४०). [द० २, स. १]

अनेक सुकृताचें फळ तो हा नरदेह आहे, त्यांतही पुन्हां सन्मार्ग लागणें ही फारच मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. नरदेहांतही ब्राह्मणजन्म दुर्लभ, त्यांतही पुन्हां स्नानसंध्यादि सत्कर्मे करण्याची व भगवद्भजनाची आवड दुर्लभ. इतकें असूनही सत्संग घडला तर काळसार्थकाचा लाभ झाला असें समजावें (१–३). देवाविषयीं सद्भावाची प्रेमप्रीति अंतरांत

समुदाव । हरिकथा मोहोत्साव । तेणें प्रेमा दुणावे ॥ ४ ॥ नरदेहीं आलियां येक । कांहीं करावें सार्थक । जेणें पाविजे परलोक । परम दुल्लभ जो ॥ ५ ॥ विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दयादानधर्म । अथवा करणें सुगम । भजन भगवंताचें ॥ ६ ॥ अनुतापें करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग । नाहीं तरी धरणें संग । साधुजनाचा ॥ ७ ॥ नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावीं । अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ॥ ८ ॥ अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार । निरूपणीं सारासार । विवेक करणें ॥ ९ ॥ पाळावी वेदांची आज्ञा । कर्मकांड उपासना । जेणें होईजे ज्ञाना । अधिकारपात्र ॥ १० ॥ काया वाचा आणी मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें । कांहीं तरी येक भजनें । सार्थक करावें ॥ ११ ॥ जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ । ऐसें न करितां निर्फळ । भूमिभार होये ॥ १२ ॥ नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित । यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥१३॥ हें कांहींच जो न धरी मनीं । तो मृतप्राय वर्ते जनीं । जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ॥ १४ ॥ नाहीं संध्या नाहीं स्नान । नाहीं भजन देवतार्चन । नाहीं मंत्र जप ध्यान । मानसपूजा ॥ १५ ॥ नाहीं भक्ति नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम । नाहीं देव नाहीं धर्म । अतीत अभ्यागत ॥ १६ ॥ नाहीं सद्बुद्धि नाहीं गुण । नाहीं कथा नाहीं श्रवण । नाहीं अध्यात्मनिरूपण । ऐकिलें कदा ॥ १७ ॥ नाहीं भल्यांची संगति । नाहीं शुद्ध चित्तवृत्ति । नाहीं कैवल्याची प्राप्ती । मिथ्यामदें ॥ १८ ॥ नाहीं नीति नाहीं न्याय । नाहीं पुण्याचा उपाय ।

असली आणि त्याला भक्तसमागमाची जोड मिळाली म्हणजे हरिकथामहोत्सवादि सुप्रसंग अनायासें येतात व त्यामुळें हरिप्रेम वाढीस लागतें (४). परमदुर्लभ असा परलोक (प्रकृतिपर – प्रकृतिपलीकडचें निजस्वरूप) जेणेंकरून प्राप्त होईल असें कांहीं तरी सार्थक करावें तरच नरदेह मिळाल्याची धन्यता. विधियुक्त ब्रह्मकर्म करावें, किंवा दयादानधर्म पाळावा, अथवा हरिभजन करावें. अनुतापयुक्त त्याग करावा, किंवा भक्तियोग आचरावा, नाहीं तर सत्संग धरावा. नाना शास्त्रग्रंथ पाहावेत, किंवा तीर्थयात्रा कराव्या, किंवा पापनाशार्थ गायत्रीचीं पुरश्चरणें करावीं. परोपकारांत आयुष्य वेंचावें, किंवा ज्ञानविचार पाहावा. किंवा संतगुरुमुखानें ऐकलेल्या निरूपणाचा सारासार विचार करावा. वेदाज्ञेप्रमाणें कर्मकांड, उपासनाकांड ह्या मार्गानें जाऊन ज्ञानाधिकार प्राप्त करून घ्यावा. कायावाचामनानं ‘ पत्रं पुष्पं फलं तोयं ’ देऊन कोणत्याही भक्तीनें देव जवळ करावा. तात्पर्य, कांहीं तरी जन्म सफल होय तें करावें, व्यर्थ भूमिभार होऊं नये. कांहीं आत्महित करावें, यथाशक्ति चित्तवित्त परमेश्वरसेवेला लावावें हें नरदेहाचें साफल्य होय. हें कांहींच मनांत न धरितां जो वागतो तो जिवंत असून मेल्यासारखाच होय, व्यर्थ त्यानें माता शिणविली (५–१४). स्नानसंध्या, भजन, देवतार्चन, मंत्रजप, ध्यान, मानसपूजा, यांपैकीं कांहींच जो करीत नाहीं; देवावर प्रेम, भक्ति, निष्ठा नाहीं, देवधर्म, अतीथअभ्यागत नाहीं, हरिकथाश्रवण व अध्यात्मनिरूपण नाहीं, चित्तशुद्धीचे उपाय शोधीत नाहीं, खोट्या अहंकारानें आपल्याभोंवतींच डोलत राहून मोक्षप्राप्तीचा मार्ग पाहत नाहीं, न्यायनीतीचें

नाहीं परत्रीची सोय । युक्तायुक्तक्रिया ॥ १९ ॥ नाहीं विद्या नाहीं वैभव । नाहीं चातुर्याचा भाव । नाहीं कळा नाहीं लाघव । रम्यसरस्वतीचें ॥ २० ॥ शांती नाहीं क्षमा नाहीं । दीक्षा नाहीं मीत्री नाहीं । शुभाशुभ कांहींच नाहीं । साधनादिक ॥ २१ ॥ शुचि नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं । आरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्त क्रिया मनाची ॥ २२ ॥ कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं । योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहींच नाहीं पाहातां ॥ २३ ॥ उपरती नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं । आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ॥ २४ ॥ परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं । हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ॥ २५ ॥ ऐसे प्रकारिचे जे जन । ते जीतचि प्रेतासमान । त्यांसी न करावें भाषण । पवित्र जनीं ॥ २६ ॥ पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती । जे जे जैसें करिती । ते पावती तैसेंची ॥ २७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भक्तिनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ मुळीं देह त्रिगुणाचा । सत्वरजतमाचा । त्यामध्यें सत्वाचा । उत्तम गुण ॥ १ ॥ सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती । तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ॥ २ ॥

श्लोक ॥ ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥

त्यांतही शुद्ध आणी सबळ । तेही बोलिजेति सकळ । शुद्ध तेंचि जें निर्मळ । सबळ बाधक जाणावें ॥ ३ ॥ शुद्धसबळाचें लक्षण । सावध परिसा विचक्षण । शुद्ध तो परमार्थी जाण । सबळ तो संसारिक ॥ ४ ॥ तया संसारिकाची स्थिती । देहीं त्रिगुण वर्तती । येक येतां दोनी जाती । निघोनियां ॥ ५ ॥

आचरण नाहीं, विद्यावैभव चातुर्य कौशल्य कांहींच नाहीं, शांति, क्षमा, भूतदया नाहीं, स्वधर्माचार नाहीं,—हें कांहीं एक नाहीं आणि 'मुक्त क्रिया मनाची' मात्र आहे म्ह० अनर्गळपणें मनाला येईल त्याप्रमाणें वागत आहे. कर्म उपासना ज्ञान वैराग्य यांचें साधन कांहीं करीत नाहीं; उपरति, समता, त्याग, हरिप्रेम, हें ठाऊक नाहीं; परोपकाराचें सुख ओळखलें नाहीं व हरिभक्तीचा अंतर्यामीं लेश नाहीं! अशा प्रकारचे प्राणी जिवंत असून मेल्यासारखेच होत; देवाच्या दासांनीं त्यांशीं भाषणही करूं नये. पुण्याचा भरपूर सांठा ज्याजवळ असतो त्यालाच भगवद्भक्ति घडते. असो. जे जे जसें करितात तसेंच त्यांना फळ मिळतें (१५–२७). [द. २, स ४.]

सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांचाच मुळीं देह आहे. त्यांत सत्त्वगुण उत्तम होय. प्राण्यांना सत्त्वगुणाधिक्यामुळ हरिभक्ति, रजोगुणामुळें जन्ममरणांची यातायाती व तमोगुणामुळें अधोगति प्राप्त होते. (गीता, अ. १४, श्लोक १८ मध्यें भगवान् हेंच सांगतात). त्यांतही शुद्ध आणि शबल म्ह० पारमार्थिक आणि सांसारिक असे भेद आहेत. शुद्ध, निर्मळ व शबल औपाधिक किंवा बाधक जाणावे. परमार्थसाधन करणारा तो शुद्ध व संसारांत गुंतून पडलेला तो शबल (१–४). सांसारिकांच्या ठिकाणीं तीनही गुण असतात, मात्र एक प्रबळ झाला कीं दुसरे दोन हटतात. त्रिगुणांचेंच औचित्य चाळलें आहे. ह्या समासांत

रज तम आणि सत्व । येणेंचि चाले जीवित्व । रजोगुणाचें कर्तृत्व । दाखऊं आतां ॥ ६ ॥ रजोगुण येतां शरीरीं । वर्तणुक कैसी करी । सावध होऊनी चतुरीं । परिसावें ॥ ७ ॥ माझें घर माझा संसार । देव कैंचा आणिला थोर । ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ॥ ८ ॥ माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणी दुहिता । इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण ॥ ९ ॥ बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें । दुसऱ्याचें अभिलाषावें । तो रजोगुण ॥ १० ॥ कैंचा धर्म कैंचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान । विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ॥ ११ ॥ नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीत अभ्यागत । अनाचारी मनोगत । तो रजोगुण ॥ १२ ॥ धनधान्याचें संचित । मन होय द्रव्यासक्त । अत्यंत कृपण जीवित । तो रजोगुण ॥ १३ ॥ मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर । मी सकळांमध्यें थोर । म्हणे तो रजोगुण ॥ १४ ॥ माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव । ऐसी मनीं धरी हांव । तो रजोगुण ॥ १५ ॥ दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंचि बरें असावें । ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ॥ १६ ॥ कपट आणि मत्सर । उठे देहीं तिरस्कार । अथवा कामाचा विकार । तो रजोगुण ॥१७॥ बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता । लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ॥ १८ ॥ जिवलगांची खंती । जेणें काळें वाटे चित्तीं । तेणें काळें सीघ्रगती । रजोगुण आला ॥ १९ ॥ संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल सेवट । मनास आठवे संकट । तो रजोगुण ॥ २० ॥ कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनीं आठवलें । दुःख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ॥ २१ ॥ वैभव देखोन दृष्टी । आवडी उपजली पोटीं । आशागुणें हिंपुटी । करी तो रजोगुण ॥ २२ ॥ जें जें दृष्टी पडिलें । तें तें मनें मागितलें । लभ्य नस्तां दुःख जालें । तो रजोगुण ॥ २३ ॥ विनोदार्थी भरे मन । शृंगारिक करी गायन । राग रंग तान मान । तो रजोगुण ॥ २४ ॥ टवाळी ढवाळी निंदा ।

रजोगुणाचें वर्णन करूं. देहांत रजोगुण भरला म्हणजे मनुष्य कसा वागतो तें पाहा (५–६). घर माझें, संसार माझा, देव थोर नाहीं—मीच थोर आहें असा मनाचा निश्चय रजोगुणामुळें होतो. स्वकुटुंबाची चिंता वाहतो तो रजोगुण. खावें, प्यावें; मजा मारावी; दुसऱ्याचें अभिलाषावें; परमार्थाच्या कोणत्याच भावनांना थारा देऊं नये; धनधान्यसंचय करावा व वाढवावा; मी बलाढ्य, मी सुंदर इ० प्रकारें देहाभिमान धरावा; माझा देश, माझा गांव, माझें घर, माझें कुटुंब व मी ह्याप्रमाणें 'मी' आणि 'माझें' यांच्या अभिमानांत, चिंतेंत व सुखदुःखांत गुंग होऊन राहावें.; दुसऱ्याचें जावें व मला मिळावें, जें जें पाहावें तें तें अभिलाषावें व मिळतां लोभी व न मिळतां कष्टी व्हावें, संसाराचे निरंतर कष्ट करावे, हास्यविनोदांत काळ

सांगणें घडे वेवादा । हास्य विनोदा करी सर्वदा । तो रजोगुण ॥ २५ ॥ आळस उठे प्रबळ । कर्मणुकेचा नाना खेळ । कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ॥ २६ ॥ कळावंत बहुरूपी । नटावलोकी साक्षपी । नाना खेळीं दान अर्पी । तो रजोगुण ॥ २७ ॥ उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती । ग्रामज्य आठवे चित्तीं । आवडे नीचाची संगती । तो रजोगुण ॥ २८ ॥ तस्करविद्या जीवीं उठे । परन्यून बोलावें वाटे । नित्य नेमास मन विटे । तो रजोगुण ॥ २९ ॥ देवकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळु । प्रपंचीं जो स्नेहाळु । तो रजोगुण ॥ ३० ॥ गोड ग्रासीं आळकेपण । अत्यादरें पिंडपोषण । रजोगुणें उपोषण । केलें न वचे ॥ ३१ ॥ शृंगारिक तें आवडे । भक्ति वैराग्य नावडे । कळालाघवीं पवाडे । तो रजोगुण ॥ ३२ ॥ नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा । बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ॥ ३३ ॥ असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण । प्रपंची तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ॥ ३४ ॥ आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हें तुटेना । प्रपंचीं गुंतली वासना । यास उपाय कोण ॥ ३५ ॥ उपाय येक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती । तरी यथानुशक्ती । भजन करावे ॥ ३६ ॥ काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें । ईश्वरीं अर्पूनियां मनें । सार्थक करावें ॥ ३७ ॥ यथानुशक्ती दानपुण्य । परी भगवंतीं अनन्य । सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ॥ ३८ ॥ आदिअंतीं येक देव । मध्येंचि लाविली माव । म्हणोनियां पूर्ण भाव । भगवंतीं असावा ॥ ३९ ॥ ऐसा सबळ रजोगुण । संक्षेपें केलें कथन । आतां शुद्ध तो तूं जाण । परमार्थिक ॥ ४० ॥ त्याचे वोळखीचें चिन्ह ।

सारावा; टवाळी, ढवाळी, परनिंदा, आत्मस्तुति हें आवडावें, दानधर्म न आवडावा, मात्र कळावंत, नाटकतमाशे करणारे, शृंगारिक गायनानें करमणूक करणारे अशांना कांहीं द्यावें; मैथुन (ग्रामज्य) व त्याला उत्तेजक असे नीच व त्यांचीं व्यसनें यांत दंग असावें; तस्करविद्या आवडावी; नित्यनेमाचा कंटाळा करावा; इ० सर्व रजोगुणाचे स्वभाव आहेत (७–२९). देवकार्यीं लाजाळु, उदरकार्यीं कष्टाळु व प्रपंचीं स्नेहाळु तो रजोगुण (३०). रजोगुणाला उपासतापास नको असतात. पिंडपोषण व गोडगोड पदार्थांविषयीं हपापलेपण (आळकेपण) हा त्याचा स्वभाव. भक्ति, ज्ञान, वैराग्य नावडे व कळालाघवीं (कौशल्यांत) मन पवाडे (शिर) तो रजोगुण, परमात्म्याविषयीं अनावड व इतर सर्व पदार्थांविषयीं आवड असला हा रजोगुण जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत घालतो (३१–३४). प्रपंचवासना पेटवणाऱ्या रजोगुणापासून सुटकेचा उपाय एक भगवद्भक्ति हाच आहे. प्रपंचत्याग संपूर्ण घडून वैराग्य आलें नाहीं तरी यथाशक्ति भजन करावें, देवाशीं अनन्य असावें, सुखदुःखें प्रारब्धानुसार येतील तीं भोगावींत, पण देवाचें चिंतन करावें, आदिअंतीं देव एक आहे, मध्येंच प्रपंच भासत असून त्याविषयीं ममत्व वाटत असतें म्हणून आदिमध्यावसानीं एकपणें असणारा जो देव त्यावर निष्ठेचें प्रेम ठेवावें. सबळ रजोगुण वर सांगितला, तो केवळ प्रपंचरूप असतो. शुद्ध रजोगुण पारमार्थिक आहे. त्याची ओळख सत्त्वगुणवर्णनांत करून

सत्वगुणीं असें जाण । तो रजोगुण परिपूर्ण । भजनमूळ ॥ ४१ ॥ ऐसा रजोगुण बोलिला । श्रोतीं मनें अनुभविला । आतां पुढें परिसिला । पाहिजे तमोगुण ॥ ४२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे रजोगुणलक्षण नाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ मागां बोलिला रजोगुण । क्रियेसहित लक्षण । आतां ऐका तमोगुण । तोहि सांगिजेल ॥ १ ॥ संसारीं दुःखसंमंध । प्राप्त होतां उठे खेद । कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ २ ॥ शरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता नोळखे पिता । बंधु बहिण आणि कांता । ताडी तो तमोगुण ॥ ३ ॥ दुसऱ्याचा प्राण घ्यावा । कां आपण स्वयें द्यावा । विसरवी जीवभावा । तो तमोगुण ॥ ४ ॥ भरलें क्रोधाचें काविरें । पिश्याच्यापरी वावरे । नाना उपायें नावरे । तो तमोगुण ॥ ५ ॥ आपला आपण शस्त्रपात । पराव्याचा करी घात । ऐसा समय वर्तत । तो तमोगुण ॥ ६ ॥ डोळां युध्यचि पाहावें । रण पडिलें तेथें जावें । ऐसें समई घेतलें जीवें । तो तमोगुण ॥ ७ ॥ अखंड भ्रांती पडे । केला निश्चय विघडे । अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ॥ ८ ॥ क्षुधा जयाची वाड । नेणे कडु अथवा गोड । अत्यंत जो का मूढ । तो तमोगुण ॥ ९ ॥ प्रीतीपात्र गेलें मरणें । म्हणोनियां जीवचि देणें । स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ॥ १० ॥ किडा मुंगी आणी स्वापद । यांचा करूं आवडे वध । अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ॥ ११ ॥ स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्महत्या । करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ॥१२॥ इसाळाचेनि नेटें । वीष घ्यावेंसें वाटे । परवध मनीं उठे । तो तमोगुण ॥ १३ ॥ अंतरीं धरूनि कपट । पराचें करी तळपट । सदा मस्त सदा उद्धट । तो तमोगुण ॥ १४ ॥ कलहो व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे । अंतरीं

घ्यावी. तो शुद्ध रजोगुण भजनाला आधार आहे — कां कीं ' रजः कर्मणि वर्तते ' — कर्म तेवढें रजोगुणाचें कार्य आहे, पण रजोगुण सत्त्वगुणांत मिसळून त्याचें कार्य करूं लागला कीं शुद्ध होय (३५–४२). [द० २, स० ५]

रजोगुणाचें क्रियेसहित लक्षण सांगितलें, आतां तमोगुणाचें लक्षण ऐका (१). संसारदुःखानें मन उद्विग्न होणें, अनावर क्रोध येणें व शरीरीं क्रोध भरतां आप्तस्वकीयांस मारावयास उठणें, दुसऱ्याचा प्राण घेणें किंवा आपला देणें, जीवभाव विसरणें, क्रोधांध होऊन पिशाच्चाप्रमाणें वागणें, डोळ्यानें युद्ध पाहावें व रणभूमीवर स्वयें जावें अशी आवड उठणें तो तमोगुण होय (२–७). निरंतर भ्रमिष्टासारखें अनिश्चित वागणें; निद्रा अत्यंत आवडणें; भूक अत्यंत प्रबळ असून कडू किंवा गोड हें न जाणणें; प्रेमाचें मनुष्य मरण पावलें असतां त्यासाठीं जीव देणें, पशुपक्ष्यांची किंवा मनुष्याची

द्वेष प्रगटे । तो तमोगुण ॥ १५ ॥ युध्य देखावें ऐकावें । सवें युध्यचि करावें । मरावें कीं मारावें । तो तमोगुण ॥ १६ ॥ मत्सरें भक्ति मोडावी । देवालयें विघडावीं । फळतीं झाडें तोडावीं । तो तमोगुण ॥ १७ ॥ सत्कर्में ते नावडती । नाना दोष ते आवडती । पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ॥१८॥ ब्रह्मवृत्तीचा उच्छेद । जीवमात्रांस देणें खेद । करूं आवडे अप्रमाद । तो तमोगुण ॥ १९ ॥ अग्निप्रळय शस्त्रप्रळय । भूतप्रळय विषप्रळय । मत्सरें करी जीवक्षय । तो तमोगुण ॥ २० ॥ परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास । संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ॥ २१ ॥ भांडण लाऊन द्यावें । स्वयें कौतुक पाहावें । कुबुद्धि घेतली जीवें । तो तमोगुण ॥ २२ ॥ प्राप्त जालिया संपत्ती । जीवांस करी यातायाती । कळवळा नये चित्तीं । तो तमोगुण ॥ २३ ॥ नावडे भक्ति नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव । वेदशास्त्र नलगे सर्व । तो तमोगुण ॥ २४ ॥ स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मीं भ्रष्टला दिसे । अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ॥ २५ ॥ जेष्ठ बंधु बाप माये । त्यांचीं वचनें न साहे । सीघ्रकोपी निघोन जाये । तो तमोगुण ॥ २६ ॥ उगेंचि खावें उगेंचि असावें । स्तब्ध होऊन बैसावें । कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ २७ ॥ चेटकविद्येचा अभ्यास । शस्त्रविद्येचा हव्यास । मल्लविद्या व्हावी ज्यास । तो तमोगुण ॥ २८ ॥ केले गळाचे नवस । राडिबेडीचे सायास । काष्ठयंत्र छेदी जिव्हेस । तो तमोगुण ॥ २९ ॥ मस्तकीं भदें जाळावें । पोतें आंग हुरपळावें । स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३० ॥ देवास सिर वाहावें । कां तें आंग समर्पावें । पडणीवरून घालून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३१ ॥ निग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें । देवद्वारीं जीव देणें । तो तमोगुण ॥ ३२ ॥ निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान । आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ॥ ३३ ॥ सकाम जें कां अनुष्ठान । कां तें वायोनिरोधन । अथवा राहावें पडोन । तो

हिंसा करणें ; अंतरीं कपट धरून दुसऱ्याचें तळपट करणें ; कलहाची, मारामारीची हौस वाटणें ; युद्ध पाहावें ; ऐकावें, स्वतः करावें, मरावें कीं मारावें असें वारें अंगांत भरणें हा तमोगुण होय (८–१७). ब्रह्मवृत्तीचा उच्छेद करणें म्ह० ब्राह्मणांस पूर्वजांनीं दिलेलीं वतनें, अग्रहार, वर्षासनें इत्यादि बंद पाडणें ; चुका करणें, चित्तांत कळवळा नसून प्राण्यांस पीडा, हिंसा, क्लेश देणें ; देव, धर्म, तीर्थ, संत, गुरुजन ; स्वधर्म, कर्म या सर्वांना झुगारून देणें ; खावें, स्वस्थ असावें, आळसांत लोळावें व रजोगुण बळावल्यास चेटकविद्या, शस्त्रविद्या यांचा हव्यास वाटावा ; मस्तकावर भदें जाळावें (भदें म्ह० खापर कीं ज्यांत सरक्या पेटवून जें डोक्यावर घेतात), पेटलेल्या कांकड्यानें (पोत) अंग होरपळावें, देवाला शिर वाहावें, टांगून घ्यावें,

तमोगुण ॥ ३४ ॥ नखें केश वाढवावे । हस्तचि वर्ते करावे । अथवा वाक्शून्य व्हावें । तो तमोगुण ॥ ३५ ॥ नानानिग्रहीं पीडावें । देहदुःखें चर्फडावें । क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ॥ ३६ ॥ देवाची जो निंदा करी । तो आशाबद्ध अघोरी । जो संतसंग न धरी । तो तमोगुण ॥ ३७ ॥ ऐसा हा तमोगुण । सांगतां तो असाधारण । परी त्यागार्थ निरूपण । कांहीं येक ॥ ३८ ॥ ऐसें वर्ते तो तमोगुण । परी हा पतनासी कारण । मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हे येणें ॥ ३९ ॥ केल्या कर्माचें फळ । प्राप्त होईल सकळ । जन्म दुःखाचें मूळ । तुटेना कीं ॥ ४० ॥ व्हावया जन्माचें खंडण । पाहिजे तो सत्वगुण । तेंचि असे निरूपण । पुढिलिये समासीं ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तमोगुणनाम समास साहवा ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुण । आतां ऐका सत्वगुण । परम दुर्लभ जो ॥ १ ॥ जो भजनाचा आधार । जो योगियांची थार । जो निरसी संसार । दुःखमूळ जो ॥ २ ॥ जेणें होये उत्तम गती । मार्ग फुटे भगवंतीं । जेणें पाविजे मुक्ती । सायोज्यता ते ॥ ३ ॥ जो भक्तांचा कोंवसा । जो भवार्णवींचा भर्वसा । मोक्षलक्ष्मीची दशा । तो सत्वगुण ॥ ४ ॥ जो परमार्थाचें मंडण । जो महंतांचें भूषण । रजतमाचें निरसन । जयाचेनी ॥ ५ ॥ जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी । देऊनियां निवारी । जन्ममृत्य ॥ ६ ॥ जो अज्ञानाचा सेवट । जो पुण्याचें मूळपीठ । जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची ॥ ७ ॥ ऐसा हा सत्वगुण । देहीं उमटतां आपण । तये क्रियेचें लक्षण । ऐसें असे ॥ ८ ॥ ईश्वरीं प्रेमा आधिक । प्रपंच संपादी लोकिक । सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ॥ ९ ॥ संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी । भजनक्रिया उपजवी । तो सत्वगुण ॥ १० ॥

पंचाग्नी धूम्रपान करावें, हस्तपाद वर करावे इ० अघोर प्रकार आवडावे इ० हा सारा तमोगुण होय (१८–३७). हा पतनास नेणारा आहे. जन्ममरणाचें खंडण करणारा तो सत्त्वगुण. त्याचीं लक्षणें पुढें पाहूं (३८–४१). [द० २, स० ६].

दुःखदायक व भयंकर असा तमोगुण सांगितला, आतां सत्त्वगुणाच वर्णन करितों. सत्त्वगुण अत्यंत दुर्लभ आहे (१). सत्त्वगुण हा भक्तीचा व योगाचा आधार आहे, दुःखमूळ संसाराचें हा निरसन करितो, ह्यानें उत्तम गति मिळते, देवाकडे जाणारा मार्ग दिसतो व सायुज्यमुक्ति मिळते. हा भक्तांचा आधार आहे, भवसागरांतून पार जाणें ह्याच्या भरवंशावरच शक्य असतें, मोक्षलक्ष्मीचें हा बाह्यचिन्ह आहे. हा परमार्थाचें मंडण, महंतांचें भूषण आहे. रजतमांचें निरसन ह्याच्यामुळेंच होतें. हा अत्यंत सुखकारक आहे, चित्तांत आनंदलहरी उठवून हा जन्ममरणभय निवारितो. हा अज्ञान नाहींसें करितो. सुकृताचें मूळस्थान म्ह० सत्त्वगुणच होय. ह्यामुळें परमार्थमार्ग सांपडतो. असा हा सत्त्वगुण देहांत प्रगट झाला म्हणजे त्याचीं लक्षणें कशीं असतात तें आतां सांगतों (२–८). चार लोकांप्रमाणें बाह्यतः प्रपंच करीत असतांना ईश्वरावर अधिक प्रेम असणें;

परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी । परोपकाराची तांतडी । तो सत्वगुण ॥ ११ ॥ स्नानसंध्या पुण्यसीळ । अभ्यंतरींचा निर्मळ । शरीरवस्त्रें सोज्वळ । तो सत्वगुण ॥ १२ ॥ यजन आणि याजन । अध्ययन आणि अध्यापन । स्वयें करी दानपुण्य । तो सत्वगुण ॥ १३ ॥ निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी । क्रिया पालटे रोकडी । तो सत्वगुण ॥ १४ ॥ अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें । नाना रत्नांचीं दानें । करी तो सत्वगुण ॥ १५ ॥ धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान । करी ब्राह्मण-संतर्पण । तो सत्वगुण ॥ १६ ॥ कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें । निःकाम तीर्थें उपोषणें । तो सत्वगुण ॥ १७ ॥ सहस्रभोजनें लक्षभोजनें । विविध प्रकारींचीं दानें । निःकाम करी सत्वगुणें । कामना रजोगुण ॥ १८ ॥ तीर्थीं अर्पी जो अग्रारें । बांधे वापी सरोवरें । बांधे देवालयें सिखरें । तो सत्वगुण ॥१९॥ देवद्वारीं पडशाळा । पाईरिया दीपमाळा । वृंदावनें पार पिंपळा । बांधी तो सत्वगुण ॥ २० ॥ लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें । निववी तापसांचीं मनें । तो सत्वगुण ॥ २१ ॥ संध्यामठ आणि भुयेरीं । पाईरिया नदीतीरीं । भांडारगृहें देवद्वारीं । बांधे तो सत्वगुण ॥ २२ ॥ नाना देवांचीं जीं स्थानें । तेथें नंदादीप घालणें । वाहे अळंकार भूषणें । तो सत्वगुण ॥ २३ ॥ जेंगट मृदांग टाळ । दमामे नगारे काहळ । नाना वाद्यांचे कल्लोळ । सुस्वरादिक ॥ २४ ॥ नाना सामग्री सुंदर । देवाळईं घाली नर । हरिभजनीं जो तत्पर । तो सत्वगुण ॥ २५ ॥ छत्रें आणि सुखासनें । दिंड्या पताका निशाणें । वाहे चामरें सूर्यापानें । तो सत्वगुण ॥ २६ ॥ वृंदावनें तुळसीवनें । रंगमाळा संमार्जनें । ऐसी प्रीति घेतली मनें । तो सत्वगुण ॥ २७ ॥ सुंदरें नाना उपकर्णें । मंडप चांदवे आसनें । देवाळईं समर्पणें । हा सत्वगुण ॥ २८ ॥ देवाकारणें खाद्य । नाना प्रकारीं नैवेद्य अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्वगुण ॥ २९ ॥ ऐसी भक्ताची आवडी ।

विचार सदा जागृत राहणें ; संसारदुःखाची विस्मृति होऊन भक्तिमार्ग स्वच्छ दिसणें ; परोपकारांत तत्पर असणें ; स्नानसंध्यादि आचार आवडणें ; अंतरीं शुद्ध विचार व बाह्यतः शरीरवस्त्रें सोज्ज्वळ अशी शुचिता असणें ; यजन, याजन, अध्ययन ह्या ब्रह्मकर्मांची प्रीति असणें ; निरूपणाची व हरिकथेची आवड असणें ; धन, वस्त्र अन्नोदक देणें व ब्राह्मणसंतर्पण करणें अशा दानकर्माविषयीं प्रेम वाटणें ; प्रातःस्नानें, व्रतें, उद्यापनें, तीर्थें, उपोषणें अशीं शरीरमनःशुद्धिकर कर्में करणें ; सामर्थ्य असतां वापी, कूप, सरोवरें, देवालयें, पायऱ्या, दीपमाळा, वृंदावनें, वनोपवनें बांधून व तयार करून तपस्वी जनांचा संतोष करणें, देवाच्या मंदिरांतून वस्त्रालंकार, टाळमृदंगादि वाद्यें, नाना प्रकारचीं उपकरणें व सामग्री ठेवून देवाची निष्काम सेवा करणें ; देवाला उंची नैवेद्य, फळें, खाद्यें वाहणें — अशी भक्तीची आवड व दास्यभक्तीची गोडी असणें व देवद्वारीं कायेनें, वाचेनें,

नीच दास्यत्वाची गोडी । स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ॥ ३० ॥ तिथी पर्व महोत्साव । तेथें ज्याचा अंतर्भाव । काया वाचा मनें सर्व । अर्पी तो सत्वगुण ॥ ३१ ॥ हरिकथेमी तत्पर । गंधें माळा आणी धूशर । घेऊनि उभीं निरंतर । तो सत्वगुण ॥ ३२ ॥ नर अथवा नारी । यथानशक्ति सामग्री । घेऊन उभीं देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३३ ॥ महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें । भक्ति निकट अंतरंगें । तो सत्वगुण ॥ ३४ ॥ थोरपण सांडून दुरी । नीच कृत्य अंगीकारी । तिष्ठत उभीं देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३५ ॥ देवालागीं उपोषण । वर्जी तांबोल भोजन । नित्यनेम जपध्यान । करी तो सत्वगुण ॥ ३६ ॥ शब्द कठीण न बोले । अतिनेमेंसीं चाले । योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ ३७ ॥ सांडूनियां अभिमान । निःकाम करी कीर्तन । स्वेद रोमांच येती पूर्ण । तो सत्वगुण ॥ ३८ ॥ अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन । पडे देहाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥ ३९ ॥ हरिकथेची अतिप्रीती । सर्वथा नये विकृती । आदिक प्रेमा आदिअंतीं । तो सत्वगुण ॥ ४० ॥ मुखीं नाम हातीं टाळी । नाचत बोले ब्रीदावळी । घेऊन लावी पायधुळी । तो सत्वगुण ॥ ४१ ॥ देहाभिमान गळे । विषई वैराग्य प्रबळे । मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्वगुण ॥ ४२ ॥ कांहीं करावया उपाय । संसारीं गुंतोन काय । ऐसें उकलवी हृदय । तो सत्वगुण ॥ ४३ ॥ संसारासी त्रासे मन । कांहीं करावें भजन । ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्वगुण ॥ ४४ ॥ असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमी । सदा प्रीती लागे रामीं । तो सत्वगुण ॥ ४५ ॥ सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट । आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्वगुण ॥ ४६ ॥ सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन । आठवे भगद्भजन ।

धनमनानें राबणें हीं सत्त्वगुणाचीं लक्षणें होत (९–३१). ह्याच लक्षणांचें अधिक वर्णन पुढील ओव्यांतून केलें आहे. हा सत्त्वगुण स्त्रियांत व पुरुषांत प्रगट झाला कीं गंध, माळा, बुक्का (धूशर) हातीं घेऊन यथाशक्त्या सर्व सामग्रीसहित देवद्वारीं सेवेला ते तत्पर असतात, संसारांतलें महत्कृत्य मागें टाकून अंतरंग भक्तीन देवासाठीं ते धावतात, मोठेपण विसरून हलकीं काम भक्तिपूर्वक करितात (३२–३५). देवाच्या भक्तीमुळें देवदासांशीं मृदु बोलतात, नित्य नेमानें चालतात, अष्ट सात्त्विक भावांसह कीर्तन ऐकतात व करितात, अंतरीं देवाचें ध्यान लागून राहिल्यामुळें देहभाव विसरतात व नेत्र प्रेमाश्रूंनीं वाहतात (निडारले नयन), चित्त विकाररहित होतें, सर्वकाळ त्यांचें हरिप्रेमच वाढत जातें. देवाचें नाम गात, नाचत टाळ्या वाजवितात, प्रेमळ भक्तांची पायधूळ मस्तकाला लावतात, तेणेंकरून त्यांचा देहाभिमान गळतो. विषयवैराग्य वाढतें, संसार-गुंतींतून मोकळें होण्याचा उपाय सुचतो, संसारकर्म करीत असतां नित्यनेम लावून घेतात व सर्वकाळ रामप्रेमांत निमग्न होतात. हरिप्रेमबळावर आघात आले तर भक्त धैर्यानें त्यांना तोंड देतो. विषयभोगांना मन विटतें, नाना पदार्थ नकोसे होतात.

तो सत्वगुण ॥ ४७ ॥ पदार्थीं न बैसे चित्त । मना आठवे भगवंत । ऐसा दृढ भावार्थ । तो सत्वगुण ॥ ४८ ॥ लोक बोलती विकारी । तरी अधिक प्रेमा धरी । निश्चय बाणे अंतरीं । तो सत्वगुण ॥ ४९ ॥ अंतरीं स्फूर्ती स्फुरे । सस्वरूपीं तर्क भरे । नष्ट संदेह निवारे । तो सत्वगुण ॥ ५० ॥ शरीर लावावें कारणीं । साक्षेप उठे अंतःकरणीं । सत्वगुणाची करणी । ऐसी असे ॥ ५१ ॥ शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया । सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥ ५२ ॥ आले अतीत अभ्यागत । जाऊं नेदी भुकिस्त । यथानशक्त्या दान देत । तो सत्वगुण ॥ ५३ ॥ तडितापडी दैन्यवाणें । आलें आश्रमाचेनि गुणें । तयालागीं स्थळ देणें । तो सत्वगुण ॥ ५४ ॥ आश्रमीं अन्नाची आपदा । परी विमुख नव्हे कदा । शक्तिनुसार दे सर्वदा । तो सत्वगुण ॥ ५५ ॥ जेणें जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना । जयास नाहीं कामना । तो सत्वगुण ॥ ५६ ॥ होणार तैसें होत जात । प्रपंचीं जाला आघात । डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ ५७ ॥ येका भगवंताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें । केलें देहाचें सांडणें । तो सत्वगुण ॥ ५८ ॥ विषईं धांवे वासना । परी तो कदा डळमळिना । ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्वगुण ॥ ५९ ॥ देह आपदेनें पीडला । क्षुधेतृषेनें वोसावला । तरी निश्चयो राहिला । तो सत्वगुण ॥ ६० ॥ श्रवण आणीं मनन । निजध्यासें समाधान । शुद्ध जालें आत्मज्ञान । तो सत्वगुण ॥ ६१ ॥ जयास अहंकार नसे । नैराश्यता विलसे । जयापासीं कृपा वसे । तो सत्वगुण ॥ ६२ ॥ सकळांसीं नम्र बोले । मर्यादा धरून चाले । सर्व जन तोषविले । तो सत्वगुण ॥ ६३ ॥ सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव । परोपकारीं वेंची जीव । तो सत्वगुण ॥ ६४ ॥ आपकार्याहून जीवीं ।

पदार्थाहून वेगळा असा जो भगवंत तोच प्रिय होतो. लोक म्हणतात कीं हा भ्रमिष्ट झाला, तरी ह्याचें प्रेम वाढतच असतें—प्रेमाचा निश्चय दृढतर होतो, अंतरांत हरिस्फूर्ति भरून राहते, बुद्धि स्वरूपाकार होते व सकळ संदेह मावळतात (३६–५०). सत्त्वगुणाचा उदय झाल्यामुळें हा हरिमय झाला. (आतां ह्याचें संसारांत स्वतःशीं, कुटुंबीयांशीं व इतरांशीं वागणें कसें होतें तें पाहा.) शरीर सार्थकीं लावण्यासाठीं हा उद्योगी (साक्षपी) होतो. शांति, क्षमा, दया हे गुण अंतरांत भरून परांना सुख देण्यास झटावें असेंच ह्याला वाटतें. अतिथि, भुकिस्त, तडीतापडी म्ह० भिक्षा मागून फिरणारे गोसावी इ० कोणीही घरीं आले व ह्याच्या घरीं अन्नाची आपदा असली तरी हा सर्वांचा शक्त्यनुसार परामर्श घेतो, विमुख जाऊं देत नाहीं. होणार तें होत असतें ह्या बळकीवर बसून तो धैर्यानें सर्व सोसतो, चित्त ढळत नाहीं. वासना विषयांकडे धावली तरी हा ती आवरतो. क्षुधा तृषा ह्यांमुळें देह गळाला (वोसावला) तरी आत्मनिश्चय दृढ धरून राहतो. स्वतःच्या आपदेविषयीं सहिष्णु पण इतरांविषयीं करुणा असा ह्याचा स्वभाव बनतो. नम्र भाषण, परोपकार, नैराश्य, स्वकार्यापेक्षां परकार्याविषयीं अधिक दक्षता, परदोष न पाहतां समुद्रासारखें मोठें मन करणें, नीच उत्तर किंवा छळ सोसणें,

परकार्यसिद्धी करावी। मरोन कीर्ती उरवावी। तो सत्वगुण ॥ ६५ ॥ पराव्याचे दोषणगु। दृष्टीस देखे आपण। समुद्राऐसी सांठवण। तो सत्वगुण ॥ ६६ ॥ नीच उत्तर साहाणें। प्रत्योत्तर न देणें। आला क्रोध सावरणें। तो सत्वगुण ॥ ६७ ॥ अन्यायेंवीण गांजिती। नानापरी पीडा करती। तितुकेंहि साठवी चित्तीं। तो सत्वगुण ॥ ६८ ॥ शरीरें घीस साहाणें। दुर्जनासी मिळोन जाणें। निंदकास उपकार करणें। हा सत्वगुण ॥ ६९ ॥ मन भलतीकडे धांवे। तें विवेकें आवरावें। इंद्रियें दमन करावें। तो सत्वगुण ॥ ७० ॥ सत्क्रिया आचरावी। असत्क्रिया त्यागावी। वाट भक्तीची धरावी। तो सत्वगुण ॥ ७१ ॥ जया आवडे प्रातःस्नान। आवडे पुराणश्रवण। नाना मंत्रीं देवार्चन। करी तो सत्वगुण ॥ ७२ ॥ पर्वकाळीं अतिसादर। वसंतपूजेस तत्पर। जयंत्यांची प्रीती थोर। तो सत्वगुण ॥ ७३ ॥ विदेशीं मेलें मरणें। तयास संस्कार देणें। अथवा सादर होणें। तो सत्वगुण ॥ ७४ ॥ कोणी येकास मारी। तयास जाऊन वारी। जीव बंधनमुक्त करी। तो सत्वगुण ॥ ७५ ॥ लिंगें लाखोली अभिषेक। नामस्मरणीं विश्वास। देवदर्शनीं अवकाश। करी तो सत्वगुण ॥ ७६ ॥ संत देखोनि धांवे। परमसुख हेलावे। नमस्कारी सर्वभावें। तो सत्वगुण ॥७७॥ संतकृपा होय जयास। तेणें उद्धरिला वंश। तो ईश्वराचा अंश। सत्वगुणें ॥७८॥ सन्मार्ग दाखवी जना। जो लावी हरिभजना। ज्ञान सिकवी अज्ञाना। तो सत्वगुण ॥ ७९ ॥ आवडे पुण्य संस्कार। प्रदक्षणा नमस्कार। जया राहे पाठांतर। तो सत्वगुण ॥ ८० ॥ भक्तीचा हव्यास भारी। ग्रंथसामग्री जो करी। धातुमूर्ति नानापरी। पूजी तो सत्वगुण ॥ ८१ ॥ झळफळित उपकर्णें। माळा गवाळीं आसनें। पवित्रें सोज्वळें वसनें। तो सत्वगुण ॥ ८२ ॥ परपीडेचें वाहे दुःख। परसंतोषाचें सुख। वैराग्य देखोन हरिख।

स्वतः घस सोसणें, दुर्जनांस मिळून जाणें, छलकावर उपकार करणें, विवेकानें मन व इंद्रियें आवरणें, सत्कार्यप्रीति व वाईट कार्यांचा त्याग, स्नानपूजनभजन यांविषयीं प्रेम, जयंत्यादि पर्वें उत्साहानें करणें, विदेशीं कोणी मेलें तर त्याला स्वतः संस्कार देणें, जीव दुःख व बंधन यांपासून सोडवणें, साधुसंतांविषयीं परमादर व परम प्रेम इ० गुण ह्याचे ठिकाणीं सहज प्रकट झालेले दिसतात (५१–७८). अज्ञानाला ज्ञान शिकविणें, जनांस सन्मार्ग दाखविणें, लोक हरिभक्तीला लावणें हेंच त्याचें मुख्य कार्य होतें. त्याला पुण्यसंस्कार आवडतात. देवाला प्रदक्षिणा, सूर्यास नमस्कार तो घालतो. बुद्धि सात्त्विक व तीक्ष्ण झाल्यामुळें त्याचें पाठान्तर सहज होतें व टिकतें. भक्तीच्या हव्यासामुळें भक्तिशास्त्राचे ग्रंथ तो मिळवितो व पाहत असतो. नाना प्रकारच्या धातुमूर्तींची पूजा करितो. उपकरणें, आसनें, सांबळीं (गवाळीं), वस्त्रें, माळा सर्व त्याला स्वच्छ आवडतात. तो परदुःखें दुःखी व परसुखें सुखी होतो. तात्पर्य, देवधर्माच्या ठिकाणीं ज्याचें चित्त जडून जो देवाची निष्काम भक्ति